म. ग्रं. सं. ठाणे
विषय [illegible]
सं. क्र. [illegible]



REFBK-0015044

—य. कृ. जोशी

# केदार



REFBK-0015044

स. कृ. जोशी

किंमत २॥ रुपये

युवा प्रकाशन संस्था, कल्याण-मुंबई.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 95084

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ७३६२५ वि: ७-प्रवास
क्रमांक ८२८ नों: दि: २।३।७१

मित्रवर्य वसंत वेलणकर यांस—
न सांगताना गेलास !
पण तूं गेलास तरी, स्मृती कशा जातील ?
तुझी स्मृती जतन व्हावी म्हणून—

—स. कृ. जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

प्रकाशक :

मनोरमाबाई गांगल

युवा प्रकाशन संस्था, कल्याण

✻

चित्रकार :

रामकृष्ण कारेकर

✻

मुद्रक :

शं. द. घाटपांडे

जय-भारत प्रिंटिंग प्रेस

शिवाजी पथ, ठाणे

✻

प्रथमावृत्ति

चैत्र शु. १ शके १८८७

सर्वाधिकार लेखकाचे स्वाधीन

✻

एकमेव विक्रेते :

युनिव्हर्सल बुक एजन्सी

टिळक चौक, कल्याण

# प्रस्तावना

'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' किंवा 'जयजय रघुवीर समर्थ' यांच्यासारखीं रसाळ संतचरित्रें आधुनिक कथातंत्रानें लिहिणारे श्री. स. कृ. जोशी यांचें 'केदार' हें प्रवास-वर्णन वाचतांना मला एक आगळाच आनंद झाला. चांगलें प्रवास-वर्णन वाचतांना मला नेहमीच आनंद होतो; पण श्री. जोशी यांचें हें पुस्तक वाचतांना झालेला आनंद आगळा वाटण्याचें एक वेगळेच कारण आहे. दुबळयाला दांडगे आवडतात किंवा काळयाला गोरेपणाची ओढ वाटते, त्यांतलाच हा एक प्रकार आहे. हरिद्वार, हृषीकेश किंवा मदुरा, कन्याकुमारी यांच्यासारख्या क्षेत्रांचा मीहि प्रवास केला आहे. तिथलें निसर्गसौंदर्य किंवा वास्तुशिल्प मलाहि आवडलें आहे. पण त्याबरोबरच तिथली घाण, बाजारी-पणा, पावित्र्य विडंबन यांची शिसारीहि मला आलेली आहे. त्यामुळें निर्भेळ आनंदाचा आस्वाद मला घेतां आलेला नाही. भक्तीनें ओथंबलेल्या अंतःकरणानें आणि श्रद्धेनें भरलेल्या डोळयांनी ही पवित्र स्थळें श्री. जोशी यांनीं पाहिल्यामुळें त्यांच्या वर्णनांत निराशा किंवा संताप यांचा लवलेश नाहीं. आपले सात्विक भाव सोज्वळ भाषेंत त्यांनीं व्यक्त केले आहेत.

भारतीय परंपरेंत आणि संतवाङ्मयांत मुरलेल्या लेखकानें स्टेशनांतली 'हरिद्वार' ही पाटी पाहिल्याबरोबर त्याच्या तोंडांतून पुढील उद्गार सहज बाहेर पडतात; ... हरिद्वार! काय सार्थ नांव आहे पहा! हरिद्वार!! ज्ञानदेवांनी हरिपाठांत म्हटलें आहे, 'देवाचिये द्वारीं'. मनांत आले कीं ज्ञानदेवांना 'हरिचिये द्वारीं' असें तर म्हणायचें नव्हतें ना? कारण पुढच्या चरणांत त्यांनीं म्हटल्याप्रमाणें हरिद्वारचें दर्शन झालें नि हातांत मोक्ष

मिळाल्याचा आनंद झाला ... कनखल तिथविरल्या दक्षीवराच्या मंदिरांत शिरतांना बरोबर प्रवास करीत असलेल्या आजीबाईंना लेखक, वडिलांचें न ऐकतां शंकराशीं प्रेमविवाह करणाऱ्या पार्वतीची कथा मिश्किल-पणें, पण बहारीनें रंगवून सांगतात.

देवाइतकींच देवतर त्या हिमालयाबद्दल लेखकाला भक्ति वाटते यांत नवल नाहीं. बद्रिकेदार किंवा बद्रिनाराय-णाच्या मंदिरापर्यंत पोहोचावयाला नगाधिराज हिमाल-याच्या दऱ्याखोऱ्यांतून कित्येक मैल पायीं चालत जावें लागतें. या पदयात्रेंत पाहिलेल्या हिमालयाच्या भव्योदात्त निसर्गसौंदर्याचें लेखकानें बहारदार वर्णन केलें आहे. एके ठिकाणीं ते म्हणतात, "...भल्या मोठ्या मिरवणुकींत श्रीमंती दारूकाम चाललेलें असावे तसें ह्या पायीं प्रवासांत जागोजागीं निसर्गशोभेचे जणूं दारुकामच चालले होते. एका डोंगरावर फुलांचा ... विठोबा पाहिला नि दुसऱ्या डोंगरावरून बर्फाच्या खड्यांचा धबधबा पाहिला ... हत्तींच्या सोंडेत पांढऱ्या स्वच्छ फुलांची माळ दिसावी तसा काळ्या पत्तरावर तो पांढरा जलप्रवाह दिसत होता. तो इतक्या उंचावरून वेगानें पडत होता कीं खालचा बर्फ फुटून त्याचे शतशः तुकडे होत होते— ... फुलबाजींतून ठिणग्या उडाव्यांत त्याप्रमाणें त्या डोंगरातून बर्फाचे तुकडे उडत होते नि सूर्यप्रकाशांत ते चमकत होते. समोरचा डोंगर वेड्यासारखा दिवसाच एक भली मोठी पेटलेली फुलबाजी हातांत धरून उभा होता......"

'पुण्यपुंज हिमवंता'चें श्री. स. कृ. जोशी यांनीं घडविलेलें हें दर्शन वाचकांना निश्चितपणें आवडेल.

२७ नोव्हेंबर ६५

प्रा. अनंत काणेकर

आपल्या हिंदु-धर्मात स्कंदपुराण नांवाचा ग्रंथ अग्रगण्य समजला जातो. त्यामध्यें श्रीकेदार–नारायणाचा महिमा फार सुंदर वर्णन केला आहे. पृथ्वीवरील सृष्टीदेवीच्या सौंदर्याचें सर्वोत्कृष्ट प्रतीक म्हणजे केदारनाथ व बदरीनारायण मंदिरें व त्यांच्या आसमंतांतील प्रदेश म्हणजे प्रत्यक्ष नंदनवनच होय.

पूर्वापरौ तोयनिधी वगाह्य स्थितः पृथिव्यां इव मानदंडः। हिमालय हा केवळ भारताचाच नव्हे तर अखिल जगताचाच मानदंड आहे. या अद्वितीय–अपूर्व पर्वतांतील अवर्णनिय खिंडी, रुपेरी हिमशृंगें व उत्तुंग शिखरें व एकीकडे बर्फाच्छादित खडकांमधून सर्पासारख्या वक्रगतीने वहात असतां ध्वनि–प्रतिध्वनि करीत आसमंत संगीताने भारून टाकणाऱ्या हिमनद्या तर दुसरीकडे मेघांचा गडगडाट व विजांचा कडकडाट जेव्हां दृष्टीस पडतात तेव्हां मन आश्चर्याने थक्क होते. एकीकडे लहान–मोठया टेकडया बर्फानें आच्छादिलेल्या दिसतात तर दुसरीकडे मखमली गालीच्यासारख्या हिरव्यागार हिरवळीनें व रंगीबेरंगी पुष्पांनीं फुललेल्या दिसतात.

श्री. जोशी यांनी पाहिलेल्या या वैभवांचे शब्दांकलन मोठया कुशलतेने केले आहे. त्यांतील वेगळेपणा प्रा. अनंत काणेकरानी म्हटल्याप्रमाणें आपणासहि जाणवेलच.

—प्रकाशक


मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ५३६२५ वि: ९५-प्रवास
६२५ नों. दि. ३/३/६२
दा. क्र. १५०४४

प्रस्थान

फिरणं हा शौक आहे. प्रवास हा एक छंद आहे तर तीर्थयात्रा करणं ही एक पर्वणी आहे. पहाडी तीर्थयात्रा हा तर फारच मोठा अमृतयोग आहे.

बद्रिकेदार नि बद्रिनारायण ह्या यात्रा म्हणजे तीर्थराज आहेत. अशा प्रवासाला निघणं नि त्यांत एखाद्या यात्रा कंपनीबरोबर सहप्रवास करणें म्हणजे मोठा रोमहर्षक अनुभव आहे.

प्रवासांत पुष्कळ माणसें असली कीं यात्रेला रंग चढतो. पण विचित्र स्वभावाची माणसें भेटलीं कीं रंगाचा बेरंग व्हावयालाही वेळ लागत नाहीं. भारतप्रवासीमधलें सहप्रवासी मात्र लाघवी, एका आवडीचे नि विचाराचे होते.



वैशाख महिन्याच्या अक्षय्य तृतियेस मुंबई स्थानकापासून आमची अमृत सहल सुरू झाली. कुणाची मुलें तर कुणाच्या सुना, कुणाची आई तर कुणाचे वडील पोंहोंचवायला आले होते. गाडी सुटण्याची वेळ झाली तरी निरोप देणारी मंडळी हालत नव्हती. शेवटीं गाडी सुटली तशी मंडळी मागें पडली नि वाऱ्याची झुळूक डब्यांत आली. म्हणतां म्हणतां दादर आलें. पुन्हां गांठीभेटी नि निरोप समारंभ झालें. तांबडा दिवा हिरवा झाला. धांवपळ सुरू झाली. गाडी सुटली नि लौकरच तिनें वेग घेतला.

आचारी पानें घेऊन आले. गाडींतलें पहिलें जेवण झालें. सहप्रवाशांच्या ओळखी झाल्या. एकजण हिशेब तपासनीस तर दुसरा पुराणिक होता. तिसरा शिक्षक नि चौथा कारकून होता. कांहीं सह-कुटुंब होते तर कांहीं सडे. कुणी बहीणभाऊ एकमेकांच्या सोबतीनें आले तर कुणी श्रावणाच्या भक्तिनें आपल्या वृद्ध मातापित्यांना घेऊन आले.

कुणी आजी तर कुणी वहिनी, काकी नि मामी. सर्व नातीं डब्यांत जडली गेली. जणूं एका कुटुंबांतलीच माणसें प्रवास करीत आहेत असे वाटलें. रात्र वाढली तसें डोळे पेंगू लागले. अंथरुणं तयार होतींच. हळूं हळूं एकेकजण निद्रादेवीच्या आधीन होऊं लागला. गाडीनें वेग घेतला होता. अंधार कापीत ती झपाट्यानें निघाली होती. अंधारांतून तो आम्हाला उजेडांत नेणार होती. जिथें जायचें होतें त्या स्थळांची चित्रे रंगवीत मी आकाशांतल्या चांदण्या मोजीत होतों. खिडकींतून येणारा गार वारा सुखावह वाटत होता. आईच्या हळूवार मायेने त्या गार झुळकीनें थोपटून मला केव्हां निजवलें तें कळलेंहि नाहीं.

सकाळीं जाग आली तर भुसावळ आलें होतें. तोंड धुतलें.

अंथरूणे गुंडाळून वर ठेवलीं. हळूं हळूं खिडकीवाटें उजेड आला. अंधार धुवून निघाला. रोजनिशींत पाहिलें तर आज जगद्गुरू श्रीशंकराचार्यांची जयंती होती. बरोबर ज्ञानदेवाचा फोटो घेतला होता. नि पंढरीच्या विठ्ठलाची छोटीशी मूर्तिहि होती. त्यांना एका कोपऱ्यांत आसनस्थ करून उदबत्ती पेटवली. सुवासानें माणसें गोळा झाली. गाडींतील तें दृश्य सर्वांना इतकें आवडले कीं विचारूं नका. प्रभातकाळ, त्यांत शंकराचार्यांची जयंती, प्रवासी बद्रिकेदाराला निघालेले, ज्ञानदेवांना पाहून त्यांच्या बरोबरच आपण प्रवास करति आहोंत अशा भावनेने प्रत्येकाचें हृदय भरून आलें. तोंडावर हसूं उमटलें, हात जोडले गेले नि एका सुरांत प्रभात प्रार्थनेस सुरवात झाली.

अलंकापुरीं पुण्यभूमि पवित्र । तिथें नांदतो ज्ञानराजा सुपात्र
तया आठविता महापुण्यराशीं । नमस्कार माझा श्रीसद्गुरु ज्ञानेश्वरांशी ॥

पाठीशी पुण्यराशी घेऊनच ज्ञानदेवांच्या संगतींत आम्ही सहप्रवासी केदाराच्या वाटेला लागलों होतों. शंकराचार्यांनीच म्हटलें आहे.

मोक्षकारणसामग्र्यां भक्तिरेव गरीयसी—

मोक्ष मिळण्यास जी सामग्री लागते तींत भक्ति फार श्रेष्ठ आहे. आणि आम्ही सारेजणच भक्तिरसांत रंगून गेलों होतों.

आमच्या मनाची ओढ ओळखून गाडीहि जोरांत धावत होती. छोटी हजेरी झाली. उन्हे हळूं हळूं वाढूं लागली. ताई डब्यांत आली. तिने दुरून नेपानगरची कागदाची गिरणी दाखविली. सांचीचा स्तूपहि गाडीतूनच पाहिला. सबंध दिवस प्रवासांतच गेला.

पहिला मुक्काम आग्र्याला झाला. तेथून फत्तेपूर शिक्रीला गेलो. तेथील टर्कीश सुलताना महाल, जोधाबाई महाल पहातां पहातां

एकेकाळीं दिल्लीपासून पसरलेलें मोंगल साम्राज्य समोर उभे राहीले. बिरबल महाल बघून लहानपणीं गोडीनें वाचलेल्या बिरबलाच्या गोष्टीं आठवल्या. बुलंद दरवाज्याकडे पहातां पहातां त्याच्या सारख्याच बुलंद असलेल्या सदाशिवराव भाऊनें दिल्लीचे तक्त कसें फोडलें तो इतिहास आठवला नि छाती अभिमानानें फुगून गेली. बोईंग जेटच्या वेगानें मनाचे विमान वर्तमानकाळांतून भूतकाळाकडे घिरट्या घालीत होतें.

## यमुनेकाठीं ताजमहाल

संध्याकाळीं ताजमहाल पाहिला. चमेलीच्या फुलाप्रमाणें सुकुमार नि नाजूक असलेल्या शहाजहानच्या प्रेयसीची ती समाधी ! अनेक रसिक वेड्यांना ह्या ताजमहालने भुलवून चकीत नि वेडें केलें. पण मी असा मुलखावेगळा वेडा कीं शहाजहानच्या थिजलेल्या अश्रूंतून उभारलेलें पांढऱ्या दगडाचें तें थडगे पाहून माझ्या मनाच्या रसिक सतारीवर मात्र एकही सूर उमटला नाही. कंप नाही नि अनुकम्पाहि नाही. अगदीं मागच्या सारखाच मख्खपणानें मी तो ताज पाहिला. त्याकडे पाठ फिरविली नि हिरवळीवर लोळत पडलों. इतर पहात होते नि ते इतकें काय पहात होते हे मला कांहीं समजत नव्हतें.

एखाद्या रमणीचें सौंदर्य पहिल्या भेटींत दिसलें नाहीं तरी दुसऱ्या भेटींत मात्र त्याचा खरा साक्षात्कार झाल्यावाचून राहात नाही. नि तसा साक्षात्कार झाला कीं तिच्या रुपानें तो माणूस वेडाच बनतो. पण ताजमहाल दुसऱ्यादां पाहूनहि मला कांहीं सौंदर्याचा साक्षात्कार झाला नाही. नांव गाजलेल्या फत्तेपूरसीक्रितहि हाच अनुभव आला. मुसलमान कलाकृति सरस खरी पण तिच्यांतला एक दोष निश्चित जाणवतो. तो हा कीं सौंदर्याचें पुनर्दर्शन वेड लावणारे, तर ह्या कलाकृतिचे पुनर्दर्शन कंटाळा आणणारें. ज्या कलाकृतींत प्रत्येक वेळेस नवा आशय, नवा आनंद दिसत नाहीं; जी कलाकृति पुनः पहातांना कंटाळा येतो, ती

कलाकृति कसली ? कुणी नांवें ठेवलीं तरी चालतील पण ताजमहाल पहातांना मला तरी मुळींच आनंद झाला नाहीं नि होत नाहीं.

## अति मधुरा मथुरा

दुसऱ्या दिवशीं कृष्णाच्या मथुरेंत आलो तर अंग शहारुन गेलें. आग्र्याचें वैभव पहात असतांना भूतकाळांतले मोंगल साम्राज्याचे कानांत वाजणारे नगारे आतां शांत झाले नि भारतीय युद्धामागील सूत्रधार समोर दिसूं लागला. हृदयाच्या वृंदावनांत वन्सीधर कृष्णाची मधुर मुरली ऐकूं येऊं लागली.

ह्या भूमींत कृष्ण जन्मला, वाढला, खेळला, लहानाचा मोठा झाला. त्याची हृदयस्वामिनी राधा ह्याच भूमींतली. कृष्णाची ही जन्मभूमि, कर्मभूमि नि तपोभूमि ! " राधाकृष्ण, गोपालकृष्ण " सारें चराचर एक गोड भजन गात होतें. रासक्रिडेतल्या टिपऱ्या वाजत होत्या. साऱ्या शरीराला नि मनाला एक लय आली होती. अंग पुलकीत होत होतें.

श्रीकृष्ण म्हणजे भारतीय संस्कृति नि भारतीय संस्कृति म्हणजेच श्रीकृष्ण. संतांना वेड लावणारा, गोपींना छळणारा, अर्जुनाचे घोडे धुणारा, जरासंध शिशुपाळाला लोळविणारा, एका करंगळीवर गोवर्धन उचलणारा, रणांगणावर स्थितप्रज्ञतेने गीता सांगणारा, सगळ्यांत असून नसणारा, द्रौपदीचा पाठीराखा, रुक्मीणीचा सखा, नि राधेचा श्याम !

"भारतीय संस्कृति"त सानेगुरुजी म्हणतात, " गोकुळांत कृष्णानें आधी मुरली वाजवली नि मग जगांत संगीत निर्माण झाले. " संगीत निर्माण करणाऱ्या प्रभूच्या पायांचा स्पर्श व्हावा म्हणून मन अधीर झालें होतें. पण ह्या अस्नात देहानें त्या श्यामसुंदराचें दर्शन कसें घ्यायचें ? म्हणून स्नान करण्याकरतां यमुना गाठली.

कृष्णवर्णी यमुनांही मानिनी, प्रौढ नि गंभीर आहे. त्या कृष्ण

सखीला हात जोडून शरीर नि मन स्वच्छ केलें. यमुनेंत पाणी भरपूर नि स्वच्छ. कांसवेंहि असंख्य होतीं. तृप्त मनानें स्नान करुन शुचिर्भूत होऊन वर आलों तर एका बाजूला चौबे नि दुसऱ्या बाजूला माकडें. चौब्यांचा त्रास इथेंहि आहे.

चौबा म्हणजे बुद्धि. चौबे म्हणजे चार वेद जाणणारे. पूर्वी चौबे चांगले वेदवेत्ते, शास्त्रसंपन्न असत. हल्लींचे चौबे तसे मुळींच नाहींत. त्यांच्या ठिकाणीं नम्रता नि विनय काडीमात्र नाहीं. ते नुसते पुंड आहेत. जुन्या काळाबरोबर जुने चौबे गेले नि त्यांच्याबरोबर त्यांची वेदविद्या नि तपतेजहि मावळले. आतां नुसती लाचारी नि लबाडी राहिली आहे. त्रास देणाऱ्या चौब्यांमधून वाट काढीत द्वारकाधीशाचें मंदिर गांटलें.

देव पडद्यामागें होता! भक्त आतुरतेंने दर्शनाला आलेले तर हा पडद्यापलीकडे बसलेला. कुणी सांगावें तोहि भक्तांना भेटायला आतुर असेल. पण पुजाऱ्यापुढें बिचारा देव तरी काय करणार? पण संतांनीं उघडें केलेलें परब्रह्म आम्ही बरोबर आणलें होतें. लोट्यांतून यमुनाहि आणली होती. पांडुरंगाची मूर्ति बाहेर काढला नि त्या देवळांत यमुनेच्या पाण्यानें त्याला अंघोळ घातली. वस्त्र नेसविलें. गुलाबाचीं फुलें वाहिलीं. कापूर, निरांजन, उदबत्ती लावली. आमचे भाविक सहप्रवासी गहिवरून गेले. एका निराळ्या अवतारांत कृष्ण स्वतःच जणूं त्याच्या मंदिरांत वेष पालटून आला होता. आम्ही आरतीला सुरवात केली. नि योग असा कीं त्याचवेळीं द्वारकाधीशाचें कवाड उघडले गेले. जणू आमच्या भक्तिचेंच कवाड उघडलें. एक प्रसन्न सुगंध सुटला शांत पौर्णिमा फुलली. दंभ नि अहंकार दूर करून श्यामसुंदराची वेड लावणारी वेणु चिरंतन वाजत राहिली.

वृंदावनांत बिर्लामंदिर, गोविंदजी मंदिर, कांच मंदिर इत्यादि

अनेक मंदिरें पाहिलीं. जिथें कृष्ण जन्मला तेथें गेलों. मोठ्याचे लहान होऊन गेलों. तोंडानें "बळय्या बळय्या । कृष्ण कन्हैया" म्हणत सर्व स्त्रीपुरुष रांगत रांगत त्या देवळात गेलो. "इथं कृष्ण जन्मला" म्हणून चौवा म्हणाला तेव्हां डोळ्यांत प्रेमाश्रू आले. अंगे शहारून गेलीं. वसुदेव देवकीचें दर्शन घेतलें. गोविंदजीच्या मंदिरांत, मोगरीच्या गजऱ्याचा प्रसाद मिळाला तर द्वारकाधीशाच्या मंदिरांत बर्फीचा प्रसाद मिळाला. अशी सुंदर बर्फी पैसे देऊनसुद्धां मुंबईला मिळणार नाहीं. देवापुढें एक रुपाया दिला तर बर्फीचा भरपूर प्रसाद मिळाला. मग पुनः दोन रुपये देऊन तो अमृतमधुर प्रसाद आणखीन मागून घेतला. एका भिंतीवर राधाकृष्णाचे तैलचित्र काढलें होतें. बराच वेळ त्याकडे पहात तो प्रसाद खात बसलों. मनांत येत होतें, इथें किती सुंदर दूध, ताक, दही, बर्फी नि लस्सी आहे! कृष्णानें लोणी खाल्लें त्याची ओशट आठवण अजून आहे. जेव्हां कृष्ण स्वतः इथें होता त्यावेळीं काय मजा असेल! त्यानें किती सकस खाल्लें असेल! किती पौष्टीक!! मथुरावृंदावनाची शोभा खरोखरच आगळी. हीं प्रेमभूमि जितकी समृद्ध तितकीच रमणीय आहे "ही सबभूमि गोपालकी है."



वृंदावनांतील प्रणयवासरींत आपला मंगल घोष मिसळविणाऱ्या कृष्णसखी श्यामवर्णी युमुनेचा आम्ही निरोप घेतला नि भारताच्या राजधानीकडे मार्गस्थ झालो.

## संगमरवरी स्वप्न

दिल्लीमधल्या बिर्लामंदिरानें हिंदूधर्माची नि दिल्लीचीहि शोभा वाढविली आहे. अहिल्याबाई होळकरणीचा हा आधुनिक अवतारच वाटतो. बिर्लाच्या लक्ष्मीला नि भांडाराला, औदार्याला नि ऐश्वर्याला ह्या गीतामंदिरानें एक आगळीच शोभा आणली आहे. ह्या बिर्लामंदिरांत लक्ष्मी धर्मानें नांदत आहे. शांति नि भक्तिरसानें काठोकाठ भरून तें मंगलमय झाले आहे. इथें एक संगमरवरी स्वप्न साकार झाले आहे. फार भव्य नि उदात्त स्वप्न आहे ते. गंगावतरणासारखी इथें गीता संगमरवरी दग डांतून अवतीर्ण झाली आहे. भारतीय संस्कृतिच्या अभिमानाचा हा एक अमोलीक ठेवा आहे. स्वच्छता, शांतता ह्यांचें एक माहेरघर आहे. सकाळची सूर्यकिरणं देवळावर पडली आहेत. पुष्करणींतलें कारंजें उत्साहानें थुयथुयी नाचतें आहे. हिरवळीकडे पाहून गुलाबांचीं फुलें खदखदां हंसत आहेत. देव सेवेसाठीं ठेवलेला गायक सकाळचा एक उत्तम राग आळवीत आहे. गीतेंतलें नि महाभारतांतलें, संगमरवरी भितींत कोरलेले प्रसंग पहातांना गाण्याचे सूर तुम्हांला सोबत करीत आहेत. अशावेळीं सुखानें गुदमरून न गेलांत तरच नवल !

## मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास....

मंदिर पाहून पंतप्रधान शास्त्री ह्यांना भेटण्यासाठीं त्यांच्या बंगल्यावर गेलों. समोरच्या हिरवळीवर आम्ही बसलों. बंगल्याभोवतीं शांतता, स्वच्छता नि प्रसन्नता होती. थोड्याच वेळांत शास्त्री बाहेर आले. त्यांच्याकडे पाहून चालतें बोलतें सौजन्य नि विनयच जणूं त्या द्वारांतून प्रगट झाले असें वाटलें. सुस्नात होऊन स्वच्छ खादीचें धोतर नेसलेले, त्यावर सदरा, जाकीट, डोक्यावर पांढरी टोपी, हांसरी मुद्रा, हिऱ्यासारखे तेजस्वी डोळे, गोबरे गाल, तांबूस श्यामवर्ण. संहरे-



पण करारी असें व्यक्तिमत्व फोटोंत दिसतात तसें शास्त्री प्रत्यक्षांत नाहींत. ऋषींची प्रज्ञा, संयम, पावित्र्य नि करारीपणा इथें भरपूर आहे. दिल्लीतून वहाणाऱ्या यमुनेचा हा वीरपुत्र आहे. ह्या पाण्याची चमक कांहीं निराळीच आहे. ते जवळ आले तेव्हां आम्ही सर्वांनीं 'जयहिंद' म्हणून त्यांच्या अंगावर गुलाबाच्या पांकळ्या उधळल्या. हंसत हंसत त्या हिरवळीर पडल्या. शास्त्रींनी आमची चौकशी केली. मोठी माणसे थोडे पण मोजके बोलतात. शास्त्री थोडं बोलले. पण चिरकाल लक्षांत राहाल असें बोलले. दिल्ली सोडली तेव्हां त्यांचे वाक्य सारखे आठवत होते.

"बद्रिकेदाराचे खरे पूजारी आपण आहांत."

## कठीण वज्रास भेदू ऐसे !

पंतप्रधानांची भेट घेऊन संरक्षण मंत्र्यांच्या घरावर मोर्चा नेला. ते समोर आले हंसतच ! मुंबई पुण्याकडलीं माणसें भेटलीं म्हणून दिल्लींतल्या त्या मराठी माणसाला केवढा आनंद झाला म्हणून सांगू. खूप वेळ दिला नि खूप बोलले आमच्याशीं. म्हणाले, "नारायणाला नि शंकराला माझे दंडवत सांगा. 'आमच्या सीमा रक्षण करण्याची शक्ति द्या' म्हणून परमेश्वराकडे आशीर्वाद मागा. यंदा मीहि येणार होतो.



पण कच्छ मागें लागले आहे ना. माझा निरोप घेऊन तुम्ही जा. आतां सुखसोयी चांगल्या आहेत. तुमचा प्रवास सुखाचा होईल" यशवंतरावांचे आशीर्वाद घेऊन निघालो ते जवाहरलालजींच्या "त्रिमूर्ति"कडे.

गुलाबाचे फूल कोमेजले.

यजमान घरांत नसतांना त्यांच्याकडे पाहुणा म्हणून जावें तशी कांहींशीं भावना "त्रिमूर्तीत"शिरतांना झाली. आज भारताचे जवाहर तेथें नव्हते. त्रिमूर्ति पोरकी होती. देव्हारा होता पण देव नव्हता. गुलाब

होते पण गुलाबी माणूस नव्हता. स्मृति होती पण व्यक्ति नव्हती. त्या स्मृतीला आदरानें वंदन करीतच आंत गेलों. केवढें भव्य पटांगण ! किती सुंदर हिरवळ. पण थोडीशी सुकलेली. कां पोशिंदा गेला म्हणून ती अशी मलूल झाली होती ? हिरवळीवर साबरीचा कापूस पडला होता. केदारचा बर्फ तर इथेच दिसूं लागला. कां त्याचीच ही पहिली झलक होती ? गुलाब तरी किती जातीचे नि रंगाचे होते म्हणून सांगू! नेहरूंना प्रिय म्हणून राजकारणांतहि त्यांना स्थान मिळालेले. पण नेहरू गेले नि त्यांची शान गेली. पिता गेल्यावर पोरं पोरकी वाटावींत तशी नेहरूविना पोरक्या झालेल्या त्या गुलाबांकडे मला पहावेना.

जड अंतःकरणानें आंत गेलो. असंख्य स्मृती, आठवणी, वस्तु नि फोटो. महान कर्तृत्वाचा इतिहास. थोर पुरुषार्थाची लक्षणें. मानाचीं चिन्हें नि पराक्रमाचे स्तंभ. मोठा माणूस, फार मोठा माणूस. नेहरूंच्या खास पाहुण्यांची खोली, त्यांची स्वतःची बसण्याची–निजण्याची खोली. त्यांनी लिहिलेलीं नि वाचलेलीं पुस्तकें, त्यांनी जमविलेल्या नि त्यांना भेट म्हणून आलेल्या वस्तू, विद्यापीठांतून त्यांना मिळालेली पदके नि सन्माननीय पदव्या, जिथें ते बसले नि त्यांनी कामें केलीं त्या जागा नि जिथें त्यांनी कायमची विश्रांती घेतली ती जागा ! टेबलावरचा तो चष्मा, ती झरणी, ती दिनदर्शिका. सारे जसेच्या तसें तेथे आहे. तें पहातांना अभिमान वाटतो, आनंद वाटतो नि आज ते नाहींत म्हणून हृदय व्यथितहि होते. मागच्या बाजूला एक झाड आहे. उन्हाच्या वेळीं ह्या तरुतळीं ते वाचीत बसायचे. ती जागा पाहून हृदय गलबलून न जाणारा माणूस विरळाच. ह्या माणसानें हे सर्व केले केव्हां ? हीं पुस्तकें केव्हां लिहिलीं ? केव्हां झालीं ही एवढी महत्त्वाची कामें नि भाषणें ? हा गडी थकला कसा नाहीं ? दमला कसा नाहीं ? एक माणूस एवढ्या थोड्या वेळांत इतकीं प्रचंड

कामें कशी करूं शकला ? टीकाकारांनी एकदां इथं येऊन जावं. डोळे उघडून नि भरून पहावं. ते असतांना त्यांचा मोठेपणा कळला नाहीं. तो आतां ते गेल्यावर तरी कळेल. भारतावर नि भारतीय संस्कृतीवर प्रेम करण्यांत ते कोणालाही हार गेले नाहीत हे कळेल.


बंगला सोडतांना सारखे मनांत येत होतें कीं अशी किती तरी थोर थोर माणसें काळाच्या ह्या कराळ दाढेंत सामावलेलीं आहेत. आयुष्यभर केलेल्या धडपडीनंतरची चिरकाळ विश्रांति म्हणजेच त्यांचा मृत्यु ! नेहरूंना तरी खरी विश्रांति मृत्यूनंतरच मिळाली. मरण म्हणजे एक विस्मरण. पण नेहरू गेले नि स्मरणांत राहिले. समर्थांनीं म्हटलें आहे कीं “ मरावे परी कीर्तिरुपें उरावें ”. ही माणसें मृत्युंजय आहेत. मृत्यु म्हणजे महायात्रा....पण हिचा शेवट काय ? तत्त्ववेत्त्यांनी तत्वज्ञानाचं काथ्याकूट खूप केलें. पण मृत्यूचा अंत कुणीच सांगितला नाहीं. पुढच्या प्रवासाची निश्चित दिशा कुणालाच माहीत नाहीं. शेवटीं काय ? यशस्वी जीवन जगूनहि मृत्यूनंतर काय ? आपण कुठून आलों ? कशाकरतां आलों ? नि आता जायचं कुठें ? फक्त संतानीं सांगितलें कीं मरण म्हणजे अमर प्रकाश, अनंत प्रकाश....पण मृत्यू म्हटला कीं आपल्याला तर भीति वाटते. आपल्याला तर सारा काळोख दिसतो. संत हे धैर्याचे खेळिये आहेत. आपणाला हा खेळ कसा जमावा....?

विचाराच्या तंद्रींतच प्रवास झाला. देवाच्या द्वारांत विनम्र होऊन प्रवेश करायचा नि ह्या यात्रेंत ह्याचें उत्तर मिळते कां तें शोधायचें असा विचार करीत उतरलों. आतां रेल्वेचा प्रवास संपला होता. समोरची पाटी वाचली.

हरिद्वार !

किती सार्थ नांव आहे पहा ! हरिद्वार !! ज्ञानदेवांनीं हरिपाठांत म्हटलें आहे "देवाचिये द्वारीं" मनांत आले कीं ज्ञानदेवांना "हरीचिये द्वारीं" असें तर म्हणायचें नव्हतें ना ? कारण पुढच्या चरणांत त्यांनी म्हटल्याप्रमाणें हरिद्वारचें दर्शन झालें नि हातांत मोक्ष मिळाल्याचाच आनंद झाला.

भोंडल्यांत फेर धरून नाचणाऱ्या मुलींप्रमाणें गिरीकंदरांनी फेर धरुन वेढलेलें हें हरिद्वार ! हरिद्वारची गंगा हा गंगेचा पहिला अवतार म्हणून काकासाहेब कालेलकरांनीं तर ह्या हरिद्वारला 'जीवनतीर्थ हरिद्वार' म्हणून गौरविलें आहे.



गंगा कांठावर हरिद्वारसारखें सुंदर स्थान नाहीं. ब्रह्मदेवानें इथें उभें राहून गंगेचें स्वागत केलें, तर श्री दत्तात्रयानें दहा हजार वर्षे एकाच पायावर उभें राहून तप केलें. दक्षकन्या खऱ्या अर्थानें सती गेली तीं इथें! तो दक्ष यज्ञ. तो समर प्रसंग. पुराणांतल्या अशा कितीतरी गोष्टींशी हे हराचे द्वार असें निगडित आहे.

पुराणस्मृति चाळवीत स्टेशनच्या बाहेर आलो तर रस्त्याच्या मध्यभागींच गंगाधर महादेवाची पद्मासनीं स्थापलेली एक प्रसन्न प्रतिमा आहे. हे भगवान गंगाधरजी आपल्या दोन्ही खांद्यावर गंगेचें स्वच्छ पाणी स्वच्छंदानें ओतून घेत बसले आहेत.

हरिद्वार हिमालयाच्या पायथ्याशी वसलेलें आहे. म्हणून हिमालयाकडून वहात येणारा थंड शीतल वारा सर्वप्रथम हरिद्वारवासीयानांच स्पर्श करतो. इतका सुंदर शीतल वारा अन्यत्र कुठें मिळणार? हरीच्या पायरीवर उभें राहिलें कीं फुफ्फुसें शुद्ध हवेने नि मन आनंदानें कसें भरून जातें!

भारतीय जनता "आई" म्हणूनच गंगेचा गौरवपूर्ण उल्लेख करते. गंगास्नान नि गंगापूजन तर भारतीयांना किती प्रिय! मरतांना ज्या जलाचे दोन थेंब तरी तोंडात पडावेंत म्हणून धडपड असतें. तेंच हें पवित्र गंगाजल! शंकराच्या जटेंतून निघालेली, भगीरथाच्या पावन परिश्रमानें मिळालेली ही महान पवित्र गंगा! भारतीयांच्या अभिमानाचा नि आनंदाचा ठेवा. "गंगेंत घोडे न्हाले" म्हणजेच त्यांना बरें वाटायचें. पण ह्या श्रीमंत आईचे दर्शन कसे व्हायचे? म्हणून तर घंगाळांतले पाणी अंगावर घेतांना रोज "गंगा भागीरथी" म्हणून तिचे स्मरण करायचे नि तिच्या दर्शनाची इच्छा प्रगट करायचीं. "काशीस जावें नित्य वदावें" कशाकरता? तर गंगामाईच्या दर्शनाकरतां! गंगास्नानाकरतां!! भारतीय मनाला गंगेची ओढ अशी विलक्षण आहे.

मानवतेचा महान भक्त, निधर्मी राज्याचा भोक्ता नि भारताचे लाडके जवाहरलाल नेहरू यांनाहि गंगेविषयीं किती ओढ होती पहा. आपल्या मृत्युपत्रांत ते म्हणतात,

"भारताच्या आशाआकांक्षा, जयपराजय यांची गंगा ही साक्षीदार आहे. भारतमातेच्या विजयाची गाणी तिनें ऐकली आणि पराभवाचा आक्रोशहि तिने ऐकला. गंगा म्हणजे भारताच्या प्राचीनतम संस्कृतीचे, जीवनप्रवाहाचे प्रतीक आहे. वर्तमानातून वहात भविष्यकाळाच्या महान सागरांत एकरूप होणाऱ्या भारताच्या भूतकाळाचे गंगा हे मला एक प्रतीक वाटते, भव्य स्मारक वाटते. माझ्या सर्व मनीषांचा, भावभावनांचा साक्षीदार असलेल्या माझ्या देहाची थोडी तरी राख, म्हणूनच, गंगेत पडावी अशी माझी इच्छा आहे. भारताच्या सांस्कृतिक परंपरेला माझा तो अखेरचा प्रणिपात."

निधर्मी राज्याची ओढ असणाऱ्या गुलाबी माणसालाहि गंगेची हीं अशी अनिवार ओढ !

ही ओढ अनाठायी नाही. गंगा आहेच तशी ! !

## गंगाजल हृदयिं धरा

अमृताचा एक थेंब तरी मिळावा म्हणून इच्छा करावी नि समोर अमृतसागर दिसावा तशी गंगा पाहतांना माझ्या वेड्या भाविक मनाची अवस्था झाली. उगमापासून हरिद्वारीं येईपर्यंत गंगेनें सुमारें १५० मैल अंतर काटलें आहे. चौदा हजार फुटांइतक्या उंचीवरून आल्यामुळें पाण्याचा वेग भयंकर आहे. वेगवान नि ओघवत्या गंगेकडे पाहतांना भावविवश होऊन डोळ्यांतून गंगायमुना वाहूं लागल्या. हात जोडून म्हटले, "गंगामाई, तूं ईश्वर आहेस कीं नाहींस कोण जाणे ! पण ईश्वराचें स्मरण करून देणारी तूं एक पवित्र देवता आहेस ह्याची मात्र मला तिळमात्र शंका नाहीं."

घाटाची एक एक पायरी उतरून मी चालूं लागलों. पहिल्या पायरीला कालीदास आठवला. दुसऱ्या पायरीला जगन्नाथ पंडित सामोरा आला. तिसऱ्या पायरीवर कबीर तर चौथ्या पायरीला तुलसी. महाराष्ट्राचे ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ नि रामदास इथें येऊन गेले. गंगामाई तूं त्यांना पाहिलेस! भाग्यवान आहेस तू! कबिराचा दोहा नि तुलसीची चौपाई तुझ्या नादमय गतींत अखंड वहात आहे. विचारांच्या तंद्रीतच भक्तिभावानें गंगेत स्नानाकरतां उतरलो. वरतून कुणीतरी गंगास्तुति गात होतें.

"जय गंगे भागीरथी, हर गंगे भागीरथी."

ज्ञानदेवांनी म्हटले आहे, "गंगाजल हृदयीं धरा." खरोखर मोठ्या प्रेमानें मी गंगाजलाला मिठी मारली. असें गोड, सुंदर नि स्वच्छ पाणी उभ्या आयुष्यांत पाहिलें नव्हतें. एखाद्याचें मन "गंगाजला-प्रमाणें आहे" असें म्हणतात; पण म्हणजे तें मन कसें आहे? हें पहावयाचे असेल तर इथें या. तळ दिसावा असें स्वच्छ पाणी! शहाळ्याच्या पाण्याला काय गोडी असेल, स्फटिक काय स्वच्छ असेल नि नीलमण्याला कायचमक असेल? इथें तर यांचा त्रिवेणी संगम आहे!

अक्षरशः हजारों माणसें स्नान करत आहेत. माणसाचें शरीर म्हटलं कीं त्याला कसली व्याधी नि रोग नाहीं सांगा! पण ह्या वहात्या पाण्यांत इतकीं शरीरें स्वच्छ होत असतां ह्याला दर्प नाहीं कीं वास नाहीं. कुठें पालापाचोळा नाहीं कीं शेवाळें नाहीं. क्षणापूर्वी हातांत धरलेलें पाणी हातांत रहात नाहीं इतकी ओढ ह्या पाण्याला! उगाच नाहीं वर्षानुवर्षे बंद बाटलींतलें पाणी स्वच्छ राहात! पण इतकें असून गंगा मुग्धा आहे. लोकांची घाण धुऊनही ती स्वच्छ आहे. देवव्रत भीष्माला जन्म देणारी ही गंगामाता खरोखरच लोकोत्तर आहे.

गंगेतले मासे पहातांना देहभान हरपून जातें. टाकलेले दाणे खाण्यासाठीं तर लहान मुलांसारखे ते भांडतात नि एकमेकाला ढुशा देतात. शंतनुराजाची मत्स्यगंधा ह्यांच्या वंशांतल्या कुणा भाग्यवंताने पाहिली असेल; तर कुणी कर्णाची टोपली वाहतांना बघितली असेल. शकुंतलेची अंगठी ह्यांच्या कुणा पूर्वजांच्या पोटांत गेली असेल तर राघोबा दादाचे घोडे पाणी पितांना ह्यांच्या पूर्वजांनी न्याहाळले असतील. ज्या पाण्यांत बुडी मारण्याकरतां लक्षावधि लोक धडपडतात त्या पाण्याचा ह्या माशांना अखंड सहवास लाभावा, ह्या त्यांच्या भाग्याचा हेवा वाटला.

गंगेत मनसोक्त स्नान करुन पायऱ्या चढून वर येऊं लागलों तर घाट भाविकांनीं फुलून गेला होता. असंख्य फुलांप्रमाणें असंख्य माणसें होतीं तेथें. निरनिराळ्या रंगाचीं नि वर्णांचीं. तरुण होते, तरुणी होत्या. म्हातारे कोतारे होते. पंजाबी, गुजराथी बंगाली, मद्रासी नि महाराष्ट्रीयनहि होते. सारा हिंदुस्थान गोळा झाला होता तेथें. किती विविध धर्म नि भाषा, किती भिन्न आचार, विचार नि वेष. पण गंगामाईनें सर्वांना एकत्र आणलें होतें. एरवीं निरनिराळ्या प्रश्नावर भांडणारीं हीं मुलें गंगामय्या समोर गुपचूप उभीं होतीं. आपलीं भांडणे, आपले मतभेद पार विसरून गेले होते ते. आईपुढें मुलें कशीं भांडतील ? एवढे भिन्न भिन्न स्त्री-पुरुष. पण तिथें संकोच कोणाचा कुणाला ? जो तो आपल्या धुंदीतच स्नान करीत होता. कुणाला कळत नसलें तरीं मुलाच्या मनातलें पाप गंगामाईला कळत होतें. ती शरीरें स्वच्छ करीत होतीं नि मनेंहि !

प्रत्येक हिंदूनें आयुष्यांत एकदां तरी गंगेचें दर्शन घ्यावेंच.

पंड्याने हांक मारली म्हणून घाईघाईनें कुशावर्त घाटावर गेलों. माझ्या पुण्यतीर्थ वडिलांना आज पिंडदान करायचें ! मरणानंतर माणूस

कुठे जातो? गाडींत ह्याच विचाराचें मनांत काहूर माजलें होतें ना? त्याचें उत्तर इथें मिळालें. ज्यांनी मला लहानाचें मोठें केलें, माझ्या-करतां खस्ता खाल्ल्या, त्या माझ्या पूज्यपिताजींना ते गेल्यावर त्यांचा मुलगा म्हणून पिंडदान करून पाणी पाजायचे! केवढी गोड स्मृति! केवढी उदात्त नि मंगल भावना. केवढी कृतज्ञता. परंपरेचा केवढा अभिमान! ह्या परंपरेंत जन्माला आलेल्या प्रत्येक हिंदूनें परम पवित्र अशा गंगेचें आयुष्यांत एकदां तरी दर्शन घ्यावेंच.

"ह्या ठिकाणीं दत्तात्रयाने तप चालविलें असतां गंगा त्याचें कुशाशन घेऊन पुढे चालली होती. परंतु दत्ताच्या तपःसामर्थ्यापुढें तिला पुढें जातां येईना. तें कुशासन इथेंच फिरत राहिलें. तें इथे आव-र्तांत फिरलें म्हणुन याला कुशावर्त म्हणतात. अशी पंड्यानें माहिती दिली. मनोभावें ती ऐकून दत्तात्रयाचें स्मरण केलें व त्याच्या अंतर्भूत साक्षीनें मोठ्या आदरानें, श्रद्धेनें नि प्रेमभावनेनें वडिलांना पिंडदान केले. माझी श्रद्धा आहे की माझ्या पिताजींना ते पोहोचले असेल.

विविध जिनसांची बाजारपेठ म्हणून हरिद्वारचा लौकिक मोठा आहे. पुढच्या प्रवासाला लागणारे सामान खरेदी करून आम्ही कन-खल तीर्थाकडे पावलें वळवलीं.

### सतीची प्रेमकथा

दक्षेश्वराच्या मंदिरांत शिरतांना आजींची चेष्टा करीत मी म्हटले, "आजी, तुमच्या पार्वतीनेंहि वडिलांचे न ऐकतां शंकराशीं प्रेम विवाह केला हो." आजी काय बोलणार? 'मग पुढे काय झालं?' म्हणून एका तरुणीनें जिज्ञासापूर्वक विचारलें, माझी गोष्ट मीं पुढें सांगूं लागलों तशी सर्व मंडळी ऐकूं लागली. "पुढें काय होणार?" मी सांगूं लागलो. "सतीने प्रणयाधीन होऊन रुद्राला वरणें प्रजापतीला

मुळींच आवडलें नाहीं. घरीं यज्ञकार्य काढलें असतांना इतर अनेक मंडळींना बोलाविलें तरी आपल्या लेकीला मात्र दक्षानें बोलावलें नाहीं. माहेरीं बोलावणें कशाला? असा विचार करून नि मानपान बाजूला सारून ती आपणहून माहेरीं आली. दक्षाचे बाकीचे जांवई आमंत्रणानुसार आले. तेव्हां "आतां त्यांच्याप्रमाणें महादेवजींनाहि आमंत्रण द्यावें" असा तिनें आग्रह धरला. दक्षाने ह्या गोसावड्या जावयाला बोलावलें तर नाहींच पण त्याची यथेच्छ निंदा मात्र केली.



त्या मानीनीला ती निंदा सहन न होऊन पेटलेल्या अग्नीकुंडांत सतीनें उडी घेतली." माझ्या तोंडून कथा ऐकतांच अनेक भागिनींचे नेत्र पाणावले. बोलत बोलत आम्ही यज्ञकुंडापुढें आलों. सतीला गुलाबाचीं फुलें अर्पण केलीं नि महादेवजींना बिल्वपत्रें वाहिलीं. नंतर सतीकुंड नि गंगाघाट पाहिला. कनखल हें मोठें सुदर ठिकाण आहे. हरिद्वारला अलिकडे शहराचा छटा येत असली तरी कनखल मात्र अजूनहि तपोवनच आहे.

हरिद्वार पाहतां पाहतां दिवस कलंडला. संध्याकाळच्या वेळीं पुन्हां गंगेच्या घाटावर आरतीकरतां हजर झालो. सकाळ सारखीच आतांहि इथें गर्दी होती. पण आतांची गडबड निराळी नि सकाळची निराळी.

## जय गंगे भागीरथी

संध्याकाळ होत चालली तशी गंगेवरची गर्दी वाढूं लागली. काळोख पडूं लागला. हवेंतला गारठाहि वाढूं लागला. अशा सुंदर, स्वच्छ नि निकोप हवेंत मनें तरी मलीन नि अप्रसन्न कशी असणार? सारेच प्रसन्न होतें, माणसें हवा नि वातावरणहि. कर्दळीसारख्या हिरव्यागार पानांचे द्रोण तयार केले होते. त्यांमध्यें गुलाबाची फुलें होती. कडेला रंगीत पावळ्यांची किनार होती नि गुलाब शेजेवरतो कणकीच्या दिव्यांत फुलवाती ठेवल्या होत्या. दहा दहा पशाला एक एक द्रोण मिळत होता. एका फुलालाहि दहा पैसे द्यायला हरकत नसावी अशी सुंदर गुलाबी फुलें होती. मग द्रोणभर फुलें दहा पैशांत स्वस्त वाटली तर काय नवल? भराभर द्रोण संपत होते. आम्हीहि द्रोण घेऊन गंगाकाठीं आलो. दिवे लावले नि दिले द्रोण सोडून! गंगामाईला अर्पण—— गंगार्पण! बघतां बघतां ते द्रोण होडीप्रमाणें डोलत डोलत वाहूं लागले नि दृष्टीआडहि झाले. असंख्य भाविकांनी असंख्य द्रोण सोडले होते. नवीन नवीन द्रोण हेलकावत, मागेपुढें होत, गिरक्या घेत, पाण्यावरून वहात होते. पानांच्या हिरव्या बोटींतून गुलाबाची फुलें नौकाविहार करीत चाललीं होतीं. सबंध प्रवाहभर ज्योतींच्या टिकल्या नाचत होत्या. पोरामध्यें पोर खेळायला जावें, तसें नवे नवे द्रोण त्या जथ्यांत सामील होत होते. कांठावर माणसांची गर्दी नि प्रवाहांत दिव्यांची गर्दी. कुणी म्हणाले, 'काजवे चमकत आहेत.' कुणाला वाटलें, गंगामाईनें खडीचें पातळ नेसलं आहे तर

प्राजक्ताच्या फुलांच्या सड्याप्रमाणें, आकाशांतल्या चांदण्यांचा गंगा-पात्रांत सडाच पडला आहे, असाहि भास झाला कुणाला.

कितीतरी वेळ अनिमिष नेत्रांनी दिव्यांचा तो दीव्य खेळ पहात बसलों होतों. जीवनवेगांत ते दिवे झपाट्यानें वहात चालले होते. कांहीं मध्यें बुडत होते; कांहीं भोंवऱ्यांत सांपडत होते, तर कांहीं पैल-तीराला पोंहचत होते. मानवी जीवनहि असंच नाहीं कां? ह्या दिव्यांप्रमाणें प्रकाशमान, तेजोमय नि तरीहि अपूर्ण! भोंवऱ्यांत सांपड-णारे नि मध्येंच संपणारे! पैलतीराला यशस्वी रीतीनें पोंहचणारे दिवे किती थोडे! आणि यशस्वी जीवन जगणारीं माणसें तरी किती थोडी!! दुनिया म्हणजे एक वेगळंच गणित आहे खरं!

अशा ह्या प्रवासांत हे प्रवाही मन अनेक वेळां असें चिंतनशील कां होते कोण जाणे! असाच विचार करीत किती तरी वेळ बसलों असतों. पण आरतींची वेळ झाली. टाळ्या वाजूं लागल्या. नगारे झडूं लागले. मोठमोठे पलिते पेटले. गंगामाईची आरती रंगली. पलित्यांच्या लवलवत्या ज्वाळा गंगेच्या वाहत्या प्रवाहांत पाहिल्या, तेव्हां नृसिंह-अवताराची आठवण झाली. आरती चालू असतांनाहि गंगेमध्यें दीप-दान चालूंच होतें. मनांत आलें-आरती चालू आहे म्हणून तर गंगामाईनें हें प्रकाश--टिकल्यांचे भरजरी लुगडें परिधान केलें नाहीं ना? वाटलें, ही आरती संपूच नये.

पण आरती संपली, पलिते विझले. दिवे दिसेनासे झाले, माणसें पांगू लागली. गंगाकांठ जवळजवळ निर्मनुष्य झाला. अलकनंदा गात होती नि आम्ही ऐकत होतो. गाणाऱ्याच्या मागें तंबोरे लागावेंतना तसा गंगाप्रवाह अलकाच्या गाण्याला साथ करीत होता. गोड गळ्यानें ती गात होती.

जय गंगे भागीरथी । हरगंगे भागीरथी
चिदानंद शिव सुंदरतेची । पावनतेची तूं मूर्ति—

जीवाचे कान करून आम्ही ऐकत होतों. एरवीं सुद्धां हें गाणें अंगावर कांटे फुलविणारें ! नि हरीच्या पायरीवर गंगाकाठीं हे गाणें ऐकत असतांना देहभान हरपणार नाहीं तर काय होणार ? वाटलें हा क्षण सरूं नये. हें संगीत संपूं नये. पण घटकांमागें घटका धावणार होत्या. हे संगीत संपणार होतें. जीवन संगीतहि एक दिवस असेंच संपणार होतें.

पहा पहा, चिंतनशील मन पुनः भरकटूं लागलें. संपूं दे, संपूं दे जीवन ! नाहीतरी चिरकाल काय टिकणार आहे ? हरीच्या पायरीशीं होणारी ही आरती संपली तरी आरतींतून होणारा हा आनंद मात्र चिरकाल टिकणारा आहे. तो कधींच संपणार नाही. कध्धीं कध्धीं संपणार नाही. मृत्युशय्येवरहि हा आनंद आमचे जिवन उजाळूनच टाकील.

रात्रीं अंथरुणावर पडल्यावर सुद्धां गंगेमधून वाहणारा तो प्रकाश–टिकल्यांचा ओघ सारखा नजरेसमोर येत होता.

उद्यां हरिद्वार सोडायचें !

दुसऱ्या दिवशीं हृषीकेशला जाण्यासाठीं हरिद्वार सोडलें. हरीच्या द्वारांतून गेल्यावर आतां हरीचें दर्शन होणार, हो नक्कीच होणार. पण हरीचें दर्शन घेण्याआधीं ऋषींची भेट व्हावी, त्यांचा आशीर्वाद मिळावा म्हणून ही हृषीकेशाची भेट. नांवे तरी काय सुंदर आहेत पहा. पहिले हरीचे द्वार. आतां हृषीकेश. नांवापासून स्वारस्य आहे बघा !


हरिद्वारचा निरोप घेऊन दुसऱ्या दिवशीं हृषीकेशला निघालों. वाटेनें निसर्ग सौंदर्याची लयलूट होती. इथला निसर्ग समृद्ध आहे. उधळ्या नि थोडा बेफिकीरही आहे. हरिद्वार ते हृषीकेश १४ मैल आहे. मोटारीनें हें अंतर कापायला कितीसा वेळ लागणार? सभोवार पसरलेली वनश्री पहातां पहातां प्रवास केव्हां संपला तें कळलेंही नाही.

## तपोभूमि

हृषीकेश म्हणजे बाजारपेठ नि धर्मशाळा ह्यांचेच गांव आहे, असें प्रथम वाटलें. पण गंगेकाठीं उभें राहिल्यावर बाजूचे डोंगर नि त्यांना झांकणारी झाडी पाहून मन मात्र पालटलें. इथला गंगेचा आकार लक्ष्मणाच्या धनुष्यासारखा आहे. संध्याकाळीं बाहेर फिरायला पडणाऱ्या स्त्रीप्रमाणें इथली गंगा नीटनेटकी आहे. जास्त देखणी आहे. हरिद्वार रमणीय आहे तर हृषीकेश सुंदर आहे. अबोला धारण केलेल्या स्त्रीसारखें कमनीय नि शांत आहे. जिकडे पहावें तिकडे दाट झाडी, लहान मोठे डोंगर नि गंगेचें दुधाळ हिरवें पाणी!

ह्या गांवाचा रंग हिरवा आहे. पण तें हिरवें असलें तरी हिरवट नाहीं. असें शांत गांव मी तर पाहिलेंच नाही. माणसें इथें मुग्ध होतात नि मंत्रमुग्धहि. तपाला नि आराधनेला अशी सुंदर जागा दुसरीकडे शोधून सांपडणार नाही. त्रिवेणी घाट, ध्रुव घाट, शंकराचार्यांचें मंदिर, शत्रुघ्न मंदिर, भरत मंदिर, मुनी-कें-रेती, स्वर्गाश्रम पहातांना वाटेंत अनक लहान लहान झोंपड्या लागतात. त्यांत साधू नि संन्यासी अंतिम सत्याचा शोध घेत बसले आहेत. इथे आहेत इतके संन्यासी नि साधू अन्यत्र कुठेहि नसावेत. त्याच्या गांठीभेटी घेऊन त्यांना जीवन-विषयक प्रश्न विचारावेत, त्यांची दर्शने घेऊन त्यांचे आशीर्वाद घ्यावेत अशी फार इच्छा होती. पण वेळेच्या अभावीं ते जमले नाही.

हरिद्वारला जशी गंगेची आरती पहावी तसा हृषीकेशला लक्ष्मणझुला पहावा. त्या पुलाला खालीं कोठे खांब नाहींत. खऱ्या



अर्थाने तो झुला आहे. लोखंडाच्या बलदंड तारांवर लोंबकाळणाऱ्या नि जातायेतांना मंद हालणाऱ्या त्या झुलत्या पुलाची :कल्पना व योजना ज्याला प्रथम स्फुरली त्याच्या बुद्धिमत्तेची धन्य आहे. खालून गंगा उफाळत, फेसाळत नि घोंगावत वाहते आहे. दोन्ही बाजूचे डोंगर ह्या पुलानें जोडले गेले आहेत. वरती निळें आकाश, खाली हिरवे-निळें पाणी नि बाजूला गर्द झाडी आहे. निसर्गाचा रंगीत संगीत खेळ इथें डोळे भरून पहावा. या झुल्यावरून वाट पुढें कुठें जाते माहित आहे ? स्वर्गाश्रमांत !

स्वर्गाश्रमांत मूर्तिमंत शांति नांदत असते. घाई, गडबड, धांवपळ, गोंगाट यांना इथें बिलकूल थारा नाही.

लक्ष्मण म्हणजे मूर्तिमंत स्वार्थत्याग नि साकार सदाचार ! त्यानें रामाची अखंड निरपेक्ष सेवा केली. लक्ष्मणझुलाहि भाविक यात्रेकरूंची

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ७३६२५ दि


अखंड सेवाच करीत आहे. आज कितीतरी वर्षं संतचरणरज तो आपल्या माथ्यावर बाळगीत आहे. म्हणून त्याचें लक्ष्मणझुला हें नांव सार्थ वाटते.

इंद्रजित वधामुळें हातून घडलेल्या ब्रह्महत्येच्या पातक-क्षालनासाठीं लक्ष्मणानें इथेंच घोर तपश्चर्या केली. भारतभूमींत राम-मंदिरें पुष्कळ आहेत. पण रामावर निस्सीम प्रेम करणाऱ्या नि सर्व सुखाचा त्याग करून त्याच्यासाठीं वनांत जाणाऱ्या आदर्श लक्ष्मणाचें मंदिर मात्र इथेंच आहे.

ह्या गांवाचें सौंदर्य डोळ्यानें टिपीत नि मनांत सांठवीत केदाराला जाण्यासाठीं पुनः मोटारींत बसलो. माझ्या मनामध्यें नि ह्या निसर्गसुंदर गांवामध्यें मी असाच एक सुंदर लक्ष्मणझुला कायमचा बांधून टाकला. ह्या पुलावरून गंगातटाकी नि हिमालयाच्या पाय-थ्याशीं वसलेल्या त्या निसर्गरम्य गावांत मनानें मला केव्हांहि जातां येईल



मोटार आतां केदारच्या वाटेला लागली !

दरवर्षी उन्हाळ्यांत असंख्य यात्रेकरू, प्रवासी, भाविक, रसिक नि शास्त्रज्ञ हिमालयाची वाट चालूं लागतात. कुणी धार्मिक हेतूने वाट चालतो. कुणी प्रवासाच्या षोकाने भटकतो तर कुणी शास्त्रीय शोधाच्या हेतूनें रंगलेला असतो.


एका बाजूला प्रचंड कडा तर दुसऱ्या बाजूला खोल दरीं. समोर मोठी छोटीं झाडें. कुठें रुंद वाट तर कुठें अरुंद. मधून गंगा वाहते आहे. हरिद्वारपासून हिनें सोबत केली आहे.

मोटार चालू झाली. वस्त्राच्या घड्या उलगडाव्यात तसा निसर्ग आमच्यापुढें उलगडला जात होता. निसर्गाचें तें महावस्त्र खरोखरच भरजरी होतें. पर्वत शिखरांवर, झाडांच्या हिरव्या शेंड्यावर, अलकनंदेच्या फेंसाळल्या पाण्यावर सोनेरी उन्हे पडलीं होतीं. मल्लीया,–निसर्गाची कीर्ति गाणारे कीर्तिनगर, श्रीनगर, रुद्रप्रयाग, आगस्तीमुनींचा आश्रम मागें टाकीत मोटार भरधांव चालली होती. कुंड आले. मोटारचा प्रवास संपला होता. दुपारचे तीन वाजले असतील. पण दिशा-ढगाळ हवेने धुंदावल्या होत्या, झोपेला आलेल्या मुलाप्रमाणे. दिवस मरगळला होता. आमचीं अंगेहि मोटारच्या प्रवासानें आंवली होतीं. पूल ओलांडून पलीकडे गेलों. गरम गरम चहा घेतला नि वाट चालूं लागलो. दिवे लागायच्या आंत गुप्तकाशीला पोंहचायलाच हवें होतें.

वाटेंत चालतांना प्रथमच हिमशिखरांचें दर्शन झालें. सौ. कुसमीला दाखवायला गेलों तर गोषांतल्या स्त्रीप्रमाणें त्यानीं लागलीच तोंड झांकून घेतले. चालतांना वळण आलें नि तें एका भल्या मोठ्या डोंगरामध्यें झाकलें गेलें. मध्येंच तें उन्हांत चमकतांना दिसे तर मध्येंच नाहीसें होई. असा बराच वेळ आमच्याशीं लपंडाव खेळत होतें तें.

इथला निसर्ग सुंदर खराच! पण सुंदर स्त्रीप्रमाणें लहरीहि आहे. जसें बघतां बघतां तें हिमशिखर दृष्टिआड झाले तसें पाहतां पाहतां ते सुंदर सोनेरी उन्हहि नाहीसें झालें. दिशा काळवंडून गेल्या. जणूं निसर्गाला कुणाची दृष्ट लागली. थोड्याच वेळांत दृष्ट लागलेल्या लहान मुलाप्रमाणें आकाश रडूं लागलें. भाईंनी बरोबर रेनकोट ठेवायला सांगितला होता. तसा आम्हीं तो ठेवलाहि होता. पण पाऊस असा झपाट्यानें नि अचानक आला कीं पिशवींतला रेनकोट काढून अंगावर चढविण्याच्या आधींच त्याला आम्हाला भिजवून टाकायचें होते.

पण खटयाळ पावसापेक्षां आम्ही जास्त चपळ होतों. तरीसुद्धां थोडें भिजवलेंच त्याने! पाऊस थोडाच पडला. पण प्रभाव दाखवून गेला. रस्ते निसरडे केले. आलेल्या पाहुण्यांचे असें कां स्वागत करायचें? कां स्वागत करण्याची पहाडी पद्धत ही अशीच? गुलाबपाणी शिंपडावे तसें तो चार थेंब शिंपडून गेला खरा. पण हवा मात्र गार करून गेला. पण बडी मजा आली ह्या धामधुमींत. गुप्तकाशी केव्हां आली ते कळलेंहि नाही.




गुप्तकाशी

गुप्तकाशीला आलों तर करकरीत तिन्हीसांजा झाल्या होत्या. तिन्हीसांजा झाल्या तरी दिवस रेंगाळला होता. चंद्र जणूं सूर्यास्ताचीच वाट पहात होता. दिवस पूर्ण मावळलाहि नव्हता, तरीसुद्धां चंद्रिकेनें आपला अंमल बसविण्यास सुरुवात केली होती. काळोख नि गारठा बरोबर वाढूं लागला. कढत कढत चहा घेऊन बाहेर गॅलरींत आलों. समोर हिमाच्छादित शिखरांची रांगच्या रांग दिसत

होतीं. वैशाख शुद्ध द्वादशीचें शुभ्र चांदणें बर्फावर पडलें होतें. आकाशांतील चंद्रबिंब कुणाची तरी वाट पहात थबकलें होतं. तें दृश्य पाहून डोळे तृप्त झालें. त्या चांदण्या रात्रीनें त्या निसर्गाला एक निराळेंच स्वरूप प्राप्त झालें होतें. तें अनुपम दृश्य बघतांना थकवा निघून गेला.

चाल अशी व्हावयाची कीं विछान्यावर अंग टाकण्याची खोटी, डोळे मिटलेच म्हणून समजा. सकाळीं जाग येऊन उठावे नि घड्याळ्यांत पहावे तर फक्त पांचच वाजलेले असावेत. पण बाहेर मात्र लख्ख उजाडलेलें असायचें. आपल्याकडे ६॥–७ ला उजाडावें ना तसें. दिवसभराच्या चालीनें नि श्रमानें जीव थकून जायचा. पण सकाळीं उठल्यावर वाटायचें कीं छे, काल आपण कांहीं चाललोच नव्हतो. अशी मजा बघा हवेची !

गुप्तकाशीला काशीविश्वेश्वर गुप्त आहे. इथें गुप्तदान करण्याचीं पद्धत आहे. दान करायचें नि बोलायचें नाहीं. उपकार करायचा नि सांगायचा नाही. सुवास देता देता चंदनासारखें झिजूनहि जावयाचें पण तोंडून ब्र काढायचा नाहीं. उदात्त शिकवण आहे गुप्तकाशीची !



गुप्तकाशी सोडली नि पुढें चालूं लागलों. नालाचट्टी मागें टाकली. ओझ्यानें वाकलेल्या दोन तीन सुंदर स्त्रिया सामोऱ्या आल्या. गोऱ्यापान, देखण्या, तरतरीत नाकाच्या नि कानानाकांतील अलंकारानें नटलेल्या. आमच्याकडे त्यानी सुईदोरा मागितला. भरपूर थंडी म्हणून इथें कपडा खूप पाहिजे नि तो फाटला तर शिवायला सुईदोरा हवाच. म्हणून इथे त्याला मागणी फार. त्यांना सुईदोरा दिला तर सशासारखीं

पोरें धांवत आलीं. त्यांनी पै-पैसा मागितला. अवघ्या जगानें ह्या पैशा-भोवतीं कसा फेर धरला आहे बघा!

निसर्ग सुंदर ! माणसें सुंदर !!

निसर्ग सुंदर, माणसें सुंदर, हवा सुंदर! पण, ह्या पैशानें इथल्या माणसांनाहि ग्रासून टाकले आहे. पोटाकरतां–पैशाकरतां केवढी धडपड चाललेली असते इथे! डोंगर चढतांना स्वतःचा जीवहि नकोसा होतो तिथे ही गढवाली माणसें दुसऱ्याचा जीव सांभाळीत तो उभा पहाड चढताना दिसतात. पाहिलांत तो गढवाली? केवढी लठ्ठबाई त्या टोपलींत बसली आहे नि त्या टोपलीसकट तिला घेऊन तो कसा चढत आहे. तुम्हाला थंडी वाजते ना? नि कष्टामुळें तो मात्र घामानें कसा निथळून गेला आहे पहा "पोटासाठीं दाहि दिशा आम्हां फिरविसी तूं जगदीशा"—अगदीं खरें आहे. माणसाच्या मागें पोट नसतें तर? पण विचार करीत असें वाटेंत उभें राहून चालणार नाही. ती पहा घोड्यावरुन माणसें आलीं. ज्यांना चालवत नाहीं तीं घोड्यावर बसतात नि ज्यांना घोड्यावर बसता येत नाही ती कुंडी, दंडीत बसतात.

वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरें

चालतां चालतां तीन मैल झालें कीं. नारायणकोटी आलें. ती पहा उजव्या हाताला किती जुनाट नि पुरातन देवळे आहेत. सप्तग्रहांचीं ती फार प्राचीन नि पुरातन मंदिरें आहेत. त्यांच्यापुढे पायऱ्यांपायऱ्यांनीं वर चढत गेलेलीं ती पठारें. व्यंगतळ्ळा नि व्यंगमळ्ळा गांवे तरी किती देखणी आहेत नाही? वाटेतला हा पहा केसाळ मेंढ्यांचा कळप. त्यांच्याहि पाठीवर ओझीं. माणसाच्य श्रमांतला वाटा ती मुकी जनावरें ओझीं उचलून कमी करीत आहेत. आम्हाला मात्र मुक्या जनावरांची कदर नाही.

वाटेंत कितीतरी प्रकारचीं झाडें आहेत. जर्दाळू, बिब्बा,

तमालपत्रें, भूर्जपत्रें. त्या झाडांवर फुललेली तांबडी, पिवळी, जांभळी, टिकल्यांसारखी नि चांदण्यासारखीं ती इवली इवली फुले. त्या फुलांकडे पाहिले कीं इथे दिवसांच जमिनीवर चांदण्या उगवल्या आहेत असे वाटायचे. कांहीं झाडांवर निसर्ग देवतेनें शेवाळ्याचा स्वेटर चढविला होता. झाडांना थंडी वाजूं नये ना, म्हणून हो! थंडीमुळे कांहीं झाडे एकमेकांना कशीं बिलगून वाढलीं होतीं. कांहीं झाडे खुजीं होतीं तर कांहीं ऊंच होती. कांहीं झाडांत माणसांसारखीं व्यंगे दिसलीं. कांहीं बहिरी तर कांहीं मुकी वाटलीं. कांहीं रागीट दिसलीं तर कांहीं प्रेमळ भासलीं. कांहीं आनंदीत तर कांहीं झाडें वृद्ध होतीं तर कांहीं तरुण, कांहीं भित्री बावळट तर कांहीं शाळेत जाणाऱ्या मुलांसारखी निरागस. वाढतांनाहि ती एका रांगेत उभ्या असलेल्या मुलांसारखी सरळ रेषेत वाढलीं होतीं. कांहीं माकडासारखी दिसत होती तर कांहीं दिव्यांच्या झुंबरासारखीं. कांहींत क्रोर्य एकवटले होते तर कांहींत देवत्वाचा साक्षात्कार होत होता झाडांची अशी मजा कधीं पाहिलीच नव्हती. वनस्पतींचे असे दर्शन कधीं झालेच नव्हते. असे बोलके नि डोळे दिपवणारे! जशी वनस्पती तशीच माती. पायाखालीं बघावे तर कधीं सोनेरी मऊ माना तर कुठे चांदीसारखी पांढरीशुभ्र माती. कुठे तांबडे दगड तर कुठे हिरवे. कुठे अभ्रकाचे खडक तर कुठें काळा कभिन्न खडक. रंगीत चित्र काढल्यासारखा इथला निसर्ग रंगीत आहे. काय म्हणतां? कांहीं दगड ओले नि पाझरल्यासारखे वाटतात ना? बरोबर आहे. इथला सुंदर निसर्ग पाहून दगडहि स्नेहार्द्र झाले आहेत.

पऱ्यांचा गांव

निळे आकाश, हिरवी दरी, पांढरे पाणी, चंदेरी बर्फ, सोनेरी उन्हं, नि दोन भव्य खांबांना झुला टांगलेला. मखंडा आले. गुलाबाच्या हसऱ्या ताटव्यांनी आमचे सहर्ष स्वागत केले. झोपाळ्यावर बसून आणि

झोके घेतले. खूपखूप झोके घेतले. झोका सोडतांना जिवावर आले होते. पण पुढच्या मुक्कामाला लवकर जाणें आवश्यक होतें. तो झुला सोडतांना सारखें वाटत होते दिवसां जर इथें इतकी शांतता आहे तर रात्रीच्यावेळीं किती शांतता असेल ! त्यावेळीं ह्या दऱ्याखोऱ्यांतून वनराणी येत असेल, पऱ्या येत असतील. इथें झोंपाळ्यावर बसत असतील. खेळ खेळत असतील नि गाणीं म्हणत असतील. त्यांचें दर्शन मला कधीं होईल कां ? तो खेळ मला कधीं दिसेल कां ?

फाटाचट्टी, बडासु, सीतापूर, रामपूर, मागें राहिले नि डाव्या हातानें ही त्रिजुगीनारायणाच्या रस्त्याची चढ सुरुं झाली. इतकी वाटचाल झाली तरी चालीचें कांहीं वाटलें नाहीं. पण त्रिजुगीनारायणाच्या चढाईनें मात्र तोंडाला फेंस आला. पण निसर्ग रिझवीत होता. जसजसें वर जात होतो तसतशी पहाडी शोभा व निसर्गाची भव्यता वाढत होती.



मधूनमधून खालच्या गांवातल्या झोंपड्यांतून निघणारे धुराचे लोट वर आकाशांत जातांना दिसत होते. मध्येंच वाहणारे झरे खळाळून हंसत विचारीत "दमलांत? छे छे, आतां चढण कांहीं फार नाही कांहीं" नि धीर देत. त्या हंसऱ्या निर्भर निर्झरांचा निरोप घेऊन पुढें जावें तर खोल दरी दिसे. आज चढ खूप असल्यामुळें उशीर झाला. उन्ह खूप झालें तरी झाडांच्या फांद्यानी त्याला वर पकडून ठेवल्यामुळें वाटसरूंना त्याचा त्रास होऊं शकत नव्हता. त्या झाडावर किती सुंदर पक्षी आहे पाहिलांत. आकार चिमणीचा नि रंग पोपटाचा. कसा सुंदर नाचतो आहे. किती छान माना डोलवीत चालतो आहे, फांद्या फांद्यावरून. पहा, पहा, पाण्यांत सूर मारावा तसा त्या खोल दरींत सूर मारीत निघूनहि गेला की तो.

नारायण ! नारायण

आले. त्रिजुगीनारायण आलें. इथें शंकर पार्वतीचा विवाह झाला. त्या दिवसापासूनचा अग्नी अजूनहि जळतो आहे इथे. त्यांत लज्जाहोमाच्या लाह्या टाकल्या. तो पवित्र अग्नी अखंड जळत रहावा म्हणून पैसे देऊन त्यांत काष्ठेहि टाकली.

दुसऱ्या दिवशीं पुनः निसर्गाच्या सुंदर सुंदर दालनांतून आमचा पायीं प्रवास सुरुं झाला. काल चढतांना तोंडाला फेंस आला होता. आज उतरतांना अशी मजा वाटली कीं विचारूं नका. बघतां बघतां अंतर कापलें गेलें. शाकांबरी देवी तर बरीच मागें पडली.


सोनप्रयाग

सोनप्रयाग! इथें त्रिजुगीनारायणापासून आलेली सोन नि केदारापासून आलेली मंदाकिनी यांचा सुरेख नि रेखीव संगम झाला आहे. इथे निसर्गाचें सोने झालें आहे. सोन–प्रयाग हे नांव बिलकूल सार्थ आहे. संगम! नद्यांचा संगम. देवभक्तांचा संगम. मनामनांचा

संगम. वृक्षवेलींचा संगम. मातृभक्तीचा संगम. आकाश नि गिरीशिखरांचा संगम. फळाफुलांचा संगम. संगमाच्या ठिकाणीं पावित्र्य असतें नि इथें तर सारेच संगम झालेले. पावित्र्याचा रंग पांढरा असतो तर इथें पांढरा शुभ्र बर्फ चहूंकडे पसरला आहे. प्रभूचा रंग निळा असतो तर इथें आकाशाचा रंग निळा आहे. स्वच्छ आहे. कधीं ढगाळ झालेंच तर तें मथुरेंतल्या सावळ्या कृष्णाचा वर्ण धारण करतें. भक्तीचा रंग हिरवा तर इथें झाडें हिरवीगार आहेत.

दचकलांत कां? अति पवित्र नि विघ्नहर्त्या गणराजाला इथें मस्तक नाही म्हणून ना? त्याचें मस्तक कुणी छाटलें?

ऐका तर. पार्वती स्नानाला बसलेली. महादेव बाहेरून येतील म्हणून त्यांना सांगण्याकरतां पार्वतीनें आत्मशक्तीनें निर्माण केलेला गणपती दारावर बसविला. वास्तविक पार्वती स्नान करतांना शंकर आले तर कुठें बिघडले? पण भारतीय नारीची स्त्रीलज्जा मोठी मोहक आहे हेंच खरें! एरवीं पतीला सर्वस्व देण्यांत तिला कांही वाटायचें नाहीं. पण तोंच पति स्नान करतांना समोर आला तर तिला खपायचें नाहीं. दिसायला वेड्यासारखें दिसलें नि चमत्कारिक वाटलें तरी त्यांतली



गंमत खऱ्या रसिक मनालाच कळावी. हं, तर काय सांगत होतो-शंकर बाहेरून आले. गणराज त्यांना आंत जाऊं देईनात. हा कोण उपटसुंभ आपल्या घरांत जाण्यास आपल्याला अडविणार? म्हणून क्रोधायमान होऊन महादेवांनी गणराजांचें मुडकें उडविलें. तोच हा मुंडकाटा गणेश!

जसें सबंध भारतांत हृषीकेशशिवाय लक्ष्मणाचें देऊळ अन्य कुठेंहि नाहीं, त्याप्रमाणें शिर नसलेल्या गणपतीचें मंदिर भारतांत अन्यत्र कुठेंहि नाही. पवित्राणां पवित्र अशा मंगलमूर्तीची शिर नसलेली प्रतिमा पाहतांना कसेसेंच होतें. बिचाऱ्या पार्वतीला त्यावेळीं काय झालें असेल ?

## आईनें स्नानाला कढत पाणी दिलं

आलेंच गौरीकुंड ! शंकराच्या लाडक्या गिरिजेनें इथेंच स्नान केलें. त्या रूपवंतीच्या स्नानाची ही जागा किती सुंदर आहे. उगाच नाही श्रीमंत माहेर सोडून ती सांबसदाशिवाची स्वामिनी झाली. बर्फाचे मुकुट घातलेल्या डोंगरांच्या फेऱ्यांत असें कढत कढत पाण्याचे कुंड तिला माहेरीं कधीं लाभलें असतें कां ? कैलासाच्या वैभवाची सर कां तिच्या माहेराला येणार आहे ? तिचा सांब भोळा नि दरिद्री असला तरी त्याचा कैलास देखणा नि श्रीमंत आहे. गिरिजे, खरोखरच तूं थोर भाग्याची आहेस !



त्या दिवशी सगळ्यांनी गौरीकुंडाच्या कढत कढत पाण्यांत स्नान केलें. थकलेलीं शरीरें शांत झालीं. नव्या दमानें वाटचाल पुनः सुरुं झाली.

त्या रात्रीं जंगलचट्टीला मुक्काम झाला. फाटक गुरुजींचें मंगल प्रवचन झालें. बारा ज्योतिर्लिंगाचा श्लोक म्हटला गेला.

वद वद वद रसने, शिव सांब सांब सांब सांब.

विश्वेशा बद्रिनाथ महांकाल........

प्रवचन झाल्यावर बाहेर आलों. समोरच्या कड्यावरून पाण्याचा प्रवाह धों धों वहात होता. आम्ही थांबलों तरी तो थांबला नव्हता. आकाशांतलें चांदणें नि डोंगरावरचें पाणी घेऊन इतक्या ओढीनें तो रात्रीचा कुठें जात होता कोण जाणे !

केदारच्या ओढीनें सकाळीं नेहमीपेक्षां लौकरच जाग आली. चट्टींतून बाहेर आलों. अजूनहि तो अवखळ निर्झर पित्याच्या खांद्यावरून अंग झोंकूनच देत होता. त्याच वेगानें नि उत्कटतेनें उजाडूं लागलें तसें मोतीया रंगाचें चांदणें हळूं हळूं मावळत गेलें. यात्रिक ओढीनें वाट चालूं लागले.

पुन: चढणें, उतरणें. दु:सह थंडी. दुर्गम पहाड, दऱ्याखोरी, नद्यानाले. भयाण अरण्यें नि मनांत केदारनाथाच्या भेटीची अपार उत्कंठा !

वाटेंत एक चिंध्या भैरवाचें छोटेसें मंदिर लागतें. यात्रिकांची यात्रा सुफल व्हावी म्हणून ह्याला चिंध्या वाहण्याची चाल आहे. तेथें विसावा घेतला. पाणी प्यायलों नि पुढें चालूं लागलों.

वाटेंत मंदाकिनी पुन: पुन: दर्शन देत होती. मला वाटलें कीं एखाद्याकडे आपण गेलो कीं त्याची लहान मुलगी पाहुण्याचें स्वागत करायला जशी धांवत धांवत येतें नि त्याचें बोट धरुन त्याला घेऊन जाते तशी ही मंदाकिनी यात्रेकरुंचें स्वागत करण्याकरतां धांवत धांवत आली आहे. आपलें बोट धरुन तीच आतां आपल्याला केदाराला घेऊन जाणार आहे.

आज चार दिवस वाटचाल झाली. आतां आजचा शेवटचा

टप्पा. आतां चाल संपणार. भक्ताचें माहेर येणार. मनाला पूर्ण विश्राम मिळणार. घेतलेल्या श्रमांचे नि कष्टांचे, झालेल्या उपासमारीचें नि सहन केलेल्या थंडीउन्हाचें सार्थक होणार!

जीं हिमशिखरें दूर होतीं तीं आतां जवळ जवळ येऊं लागलीं. जवळ जवळ ३० मैल चढउतार असलेली चाल झाली. ११७०० फूट चढ चढलों. गरुडचट्टी मागें टाकली. सारी जमीन शुभ्र दिसूं लागली. सगळीकडे बर्फच बर्फ. पांढरा शुभ्र बर्फ. चांदीच्या रंगाचा बर्फ. कळीच्या चुन्यासारखा. दुधासारखा! खाली मंदाकिनी कापूस पिंजीत वाहते आहे. देवदेखणींवरुन तर शिवाचे मंदिरहि दिसूं लागले.

तो उत्तुंग हिमालय. त्याचीं तीं हिमधवल गगनचुंबी शिखरें नि त्यांत बर्फाची शाल पांघरुन बसलेलें तें शिवालय!


शिवशंकराऽगिरीजावराऽऽ

सर्वच तीर्थयात्रा पुण्ययात्रा आहेत. पण बद्रिकेदार ही पुण्यतम यात्रा आहे. वैदिक कालापासून बद्रिकेदाराचें स्थान अढळ आहे. ती एक अमृतयात्रा आहे. रावणवधानंतर रामराय लक्ष्मणासमवेत तपश्चर्येसाठीं येथेच आले होते. ११७५२ फूट उंचीच्या व्यासपीठावर बसून केदारनाथ हिंदुस्थानांतल्या असंख्य भागांतून भाविकांना आपल्याकडे खेंचून आणीत आहे. मंदाकिनीला खंड नाही नि यात्रेकरूंची रीघही तुटत नाही. साऱ्या वाटभर "केदारनाथजी कीं जय" म्हणून गजर चालूच असतो.

हिवाळ्यामध्यें बर्फाची शाल पांघरून बसलेला हा सांबसदाशिव वसंताच्या चाहुलीनें खडबडून जागा होतो. बर्फ फोडीत पुजारी येतो. साडेतीन मुहूर्तापैकीं अक्षय्य तृतियेला देवळाचें दार उघडलें जातें. लोंढ्यानें आलेले यात्रेकरू दारांतून आंत येतात तर एकदां तेल घालून लावलेला दिवा सहा महिने तसाच जळत राहिलेला दिसतो. ती

जिवंत साक्ष पाहून त्यांना कैलासपतीचा साक्षात्कार होतो. आदरानें त्यांचीं मस्तकें नम्र होतात. खडतर वाटेंतून जगवलेल्या भक्तीच्या वेलीला सुंदर फळ आलेलें असतें.

केदाराचें मंदिर फार मोठें नाहीं. पण त्याची बांधणी मजबुतीची नि शिलाप्रधान आहे. हिमालयांतील वादळें, हिमवृष्टि यांच्या दुःसह



माऱ्यापुढें तें आज हजारों वर्षे अभंग उभें आहे. भोवतालचा हिमप्रदेश जसा देखणा आहे तसें एक मानवी कलाकृति म्हणून हें देऊळहि मोठें कौतुकास्पद आहे. हे मंदिर पांडवांनी बांधले, असें म्हणतात.

पांडवाचा विषय निघाला तशी सौ. कुसमी सांगू लागली नि आम्ही एकू लागलों. आयुष्याच्या संध्याकाळीं पांडव इथें आले नि इथून स्वर्गाला गेले. पण वाटेंत द्रौपदी प्रथम पडली. पांच नवऱ्यांवर सारखें प्रेम न करतां अर्जुनावर तिनें जास्त प्रेम केलें, म्हणून स्वर्गांत जाण्यास तिचें पुण्य कमी पडलें. नंतर पडले नकूल नि सहदेव. आपल्या रूपाचा नि ज्ञानाचा त्यांना गर्व झाला म्हणून. नंतर पडले भीमदेव. अति खादाड! "माझ्यासारखा दुसरा धनुर्वेधी नाही" म्हणून गर्व झालेला अर्जुनहि पडला. आणि शेवटीं सुख नि दुःख,

सारख्याच निःस्पृह स्थितीनें भोगणारा धर्मराज मात्र स्वर्गांत गेला. संध्याकाळीं वाढत जाणाऱ्या गार वाऱ्याच्या झुळका अंगाला झोंबू लागल्या. संध्याकाळच्या आरतीची घंटा वाजूं लागली. तसें आम्ही उठलों नि केदारेश्वरापुढें उभे राहिलों.


केदारनाथ स्वयंभू नि निराकार आहे. भक्त जसा कल्पक नि प्रतिभासंपन्न असेल तसें त्याला दर्शन मिळतें. कर्पूरारतीच्या प्रकाशांत शंकराचें दर्शन घेतलें नि हात जोडून शिवस्तवनास सुरवात केली.

कैलासराणा शिव चंद्रमोळी। फणींद्र माथां मुकुटीं झळाळी।
कारुण्यसिंधू भवदुःखहारी। तुजवीण शंभो मज कोण तारी॥

ज्याच्यासाठीं अट्टाहास केला होता त्याचें दर्शन झालें. डोळ्याचें पारणें फिटलें. मनाचें समाधान झालें. धरलेली जिद्द संपली नि थंडीनें घेरुन टाकलें. भराभरा दारें खिडक्या बंद केल्या. होतें नव्हते तेवढे कपडे अंगावर चढविले. दोनदोन दुलया अंगावर घेतल्या नि समोर ठेवलेल्या शेगड्यांची ऊब घेत फाटक गुरुजींचे रसाळ प्रवचन ऐकूं लागलो. रात्रीं भजन झाल्यावर गादीवर अंग टाकलें नि क्षणार्धांत नेत्रदळें मिटून गेली.

सकाळ उल्हासानें नि प्रसन्नतेनें उगवली. बाहेर आलो तर नगाधिराजाचे दीव्य दर्शन झाले. आसमंत हिमराशींनी वेढलेला होता. हिम गौर पर्वतांवरून वहात येणारे चांदीचे जलप्रवाह शंकराच्या गळ्याला विळखा घालणारे सर्पच भासले. उन्हे पडली तेव्हां मंदिरामागिल हिमालंकृत शिखरांना कांहीं आगळीच शोभा प्राप्त झाली. सोनारानें आपल्या कुशल हाताने चांदीच्या मुगुटांना जसे सोन्याचे पाणी द्यावे त्याप्रमाणे रविकिरणानी पांढरी गिरिशिखरें सोनेरी मुलाम्याने मढविलीं होतीं. ते दृश्य पाहून डोळ्यांची पारणी फिटली.

प्रसन्न मनानें शिवमंदिरांत प्रवेश केला. सुस्नात देहानें नि सुमनानें त्याच्या पाठीला तूप चोळलें व बरोबर आणलेले सोन्याचें



बिल्व पत्र महादेवाला वाहिले. हातावर प्रसाद देत पुजारी सांगत होता "ज्याला तुम्ही तूप चोळलेत ती शंकराची पाठ आहे. त्याचे मस्तक नेपाळांत आहे. पुढच्या वर्षी नेपाळांत पशुपतीला जाऊन त्याचे दर्शन घ्या." "जरूर जाऊ नि पशुपतीश्वराचें दर्शन घेऊ" असे म्हणून देवळाबाहेर आलो. सभोवार पांढरा शुभ्र बर्फ पाहून आतली शिव-भावना ज्ञानदेवांची ओवीं म्हणूं लागली.

स्थावरां गिरीं आंतु। पुण्यपुंज जो हिमवंतु ॥
तो मी म्हणे कांतु। लक्ष्मियेचा ॥

फलाहारी बाबा

देवळाच्या डाव्या बाजूला एक खोली आहे. तेथें फलाहारी बाबा राहतात म्हणून कळलें. त्यांच्या दर्शनाकरतां गेलो. सर्व बाजूंनी बंद अशी ती एक खोली होती. तींमध्यें एक धुनी पेटली होती. तिच्या समोर हे फलाहारी बाबा बसले होते. काळसर रंगाचे नि किडकिडीत अंगकाठीचे असे ते एक सामान्य पुरुष होते. त्यांच्या चेहऱ्यावरची हाडें दिसत होती. डोळ्यावरची हाडें पुढें आली होती. डोळे खोल गेले होते. पण तेथेच त्यांची तपस्या एकवटलेली दिसत होती. असें तेजस्वी डोळे क्वचितच दृष्टीस पडतात. सगळीकडे जेव्हां बर्फच बर्फ होते तेव्हां तें छोटे गांव उठून खाली जाते. पुजारीही देव घेऊन उखी-मठाला जातो. त्यावेळीं हे फलाहारी बाबाच फक्त इथें राहतात. एवढ्या थंड प्रदेशांत नि पांढऱ्या शुभ्र बर्फाच्या सान्निध्यांत बारा महिने राहूनहि हे फलाहारी बाबा एवढे काळे कां? हे एक गुढच होते. हमाली करणारे

गोरगरीब गढवालीं जेवढे गोरे नि देखणे होते तेवढे सुद्धां हे फलाहारी बाबा तेजस्वी वाटले नाहींत. बाबा बारा महिनें फळें खाऊन राहतात म्हणून त्यांना फलाहारी बाबा असे म्हणतात. पण ह्या ठिकाणीं एक देखील झाड उभे नसतांना ह्यांना फळे देतो कोण? हेहि एक कोडेच होते. त्या तापसानें आमची चौकशी केली. आम्हीं रुपया दिला त्याचा अव्हेर केला नाहीं. आमच्या प्रश्नोत्तरामध्यें "मी फळाशिवायहि आहार घेतो" असें सांगितलें. ते फलाहारी नव्हते, तर मित आहारी होते नि मितभाषीहि. त्यांचा प्रामाणिकपणा मला आवडला. आमच्या गोष्टी चालू असतांनाच लोक येत नि दर्शन घेऊन जात. गोरगरीबांची मात्र या बाबांवर खूप श्रद्धा दिसली. सूर्याची किरणेंहि दारांतून येऊन बाबांच्या पायांचे दर्शन घेऊं लागली तेव्हां बाबांचा निरोप घेऊन आम्ही शंकराचार्यांच्या समाधीकडे पावलें वळविली.

प्रणाम कोटी तयांना........

मंदिरापासून शंकराचार्यांची समाधी फार लांब नाही. अगदीं शंभर एक पावलांच्या आंतच आहे. सूर्याचे कोवळे ऊन्ह शुभ्र बर्फाच्या अंगाखांद्यावर लहान मुलाप्रमाणें बागडत होते. जातांना मनांत आलें कुठें केरळ नि कुठें गढवाल. भारत भ्रमंती करून विश्रांती-साठीं इथें आले! विचार करतां करतां शंकराचार्यांची सारी जीवनगाथा डोळयासमोर उभी राहते न राहतें तोंच ह्या योग्याच्या समाधीचें स्थान आले. समाधीच्या चारी बाजूंनीं फुलांची पखरण असावी तशी इथें बर्फाची पखरण होती. वरती अथांग निळें आकाश नि खालीं पांढरा शुभ्र बर्फ. अनाघ्रात सौंदर्यांत सृष्टि अशी न्हाऊन निघत असतांनाच शंकराचार्यांनी इथें समाधी घेतली असावी.


त्यांची समाधी म्हणजे अद्यावत बांधणीची एक छोटीशी खोली. त्याला एक दार. दोन खिडक्या. वरती पत्र्यांचें छप्पर. त्यावर बर्फ

पडलेले. अर्धी अधिक खोली बर्फात बुडालेली. त्यामुळें आम्ही वर होतो. उडी मारूनच खोलींत जावें लागलें. तेथें शंकराचार्यांची एक सुंदर संगमरवरी बैठी मूर्ति होती. आसनस्थ ध्यान. भव्य कपाळ. सुंदर डोळे. हाती काठी नि अंगावर छाटी अशी ती मूर्ति पहात असतांना मी अगदीं अवाक् झालो. मनाची समाधी लागली. त्या मूर्तीतून हिंदू धर्माचे प्राण आद्य शंकराचार्य समोर उभे राहिले. ती ठेंगणी-ठुसकी मूर्ति, अंगावरील भगवी वस्त्रें, गळ्यामध्यें रुद्राक्षमाळा आणि भस्मविलेपनानें सुशोभित झालेले ते भव्य कपाळ. हिंदूधर्म आक्रमकांशी झगडणाऱ्या त्या तापसी संन्याशाच्या पायावर भावविवश होऊन मी मस्तक टेवले. जेथें जागेला विटाळ नाही, मनाला सद्विचारांशिवाय स्पर्श नाहीं, मानवी श्वासानें जी हवा दूषित झाली नाही अशा त्या परमपवित्र जागीं शंकराचार्यांनी समाधी घेतली.

कितीतरी वेळ त्या मूर्तीकडे श्रद्धेच्या डोळ्यांनी पहात मी उभा राहिलो. सगळीकडे स्तब्धता. अगदीं अनिमिष स्तब्धता पसरली होती. योगेश्वराच्या सहवासानें जणूं चराचराची समाधीं लागली होती. सृष्टीचा ऊर दाटून आला होता नि माझाही शब्द आंतल्या-आंत विरून जात होता. त्या दैवी अंशाच्या समाधीपुढें पुनः एकदा नतमस्तक झालो. अश्रूंची भावफुलें वाहिली नि तेथून बाहेर पडलो.

वैशाखी पौर्णिमा ! सगळीकडे सामसूम होती. उद्या केदार सोडून जायचे. पुनः इथे येणे होते कीं नाहीं कुणी सांगावे ! म्हणून रात्रीचा एकटाच कितीतरी वेळ मी व्हरांड्यात बसलो होतो. मध्य-रात्रींच्या प्रहरी वाऱ्याचा श्वास रोखून सृष्टि अगदीं निश्चल उभी होती. उमाशंकर जणूं तिला योगाचे पाठ देत होते. वैशाखी पौर्णिमेच्या दाट आणि शीतल चांदण्याचा स्पर्श सुखकर वाटत होता. पांढरेशुभ्र वस्त्र परिधान करून तपाला बसलेल्या पार्वतीसारखी

चरित्री सुंदर नि तेजस्वी दिसत होती. छे, छे पार्वती-सारखी कां? प्रत्यक्ष पार्वतीच बोलत होती. पार्वती म्हणाली,




"महादेवा, स्वर्ग आणि मोक्ष देणाऱ्या क्षेत्रांसंबंधीं मला आज सविस्तर सांगा पाहूं.!"

"प्रियेचे मधुर भाषण ऐकून कैलासाधीपति महादेव म्हणाले, केदाराचें जें महात्म्य तूं मला विचारल्येस तें सांगताना मला अगदीं परमानंद होत आहे. हे क्षेत्र स्वर्ग आणि मोक्षदायी आहे. 'केदार क्षेत्र' नांवानें जे तीर्थ प्रसिद्ध आहे ते सर्व तीर्थांमध्यें श्रेष्ठ तीर्थ आहे. त्या

तीर्थाचा मी कधींहि त्याग करीत नाही. रागावूं नकोस. पण हे स्थान मला तुझ्यापेक्षां सुद्धां अधिक प्रिय आहे. जितका मी पुरातन आहे तितकेच हे क्षेत्रहि पुरातन आहे. माझ्याइतकेच हे तीर्थहि सनातन आहे. येथें ज्याला मृत्यु प्राप्त होतो तो निःसंशय शिवरूप होतो."

कलह कटाक्ष फेकीत पार्वतीनें विचारले, "इथें अशी कोण-कोणती तीर्थे आहेत ते तरी सांगा नि येथें स्नान, दान, तप करण्यानें फलप्राप्ती काय होते हेहि विदीत करावे"

शिवशंकर म्हणाले, "हे देवी, केदार क्षेत्राच्या दक्षिणेकडे रेतःकुण्ड आहे. त्या पाण्यांत स्नान केल्यानें मनुष्य निःसंशय शिवरूप होतो. रेतःकुंड तीर्थाच्या खालच्या बाजूला शिवकुंड आहे. येथें सात दिवस व्रत करून जो प्राणत्याग करतो त्याला शिवसायुज्यमुक्ति मिळतें. मंदाकिनी नदीवर पापी लोकांना मुक्ति देणारे भृगु कुंड आहे. गोवध करणारे, कृतघ्न, ब्रह्महत्या करणारे यांनी सुद्धां त्या शिलेवर प्राणत्याग केला तर त्यांना परब्रह्म धामाची प्राप्ति होते. तेथून दोन योजनांवर रक्तवर्णी असें उकळते पाणी निघतें. त्याच्या केवळ स्पर्शाने लोखंड सुवर्ण बनतें. त्याच्या उत्तरेकडे स्फटिकाची सुंदर शिवमूर्ति आहे. तिच्या पूजनानें मनुष्य शिवरुप होतो. त्याच्या पूर्वेकडे वह्निमय तीर्थ आहे ते हिमाच्या रुपांत पाझरत आहे. तुपाच्या आहुतीनें अग्नीचें पूजन केल्यानें अग्नि प्रसन्न होऊन मनोवांच्छित वर देतो."

"माझ्या तपाचं फळ?"

"शिवशक्ति! पार्वती, तूं माझा प्राण आहेस. तूं आहेस म्हणून मी आहे. तूं आदिमाया, जगन्माया, आदिशक्ति, चित्शक्ति सर्व जगाची स्वामिनि नि चालिका आहेस. तूं आहेस म्हणून शिवशक्त आहे."

"तुझ्यापेक्षां सुद्धां हे तीर्थ मला अधिक प्रिय आहे" असें मघा आपण म्हणालांत. ते...."

" वेडी कुठली ! खरं वाटलं तुला ने ! फुकट तप केलस. अग ह्या शक्तिशिवाय शिव म्हणजे शव आहे."

" काय अभद्र तरी बोलणं ! "

पार्वतीनें शिवाच्या तोंडावर हात ठेवला. शिवशक्ति एक झाली.

भावनेनें उभारलेल्या त्या नाट्य भूमिवर शिवशक्तीचा तो प्रवेश मी कितीतरी वेळ पहात होतों.

शिवसतीची ती गोड संभाषणें त्या दिवशीं मी एकदाच ऐकली. पण तो वृद्ध हिमालय आपल्या लेकीचे नि जावयाचे ने अमृतमय संवाद किती पुरातन कालापासून ऐकत आला असेल. त्या तापसी नि विलासी दांपत्याचे तांडवनृत्य त्यानें कितीतरी वेळा तृप्त नजरेनें पाहिले असेल ! मध्यरात्रीच्या त्या चंद्राच्या साक्षीने !

पौर्णिमेच्या चांदण्याची बरसात नेहमीच मोहक भासली तरी केदारावरच्या वैशाखी चांदण्याची अपूर्वाई कांहीं न्यारीच म्हणावी लागेल.

ज्ञानाच्या ओढीनें वैदिक कालांतील ऋषिमुनी इथें आले. योगी, भोगी नि त्यागी सर्वजण इथेंच धांवले. योगी योगधारणेकरतां, भोगी सृष्टि–सौंदर्याच्या भोगाकरतां नि त्यागी आत्मसमर्पण करण्याकरतां. आधीच रुपवती असलेल्या स्त्रीनें नटावें त्याप्रमाणें सर्वांगसुंदर असलेल्या सृष्टीनें इथें बर्फाचें पांढरेशुभ्र वस्त्र परिधान केलें आहे. चांदण्यामुळें त्या वस्त्राला चंदेरी झांक आली आहे. ही मानिनी रूपवती खरी, पण तिचें सौंदर्य दीपज्योतीसारखे आहे. डोळ्यांत भरणारे नि हृदयाचा ठाव घेणारे. धरित्री भक्तीचा केदार राग आळवतांना, खळाळत वहाणारे पाणीहि संगीताची लय धरून वहात

होते. अशी सुंदरता, तेजस्विता नि पवित्रता ! त्रिवेणित झालेलें सौंदर्य नेहमी पहावयास मिळणार नाहीं. केदाराच्या सान्निध्यांत म्हणून मला कोजागिरीसारखें जागरण करायचें होतें. पण डोळ्यांनीं असहकार पुकारला तेव्हांच झोपण्याकरतां मी खोलींत गेलो. अंथरुणावर पडल्यापडल्याहि बर्फावरचें ते चांदणें सारखें डोळ्यापुढें येत होतें. मन उत्साही होतें तरी शरीर थकलें होतें. त्या दिवशीं झोपेशी फारसा अनुयय न करतांच गाढ झोप लागली.

सकाळीं उठलो. उन्हे वर आली होती. सहप्रवासी जाण्याचा तयारीत होते. खेचरांवर सामान लादून ती वाटेला लागली होतीं. सदा घाईघाई करणारे कांहीं प्रवासी खेचरांनाहि मागे टाकूं पहात होते. खेचरांची घाई मी समजूं शकत होतों. पण ह्यांची घाई कां ? इथें घाई कसली नि कशासाठीं ? पुनः इथें येणें होणार आहे कां ? ह्यांना अगदीच कसे कळत नाहीं ?

## कन्या सासुऱ्याशीं जाये

मी एकटाच केदारेश्वराच्या मंदिरांत गेलो. 'पुन्हां इथें घेऊन ये' म्हणून त्याची मनोमन प्रार्थना केली नि शेवटचा साष्टांग प्रणिपात घालून केदारेश्वराचा कळस अदृश्य होईपर्यंत मागे पहात पहात माघारा झालो.

गंगा, यमुना, सरस्वती, भागीरथी, अलकनंदा, नि मंदाकिनी ह्या भारतवासीयांच्या माता. मातेप्रमाणें भारतपुत्रांनीं ह्यांच्यावर प्रेम केलें. फार प्रेम केलें. ह्यांच्या रक्षणासाठीं लढाया दिल्या. ह्यांच्या कांठीच सूर्यनारायणाच्या साक्षीनें होमहवनें झालीं. अशी अपार श्रद्धा ज्यांच्या ठिकाणीं आहे त्या नद्यांचें कैलास हें माहेरघर. भारतीय संत-चरित्रें पाहिलीं तरी त्यांनींही ह्या नद्यांच्या माहेराला म्हणजे आपल्या आजोळाला भेटी दिल्याशिवाय देह ठेवला नाही असें दिसून येते.

अगदीं लांब गेल्यावर देवदेखनीजवळ एका उंच शिळेवर उभे राहून नि टांचा उंच करून मी केदारेश्वराचे मंदिर डोळ्यांनी अखेरचे पिऊन घेतले. त्यावेळीं केदारेश्वराचे मंदिर म्हणजे मला देवघरासारखे दिसले नि त्याच्यापुढें आलेला बर्फाचा सुळका निरांजनासारखा भासला.

देवदेखनी, गरुडचट्टी, गेहरुचट्टी, रामवाडा, जंगलचट्टी, भराभरा मागें टाकीत आम्ही गौरीकुंडाजवळ आलो. पहाड चढतांना जेवढे सृष्टि निरीक्षण होऊं शकत होते तेवढे उतरतांना होत नव्हतें. कारण उतरायच्या वेळेला पहाडच आम्हाला घाई करीत होता. उतरणी-वर पायांना नी शरिराला असा वेग यायचा कीं विचारूं नका. चढतांना तोंडाला फेंस आला होता. नाकी नऊ आले होते. तोंच रस्ता आता उतारावर इतका सोपा वाटत होता कीं उतरताना आम्हांला मुष्कीलीनें तोल सांभाळावा लागत होता. पाय सावरण्याची कसरत अनेक वेळा अनेक रीतीनें करावी लागत होती.

परत येतांना सर्व परिचितसें वाटत होते. अतिपरिचयानें गोडी कमी झाली नव्हती. पण त्यांत आतां अपूर्वाची गोडी नव्हती. पहिली अपूर्वतेची होती. आताची गोडी ओळख झाल्याची होती. पहिली गोडी जिंकण्याची होती. आतांचा गोडवा जिंकल्याचा होता. जातांना ज्या ज्या लतावेलींनी नि झाडाझुडपांनी आमचा आदरसत्कार केला होता. त्यांचा प्रेमानें निरोप घेत आम्ही पुढें पुढें जात होतो. केदारची ती वैशाखी पौर्णिमा ज्याप्रमाणें कधी विसरणें शक्य नाहीं त्याप्रमाणें कड्याकपाऱ्यांतून आमच्याकडे चोरट्या नजरेनें पाहणारी ती विनय लज्जसंपन्न इवली इवली सुंदर फुलेंहि कधी विसरणें शक्य नाहीं. त्यांचा निरोप घेणेंहि जिवावर आले होते.

त्या दिवशीं गौरीकुंडाला मुक्काम केला. माहेराला आलेल्या मुलांचें आईनें स्वागत करावें तसें गौरीकुंडानें आमचे स्वागत केलें. थंडीच्या वेळीं आईनें कढत पाण्याची तपेली द्यावी तसें गौरीमाईनें कढत पाण्याची कुंडे ठेवली होती. निसर्गदत्त अशा त्या गरम पाण्याच्या घंगाळांत स्नानाचा पुनः आनंद लुटला. रात्रीं गाणीं, गप्पा टप्पा झाल्या नि पाखरांसारखे झोपी गेलो. रात्रभर डोळाभरुन झोप घेतली. सकाळीं ताजेतवानें होऊन नि गौरीमाईचा निरोप घेऊन पुनः पायवाट सुरूं केली.

रुद्रेश्वरायनमः

गुप्तकाशी उरकून रुद्रप्रयागला आलो तेव्हां संध्याकाळचे चार वाजले होते. रांगोळीत रंग भरावा असें आकाशांत रंग भरले होते. इथें जीवाभावाच्या मैत्रिणींप्रमाणें अलकनंदा नि मंदाकिनी भेटल्या आहेत त्या संगमाकाठीं रुद्रेश्वराचें एक सुंदर मंदिर आहे. जवळजवळ पन्नास एक पायऱ्या चढून वर जावे लागते. एकूण, उंचावर राहण्याची महादेवाला भारीच हौस !

हे देऊळ संगमाजवळ नि अतिशय सुंदर जागीं वसलेलें आहे. वरती झाडांची गर्दी आहे. भाऊबंदकी करीत समोर ऊंच पहाड आहेत. वरून संगमाचे दृश्य अतिमनोहर दिसते. पन्नास पायऱ्या उतरल्या कीं मध्यें देवाचें देऊळ लागते आणि आणखी पंचवीस एक पायऱ्या उतरल्या कीं संगमावर स्नानाची जागा आहे. संगमापासून रुद्रेश्वर पंचाहत्तर पायऱ्या इतक्या उंचीवर असूनहि; गाणाऱ्याच्या मागें लागलेल्या तंबोऱ्यासारखा प्रवाहाचा आवाज अखंड कानीं पडतो.

तंबोऱ्यावरून आठवण झाली ती अगोदर सांगतो. कनखलची माहिती सांगतांना दक्षाच्या यज्ञाची नि पार्वतीच्या आत्मयज्ञाची हकीगत सांगितली. त्यांच्या मागे कळचुटे नारदच होते. पार्वतीला माहेरी जायची फूस देणारे नारदच. त्यांतून पार्वतीच्या आत्मयज्ञाची

गाथा निर्माण होईल ह्याची मात्र त्यांना कल्पना नसावी. करायला गेलो एक नि झाले भलतेच ह्या विचाराने व्याकुळ होऊन तो देवभक्त आपली भक्तिसूत्रें विण्यावर आळवित ह्याच रुद्रप्रयागच्या वाटेनें चालला होता. शिवलिंग पाहून ते नतमस्तक झाले. चौकशी केली असतां शिवशंकर सतीचीं हाडे घेऊन भारत भ्रमण करीत असतां तिच्या



मस्तकाची हाडें इथें पडली नि त्यांतून शिवलिंग निर्माण झाल म्हणून त्यांस कळले. कृतज्ञतेनें, आदरानें, श्रद्धेनें नारद तिथेच विसावले. प्रथम शिवलिंग अश्रूंनी धुवून काढलें. नंतर सहस्त्र बिल्वदलांनी पूजन केले. लघुरुद्र महारुद्र झाले. भोळा शंकर प्रसन्न झाला. शंकरांनी नारदांना इथें सामवेदाचा उपदेश केला. नारदानी इथें शिवमंदिराची स्थापना केली नि शंकराचार्यांनी त्या शिवालयाचा पुढें जीर्णोद्धार केला. स्वामींच्या तोंडून कथा ऐकली नि बाहेर आलो तेव्हां काळोख झाला होता. अंधारांत छोटे मोठे दिवे तरंगत होते. गार हवेनें कढत कढत पीठलं भातालाहि चव आली होती.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत



अद्वैताचा मार्ग

हरिद्वारपासून रुद्रप्रयागपर्यंत आले कीं तेथून दोन फाटे फुटतात. एक केदाराला तर दुसरा नारायणाला जातो. केदाराहून आम्ही रुद्रप्रयागला आलो. रुद्रप्रयागला एक रात्र काढली नि रुद्रेश्वराच्या मंदिरांतून केदाराकडे जाणारा मार्ग पुनः एकदां मांघारा वळून पाहिला आणि नारायणाला जाण्याकरतां मोटारींत बसलो.

जसें केदाराकडे जातांना कुंडपर्यंत मोटारीनें जाता येते तसें नारायणाकडे जाताना मोटारीनें जोशीमठापर्यंत जाता येते. आमची मोटार दुर्गम पहाडांतून निघाली. डोळयांना रिझवणारी पुनः तीच वनश्री लागली. केदारापेक्षां नारायणाचा मार्ग रुक्ष आहे म्हणून कुणीसे म्हणाले होते. पण मला कांहीं तसं वाटलं नाही वाटेंतून जातांना दुतर्फा अनेक प्रकारच्या वनस्पती, वृक्ष, फळे, फुले इथेंहि दिसली. पक्षांचे मधुर आवाज इथेंहि ऐकायला मिळाले. मे महिन्यांत सुद्धां कडक दुपार इथें कधी भासलीच नाही. दुपार सुद्धां गार होती. शिवविष्णूच्या सान्निध्यांत इथली दुपार आपला तामसी भडकपणा विसरून गेली असावी. प्रमथ कर्णप्रयाग लागले. येथेंच पूर्वी दानशूर कर्णानें तप केले. अलकनंदा नि गंगा यांच्या संगमावर यज्ञाची दीक्षा घेतली. वेदपठणा· करीतां वामदेवहि मुनि कर्णाच्या यज्ञात सामील झाले ते इथें. यज्ञात कर्णानें सूर्यनारायणाची आराधना केली. भगवान् सूर्यानें प्रसन्न होऊन त्याला अभेद्य कवच कुंडले आणि अभय वरदान दिले. पहातां पहातां पीपलकोटी मागे पडले. जोशीमठाला आलो संध्याकाळचे चार वाजून गेले होते.

गंमत तरी पहा, कीं गढवालांत हा कुणी जोशी आला नि त्यानें इथें जोशीमठ स्थापन केला. पराक्रम त्याचा, कर्तृत्व त्याचे आणि आमचे आडनांव सादृश्यामुळें सहप्रवासी आम्हाला उगाचच मोठेपणा देऊं

लागले. प्रत्येकजण म्हणत होता, "चला जोश्यांच्या जोशीमठांत जायचं आता. ते यजमान नि आपण पाहुणे. स्वतः जोशी बरोबर आहेत तेव्हां कांहीं कमी पडायचे नाही. मी मनांत म्हटले की, "देवाच्या द्वारीं काय कमी पडणार" पण जनांत मात्र म्हटलं तथास्तु.

## गुलाबाच्या फुलांचा गांव

जोशी मठाचा अभिमान वाटावा असच खरोखर हे गांव आहे. जत्रेसारखे गांव नुसते गजबजून गेले होते. केदारच्या वाटेवर इतके मोठे गांव कुठेच दिसले नाही. इथे बाजार होता, माणसांचीं गर्दी होती, सुंदर सुंदर मोठ्या इमारती होत्या, मोटारींच्या काफीला होता नि मुख्य म्हणजे गुलाबांच्या फुलांचे ताटवे होते. बिर्लाशेटची धर्मशाळा त्या दृष्टीनें विशेश लक्षांत राहील.

आम्ही ज्या ठिकाणी उतरलो होतो त्याच्या समोरच गुलाबांचे ताटवे ओळीनें फुललें होते. पाहुण्यांना बघायला मुलांनी खिडकीशी ओळीनें उभे राहावें त्याप्रमाणें आम्ही कोण पाहुणे आलो आहोत हे पाहण्याकरतां तीं गुलाबाची फुलं आमच्या धर्मशाळेसमोर ओळीनें उभी होती.

जशी मुलें तशीच ती फुलें होती. निरागस, खेळकर नि लाजरी. उन्हांत खेळून बालकांची तोंडे लाल पडावींत तशी ती गुलाबी फुलें दिसत होती. मुलांसारखी ती हंसत होती, लाजत होती नि वाऱ्याच्या झुळकीनें माना वेळावीत होती. बालकांचे हास्य तिथें होते नि त्यांच्यांतला खेळकरपणाहि होता. बिर्लाधर्मशाळेंत जे गुलाब पाहिले तें तर जन्मांत विसरणें शक्य नाही. असें गुलाब कधी पाहिलेच नव्हते. पानांपेक्षां फुलेंच जास्त. कळेहि टपोरे नि झाडें गुच्छागुच्छांनी फुललेली. त्यांच्या फुलण्याला नि उत्साहाला नुसते उधाण आले होते. झाडांच्या

दोन्ही बाजूला पाकळ्यांचा नुसता खच पडला होता. फुलांच्या पायघड्या आतापर्यंत वर्णनांत वाचल्या पण इथें प्रत्यक्षांत पाहिल्या. झाडें गुलाबी, रस्ता गुलाबी, नि वरती संध्याकाळीं आकाशालाहि गुलाबी रंग आलेला. इथल्या तरुणतरुणींनी ह्या गुलाबी पाकळ्यांचा रंग आपल्या गालांना घेतला आहे. काश्मीरी गुलाबी कांती इथें गढवाली स्त्रीमध्यें पण आहे. पाण्याला आलेल्या तरुणी पाहिल्या तर त्यांच्या डोक्यांत गुलाबाची फुले. हमाली करणारी तरणीबांड पोरेहि शहाजान बादशहाच्या ऐटीनें गुलाबाची फुलें हुंगत होती. मला वाटले कीं ह्या जोशी मठाला " गुलाबांच्या फुलांचा गांव " किंवा 'गुलकंद' असें नांव कां देऊ नये? जोशी मठाचा गुलाब असा काही डोळ्यांत भरला आहे कीं विश्रांतीच्या वेळीं कडक उन्हांतही ते जोशीमठ गांव, त्या गुलाबाच्या बागा, बर्फाचा मुगुट घातलेला तो डोंगर डोळ्यासमोर आठवणीनें उभा करता येतो नि मग बरे वाटते.

हिवाळ्यांत केदाराची गादी जशी उखीमठाला असते तसे नारायण हिवाळ्यांत जोशी मठाला येतात. प्रभूच्या वस्तीनें पावन झालेले हे गांव मोठे गमतीनें वसलेले आहे. मोटार स्टँडवरून बिर्ला धर्मशाळेंत जाव-याचे म्हणजे जिनें चढून गेल्यासारखे चढत चढत वर जावें लागतें. वरती गेले कीं खालचे गांव सुंदर दिसते. स्टँडवरच्या मोटारी पाहतां पाहतां चढताना लागलेली धाप विराम पावतें. इथें मिलिटरीची हाल-चालही दिसते. स्टँडजवळील बाजारांत फार मोठी उलाढाल चाललेली असतें .चामोली जिल्ह्यांत इतकें मोठे दुसरें गांव नाहीं. शहरांतल्या सर्व वस्तू इथें मिळतात. बाजारांत हमाल लोकांची धांवपळ चाललेली असते. मजूर लोक कंडी-दंडीची बोलणी करताना दिसतात तर घोडेवाले आपले उमदे घोडे प्रवाशांपुढें करीत असतात.

इथले लोक अंगी पींडी धडधाकट, गिड्डे पण चपळ, चलाख

बुद्धिचे, व्यवहारदक्ष, इनामी, हजरजबाबी नि झुंझार वाटलें. संध्या-काळ झाली कीं मात्र आजूबाजूच्या बर्फमय डोंगरावरून गार वारे जोशी मठाला बोचकारूं लागतात. जोशी मठ काळोखांत बुडूं लागलो. थंडीने काकडलेल्या म्हाताऱ्या माणसासारखी जोशी मठाची हालचाल हळूहळूं बंद पडूं लागतें. थकलीभागली माणसें नि थंडीनें गारठलेले जोशा मठ गांव झोपेच्या निजानंदात विश्रांती पावते.

## नाम तुझे नारायण

केदारेश्वराचे दर्शन झाले. आतां नारायणाचे दर्शन घ्यावयाचे ह्या विचारानें जोशी मठ उतरून आम्ही नारायणाच्या वाटेला लागलो. एक भला मोठा डोंगर आम्ही उतरत होतो. समुद्राच्या मध्यभागी आल्यावर जिकडे पहावे तिकडे पाणीच पाणी दिसते तसें इथें सगळीकडे डोंगरच डोंगर दिसतात. खाली विष्णुप्रयाग दिसतें. कैलासाहून येणारी विष्णुगंगा नि बद्रिनारायणापासून निघालेली अलक-नंदा यांची इथें फुगडी होते. फुगड्या घालतांना पायांचा जसा आवाज होतो तसा इथें संगमाच्या पाण्याचा आवाज होतो. खालीं आल्यावर पुलावरून कितीतरी वेळ त्या दोन जल देवतांची फुगडी मी पहात होतो. एकीचे पाणी स्वच्छ होतें तर दुसरीचे गढूळ. त्यामुळें श्याम-वर्णी नि गौरवर्णी ललनांच्या लांबसडक हाताप्रमाणें ते दोन जलप्रवाह दिसत होते.

संगमावरचा पूल ओलांडून पलिकडे गेलो तर मेंढ्याचा कळप वाटेंत आला. त्यांना वाट देण्याकरतां जरा बाजूला टेकाडावर उभा राहिलो नि समोर पाहिलें. डोंगरावर जोशी मठ आकाश दिव्यासारखा दिसत होता. वरून संगमावरचा पूल खेळांतल्या काड्याच्या पेटो-सारखा दिसत होता आणि आतां पुलावरून जोशी मठ मुंग्याच्या वारूळासारखा दिसत होता. तेंव्हा उंचावर होतो तर आतां पाय-

थ्याशी होतो. एखाद्याच्या जीवनांत जशी चढउतार असावी तशी इथें चढउतार होती.

मेंढ्यांचा कळप पुढें गेला नि आम्ही आमची वाट चालूं लागलो. हिमालयांतले डोंगर फार विचित्र आहेत. बरीच चढ चढल्यावर डोंगराची कड दिसावी नि वाटावें कीं आतां डोंगर संपला तर पुनः दुसरा डोंगर त्यामागें लपलेला दिसावा. चढ उतरून खालीं यावें तर दुसऱ्या डोंगराचा पायथा. त्याचे पाय चेपीत वर जावें तर पुनः डोंगर. दहीहंडी फोडण्याकरतां जसें गोपाल एकमेकांच्या खांद्यावर चढतात तसें इथें डोंगर जणूं एकमेकांच्या खांद्यावर उभे आहेत. स्वर्गांतल्या अमृताची हंडी फोडण्याकरतां !

बलदोडा, घाटचट्टी, गोविंदघाट, पांडुकेश्वर अशी लहान लहान गांवें वाटेंत लागतात. महाभारतकालीं हेच पांडुकेश्वर 'वन' होतें. ह्या वनामध्यें मृगरूप धारण करून एक मुनि रतिक्रीडा करीत होता. पंडु राजा त्यावेळीं तेथें शिकारीस आला असता हरण म्हणून त्यानें त्या ऋषीला बाण मारला. मृगरूप धारण करणाऱ्या त्या संतप्त मुनीनें मरतांना पंडुला शाप दिला की आपल्या पत्नी समवेत रतिक्रीडा करतांना तुलासुद्धां असाच मृत्यू प्राप्त होईल." मृगरूपी ऋषीने शाप दिल्यामुळें त्यांतून मुक्त होण्याकरतां पंडु राजाने घोर तप आरंभिले. तपामुळें प्रसन्न झालेल्या परमेश्वरानें पंडुराजाला दर्शन देऊन वर दिला, "माझ्या वरानें तुझ्या पत्नीच्या उदरीं धर्मादि पुत्र जन्माला येतील. ते आत्मज्ञानी आणि शास्त्रांत प्रवीण असें असतील" परमेश्वराचें हे वचन ऐकून राजा कृतकृत्य झाला. तेथें भक्तांची प्रसन्नता वाढविणारा पन्धीश्वर महादेव आहे. तेथून तीन कोसावर वैखानस मुनींचा आश्रम आहे. त्याचप्रमाणें त्या मुनींची यज्ञभूमिहि आहे.

पंडुराजानें इथें तप केले म्हणून ह्याला पडुकेश्वर म्हणतात. इथें

थोडी शेतीसुद्धां होते. तांदुळाची शेते, कोबी, फुलावर, टरबूज, संत्र्याची झाडें नि भोवतीं कुंपण गुलाबांच्या फुलांचे!

केदारच्या वाटेला भेटले तसें अनेक तापसी, संन्यासी कधीं एकटे तर कधी टोळीटोळीने यात्रा करतांना इथेहि दृष्टीस पडले. बंगाली, गुजराथी, मद्रासी, महाराष्ट्रीयन, पंजाबी, सिंधी सर्व प्रांतांतून भाविक प्रवासी लोटले होते. झऱ्याकाठीं विश्रांति घेत त्यांच्याशीं बात-चीत करीत इथला अवघड मार्गहि सुलभ सोपारा होत होता.

इथें निसर्ग हाच मुळी देव! हिमालयाघरीं या देवाची सादय संपदा जिथें तिथें मुक्तहस्ताने विखुरलेली दिसत होती. केदाराला जातांना मंदाकिनीने सोबत केली तर इथे अलकनंदेने वाट दाखविली तिला पहातांना डोळ्यांचे सार्थक होत होते नि पाण्याची किलकिल ऐकतांना कानांचे पारणे फिटत होते. चालता चालता लामागड आला संध्याकाळ झाली होती. इथें रात्रीचा मुक्काम होता. लामागड म्हणजे एक दुमजली चाळीवजा घर. खालीं दुकानें नि वरती विश्रांतीच्या जागा. डाव्या उजव्या बाजूला पाण्याचे झरे नि समोर गोष्टी करायला थोराड अंगाचे बोलके डोंगर. रात्र त्या बोलक्या डोंगरांच्या सान्निध्यांत काढली नि सकाळी त्यांचा निरोप घेऊन वाट चालूं लागलो.

## सुंदर ते ध्यान

एका डोंगरावरून चालतांना पलिकडच्या डोंगरावर नजर जात होती. एक हिरवेंगार झाड पिवळ्या फुलांनी असें काहीं फुललें होते कीं त्याचा आकार थेट विटेवर उभा राहून कटेवर हात ठेवलेल्या विठोबा-सारखा दिसत होता. मला वाटलें भास असेल. पण अगदीं फुलांचा विठोबाच. मागून ताई आल्या नि म्हणाल्या 'जोशीबुवा पाहिलत कां? मी पहात असलेला फुलांचा विठोबाच त्या मला दाखवित होत्या. मलाच नव्हे तर त्यांनाहि तोच भास.

मागून चालत येणारी प्रवासी मंडळी त्याच भासानें थांबली. कमाल आहे! सगळ्यांना तोच आकार दिसावा नि तोच भास व्हावा!! एक मोठी शिला बघून आम्ही त्याच्यावर बसलो. ताईनें तुकोबांचा अभंग म्हणण्यास सुरुवात केली.

" सुंदर तें ध्यान उभें विटेवरीं । कर कटीवरी ठेवूनीया...

म्हणता म्हणता त्या—

" मकर कुंडले तळपती श्रवणी । कंठी कौस्तुभमणी विराजीत

ह्या कडव्यावर आल्या.

मला विटेवर उभा असलेला फुलांचा विठोबा स्वच्छ दिसत होता. पण मकरकुंडले नि कौस्तुभमणी मात्र दिसत नव्हती. जंगलांत येतांना त्याने तो घरी तर काढून ठेवला नव्हता ना? मी निरखून पाहूं लागलो. कड्यावरुन सळसळत वहात येणारा पांढराशुभ्र पाण्याचा प्रवाह मात्र त्या पांडुरंगाच्या कपाळावरील गोपीचंदनाच्या गंधासारखा मला भासला. तें गोड गोजिरें नि सगुण साजिरें रुप डोळ्यांत साठवून आम्ही पुढें चालूं लागलो.

## निसर्गाची दिवाळी

भल्या मोठ्या मिरवणुकींत श्रीमंती दारुकाम चाललेले असावे तसें ह्या पायींप्रवासांत जागोजागीं निसर्ग शोभेचे जणूं दारुकामच चालले होते. एका डोंगरावर फुलांचा विठोबा पाहिला नि दुसऱ्या डोंगरावरुन पडणारा बर्फाच्या खड्यांचा धबधबा पाहिला. हे दृश्य म्हणजे निसर्ग सौंदर्याचा कळस होता.

वरती उन्ह रणरणत होते. उन्हामध्यें डोंगर तापत होते. मेण वितळावे तसा त्यांच्या माथ्यावरचा बर्फ वितळत होता. त्याचे झपाट्यानें पाणी बनत होते नि तें वेगाने वहात खालीं पडत होते. गर्दीमध्यें मागच्यानें पुढच्याला ढकलावें तसें पाणी वेगानें ढकलत धडपडत

धावत होते. डोंगराचा वर्फाच्छादित माथा उन्हांत तळपत होता नि फेंसाळणारे पाणी दुधासारखे पांढरेशुभ्र दिसत होते. तो दूधसागर होता कीं दाटीदाटीनें विणलेला मोगरीचा गजरा होता? हत्तीच्या सोंडेंत पांढऱ्या स्वच्छ फुलांची माळ दिसावी तसा काळ्या फत्तरावर तो पांढरा जलप्रवाह दिसत होता. तो इतक्या उंचावरून वेगानें पडत होता कीं, खालचा बर्फ फुटून त्याचे शतशः तुकडे होत होते नि वर्फाचे ते तुकडे नि फेसाळलेले पाणी एकत्रित होऊन खालच्या कड्यावर आदळून त्याला खो देत होते. हा खेळ अखंड चालू होता नि इतक्या दूरवरहि ह्या डोंगरावर तो आवाच स्वच्छ ऐकूं येत होता. फुलबाजींतून ठिणग्या उडाव्यात त्याप्रमाणें त्या डोंगरातून बर्फांचे तुकडे उडत होते नि सूर्यप्रकाशांत ते चमकत होते. समोरचा डोंगर वेड्यासारखा दिवसाच एक भली मोठी पेटलेली फुलवाजी हातांत धरून उभा होता.

ती गोडी अवीट होती, अनावर होती. डोंगर चढूं लागलो तर "पाहिलेंत? छान आहे कीं नाही?" म्हणून वाटेवरली पिवळी फुलें हंसत विचारीत होती. केदाराच्या वाटेवर निळी फुलें पाहिली. इथें त्यांनी पिवळे झगे घातले होते. हनुमानचट्टी मागें टाकली नि पुनः एकदां झेप घेऊन वर चढूं लागलो.

आले, नारायण मंदीर आले! शेकडों डोंगर पालथे घातले. अरण्यामागून अरण्यें तुडविलीं. मृत्यूच्या जबड्याप्रमाणें भासणाऱ्या दऱ्याखोऱ्या ओलांडल्या. प्रतिदिनी थोडाहि संकोच न करता डोंगर माथ्यावर आम्ही नाचलो-वागडलो. आमच्यावर रागावणें तर दूरच पण पर्वतराजानें पावलांची मिजास मात्र सांभाळली.

भक्तीची वाट सरळ असली तरी नारायणाची वाट विकट नि अवघड आहे. हवामानाची निश्चिती नाही. वाटेंत अनेक संकटे नि अडचणी येतात. पण भाविक यात्रेकरूं कशालाच धूप घालीत नाहीत.

भक्तांच्या हृदयांतील प्रेम, विश्वास नि ओढ सर्व संकटावर मात करतात.

वाटेंत वेली छाया देतात. झरें निर्मळ नि गोड पाणी देतात. निसर्ग मन रिझवितो. नद्या सोबत करतात. वारा श्रम हलके करतो. आईच्या मायेने नि पित्याच्या प्रेमानें प्रभूनें सर्वांना सांभाळून आणले. कुठें त्रास झाला नाही, कुणाला आजार नाही. असें हंसत, खेळत नि मजेंत आम्ही नारायणाच्या पायाशीं आलो. १०२४४ फूट उंचावर !

तळयांत मध्यभागीं कमळ फुलावें तसें अलौकिक निसर्ग सौंदर्याच्या भांडारांत भगवान बद्रीनारायणाचे मंदीर सुवर्णमय कळसानें शोभून दिसतें. हे मंदीर अलकनंदाच्या तीरावर असून त्याची ऊंची ५० फूट आहे. विशेष भव्य नव्हे पण बांधणीनें ते चांगले बळकट आहे. वयानें पुष्कळ पुराण असूनहि अजून तरुण भासणारें तें मंदिर विलोभनीय आहे.

मंदिरासमोर एक उष्णोदक कुंड आहे. त्यांत स्नान करतांना त्या कुंडाची पौराणिक माहिती मिळाली. एकदां ऋषींच्या सभेमध्यें अग्नीनें विनयपूर्वक विचारलें, हें ब्रह्मर्षीनों, "मी सर्व भक्षण करण्याच्या पापामुळें दुःखी आहे. नरकाप्रमाणें असलेल्या ह्या पापापासून माझी मुक्तता कशी होईल ?"

तेव्हां सर्व ऋषींच्या आज्ञेनें वेदव्यास म्हणाले,

हे अग्नि, "तुझें पाप नाहींसें होण्यासाठीं एकच उपाय आहे. तो म्हणजे बद्रीयात्रा. सर्वभक्षी प्राण्यांचे सर्वांत जास्त रक्षण करणारें असें हे बद्रीनारायण क्षेत्र आहे. येथें सर्वांची पापें नष्ट करणाऱ्या बद्रीनारायणाचे वास्तव्य आहे. तेथें तूं जा."

व्यास महर्षींचें बोलणें ऐकून अग्निदेव तेथून उत्तरेकडे निघाले आणि गंन्धमादन पर्वतावर आले. गंगेमध्यें स्नान करून मोठ्या भक्तिभावानें ते बद्रिनारायणाची स्तुति करूं लागले. त्यांच्या स्तुतिमुळें

नारायण प्रसन्न झालें नि आपले पापक्षालन इच्छिणाऱ्या अग्नीला म्हणाले,

"मी तुझ्या स्तुतीनें प्रसन्न झालों आहे. वर माग."

अग्निदेव म्हणाले, "हे प्रभो, सर्व भक्षण करण्याच्या पापामुळें मी दु:खी आहे. मला अभय-वरदान द्या."

नारायण म्हणाले, "माझ्या ह्या बद्रीक्षेत्राच्या केवळ दर्शनानेंच पापी लोकांची पापें नष्ट होतात. माझ्या कृपेमुळें तुला कधींही पापस्पर्श होणार नाही."

त्यावेळेपासून पवित्र झालेला अग्नि सर्व दिशांमध्यें आपल्या गुणांनी वास्तव्य करीत आहे. आणि येथें द्रवरूप होऊन तप्त जलाच्या रूपांत राहिलेला आहे.

महापातकी लोकसुद्धां या अग्नितीर्थामध्यें केवळ स्नान करुन पापमुक्त होतात. जो मनुष्य प्रातःकाळीं उठून स्नान करुन ही कथा श्रद्धापूर्वक श्रवण करतो तो नि:संशयपणें अग्नितीर्थांत स्नान केल्याचे फळ प्राप्त करुन घेतो. हिमाने वेढलेल्या त्या तप्त कुंडांत स्नान करतांना पुराण कथेच्या त्या आठवणीनें माझ्या डोळ्यांत प्रेमाश्रू उभे राहिले आणि तोंडातून उद्‌गार बाहेर पडले, "वह्नितीर्थं समं तीर्थं न भूतं न भविष्यति"

खाली अलकनंदा गार गार पाणी घेऊन गाणं गात गात वहात आहे. पूर्वेस वर पर्वत आहे तर पश्चिमेस नारायण पर्वत आहे. बऱ्याच पायऱ्या चढून वर गेले कीं यात्रिकाला नारायणाचें दर्शन होते. सभेच्या मध्यभागीं देवतांचे आदी दैवत बद्रीनारायणजी पद्मासन घालून बसले आहेत. कारण इथें ते भोगाकरतां नाही तर योगाकरतां बसले आहेत. शेजारींच जगज्जननी महालक्ष्मी आहे. महातापसी नर आणि नारायण, नारद, उद्धव, गणपती, कुबेर व गरुड या देवभक्तांनी

सभेला शोभा आणली आहे. बद्रीनारायणाची मूर्ति काळ्याभोर पाषाणांत सुबकपणें कोरली आहे.

त्या दिवशीं विष्णुसहस्रनामाकरतां ११। रु. भरून नांवें दिली. ज्यांनी नांवें दिली त्यांना विष्णुसहस्रनाम होईपर्यंत देवाच्या द्वारीं समोर बसता आलें. विष्णुसहस्रनाम संपल्यावर हात जोडून आम्ही विष्णुस्तुति केली.

अनेक तीर्थयात्रा केल्या. लहान मोठी, सुंदर नक्षीकाम केलेली नि उत्तम बांधणीची देवळे पाहिली. रेखीव, सुबक नि बोलक्या मूर्ति पाहिल्या पण चांगला पुजारी कधी दृष्टीस पडला नाही. देवाचा पुजारी जसा हवा, जशी अपेक्षा असावी तसा कधी आढळला नाही. इथून तिथून देवाचा पूजारी बघावा तर काळपट, करपलेला, खंगलेला, चिडलेला, वासनांनी नि व्यसनांनी बरबटलेला, पैशाकरतां हपापलेला असा लोभीष्ट, रोगट, तापट नि चिडखोर पुजारीच जिकडे तिकडे भेटतो. देवाच्या द्वारीं चोवीस तास राहून नि त्याची सेवा करूनहि त्यांच्यात पालट झालेला नसतो. त्यामुळें श्रद्धाळू माणूस दुखावतो नि श्रद्धाशील माणूस त्याच्याशीं भांडण तंडण करतो नि नास्तिक बनून निघून जातो.

## पुजारी असा असावा

पण जसा हिमालय लक्षांत राहील, जसा गंगौघ लक्षांत राहील, जसा जोशीमठांतला गुलाब लक्षांत राहील त्याचप्रमाणें बद्रीनारायणाचा पुजारीही लक्षांत राहील. अशी सुंदर तेजस्वी मूर्ति, असें प्रसन्न प्रभावी व्यक्तिमत्व कधी दृष्टीस पडलेच नव्हते. जोशीमठांतल्या गुलाबाप्रमाणें कांती रसरसलेली गुलाबी तांबुस होती. डोळे पाणीदार, भुंग्याप्रमाणें काळेभोर नि जांभळाप्रमाणें टपोरे होते. केसांचा काळेपणा गोऱ्या गुलाबी व्यक्तित्वाला उठाव आणीत होता. चेहरा पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें गोल नि हंसरा होता. गंगौघासारखे पावित्र्य नि हिमालयाचा भारदस्त-

पणाच तिथें संगमित झाला होता. कुणालाहि वाटावें, देवाचा पूजारी असावा तर असा !

दुसऱ्या दिवशीं ब्रह्मकपाल तीर्थावर पितृश्राद्ध केले. हरिद्वार नि देवप्रयागला जसें मनाचें समाधान झाले तसें इथें झालें नाहीं. कारण यात्रेकरूंची गर्दी होती. एका रांगेत ते बसले होते नि श्राद्धाची कवाईत चालली होती. त्या कवाईतींत माझी भावधारा घेऊन मीहि सामील झालों. ब्रह्मकपालाचे माहात्म्य फार मोठे ! म्हणूनच मला वाटले इथें गर्दी खूप ! एकदां इथें श्राद्ध केले कीं मग कुठेहि करावे लागत नाही. मोक्षाचे हे शेवटचे "टर्मीनस" आहे. इथे पाणी मिळाले कीं प्राण्यास गति मिळालीच. पुनः तो परत येत नाही कीं त्याची कशांत आशा रहात नाहीं. कित्येक लोक जिवंतपणीच इथें स्वतःचे श्राद्ध करून घेतात.

एका तरुण अविवाहित मुलीनें स्वतःचे श्राद्ध करून घेतलेले पाहून म त्र मो अवाक् झालो.

संध्याकाळीं बाजार आटोपल्यावर कितीतरी वेळ बाहेरच्या सज्जांत मी एकटाच बसून राहिलो होतो. जें पाहिलें, भोगले, ऐकले, अनुभवले त्या साऱ्यांनींच हृदयांत दाटी केली होती. एका अनामिक हुरहुरीनें उर दाटून आला होता. बारा ज्योतिर्लिंगांपैकीं केदार झाले. चार धामापैकीं बद्रीनारायण झाले. आता उद्यां इथून निघायचे.

हिमालयांत वसलेल्या या शिवाला नि नारायणाला सोडून जावयाचे. पुन: इथें येणें होते कीं नाही कोण जाणे ! म्हणून नगाधिराज हिमालयाचे वैभव डोळ्यामध्यें साठवून ठेवीत होतो.

## पुण्यपुंज जो हिमवंतु

हिमालयाचे वैभव जगांतल्या कुठल्याहि वैभवापेक्षां वरचढ नि आगळेवेगळे आहे. हिमालय हाच आपला महादेव नि नारायण आहे.

वय्याकरणी पाणिनी, वेदमहर्षी व्यास हे विद्यासंपादनाकरतां इथें आले. श्रीमत् शंकराचार्यांनी आपली विश्वविख्यात प्रस्थान त्रयी इथेच लिहून काढली. विवेकानंद नि स्वामी रामतीर्थ यांनाहि आराधनेचे पाठ घेतले ते इथेच. इथेच कृष्ण अर्जुनला घेऊन बद्रिकाश्रमांत काही दिवस राहिला होता असा महाभारतांत उल्लेख आहे. असें साधकांचे आजोळ, महादेवांचा कैलास, विष्णुचे वैकुंठ, अवधूताची पायरी नि रसिकाचे विलासस्थान म्हणजेच हा पुण्यवंत हिमालय. पांडवांच्या सहवासानें इथली भूमि पुनीत झाली आहे. देवदानवांची ही रणभूमि आहे. देव-मानवांनाच काय पण पशुपक्षी, वृक्षवल्ली फुलेंफळें, साऱ्यानाच तो एक मोठा आधार आहे. कुठलाहि भूगोल, इतिहास, पुराण चाळा. सारेजण हिमालयाविषयीं बोलतांना भारावून गेलेले आढळतील. हिमालय हा आमच्या भारताचा प्राण नि पुण्यठेवा आहे. ही ऋषींची तपोभूमि नि वेदांची जन्मभूमि आहे.

हिमालयाच्या वैभवानें भारावलेली नि देवभक्तीनें ओथंबलेली मनें नारायणाच्या पायीं वाहून आम्ही परतीच्या रस्त्याला लागलो. देवाकडे पाठ फिरविली नि उताराकडे म्हणजे अधोगतीकडे चालूं लागलो. डोळे भरून आले. कंठ दाटून आला. अष्टसात्त्विक भावांनीं अंग मोहरून गेले. आमच्या समाधींतून जागे करीत महिनाभर आमच्या बरोबर असलेला आमचा वाटाड्या पुष्कर म्हणाला,

"बाबूजी, तुमचे कांहीं राहिले तर नाही ना?"

"कांही नाहीं. इथें काय राहणार बेटा!'

"पहा हो."

"अरे हो, एक गोष्ट राहिलीच कीं"


"कोणती बाबूजी?"

"बद्रीनाथजी इथेच राहिले रे."

" नाही बाबूजी. त्यांचा वास तर नित्य भक्तांजवळच असतो."

देवाचा वास भक्तांजवळच असतो! कुणी शिकविले हे त्याला? नक्की हिमालयानेंच!

'संपूर्ण'




# सौ राग

सौराष्ट्र, राजस्थान नि गुजराथ या प्रदेशांतून
भटकत असतां कांहीं निवडक स्थळें
पहाण्याचा योग आला नि त्यांतून हा
'सौराग' उभा राहिला.

**सौ** - सौराष्ट्र

**रा** - राजस्थान

**ग** - गर्वी गुजराथ



ॐ नमः शिवाय

वेरावळला उतरलो. देवळाचा कळस पाहिला. दहा वर्षांपूर्वी हा कळस इथें नव्हता. देवळाचे बांधकाम चालू होते. जेमतेम दोन मजले त्यावेळीं पूर्ण झाले होते. आज त्याच्या कडेवर सात मजले आहेत. देवळाचा कळस उन्हांत चमकतो आहे. वाऱ्यावर ध्वज फड-कतो आहे. देवळात घंटा वाजत आहे. कानावर सागर लाटांचा कल्लोळ पडत आहे. मनाची काठोकाठ तृप्ती झाली आहे. मंदिराचें दर्शन डोळे दिपवणारे आणि दिङ्मूढ करणारे आहे. पार्श्वभूमिला सागर आहे. तिजोरींत कित्येक कोटी रुपयांचा ट्रस्ट आहे. विरागी शंकराचे देऊळ अगदी ऐश्वर्यसंपन्न आहे. दहा वर्षांनी हे देऊळ पुनः पहातांना मनाचा उत्साह कायम आहे.

डोक्यावर चांदीचा नाग. कपाळावर गंधाचा ॐ. त्यावर गुलाबाच्या पाकळ्या चिकटविलेल्या. मागे गोरीपान पार्वती, लाडकी

पार्वती ! अंगावर सर्व अलंकार घालून नटून थटून उभी आहे. समाधानाने डोळे मिटले. हात जोडले. दहा वर्षांनीं आलेल्या त्याच्या ह्या लाडक्या भक्ताला शंकराने ओळखले. डोळे उघडले तर पिंडीवरचे फूल खाली पडले होते. आल्याबरोबर प्रथम दर्शन घेऊन मग पुजाऱ्याच्या घरीं गेलो.

येथून जवळच एक त्रिवेणीसंगम आहे. हिरण्य, सरस्वती व कपिला इथे सागरास मिळाल्या आहेत. संगमात स्नान केले नि कृष्णानें जेथें देह ठेवला त्या जागेचे दर्शन घ्यायला गेलो. तेथे बिर्लाने एक गीतामंदिर बांधले आहे. ज्या पिंपळाखाली कृष्णाने देह ठेवला तेथे पादुका आहेत. त्या चरण कमलावर पाणी घातले. इथें अनंताचा अंत झाला होता. जो कधी जन्मलाच नव्हता तो इथें मेला होता. छे, छे तो कधी मरणारहि नव्हता. रत्नहार सोडून ज्यानें पुष्पहार धारण केले नि राजपुत्रांना सोडून ज्याने गोपांना जवळ केले तो कसा मरणार होता ? तो तर लोकवल्लभ झाला होता. ती तर प्रभुमाऊली होऊन लोकांच्या हृदयांत चिरंतन वास करीत वावरत होती. मग कृष्णाला मरण कसले ? आपल्या चरित्रानें तो तर अमर झाला होता. तो जिवंतच आहे. आजहि आहे. मरणार आम्ही. लोकमानसांत तो चिरंतन राहणार आहे. पण मनाची अशी धारणा असूनहि त्याच्याकरतां, त्या बन्सीधराकरतां डोळ्यांतून दोन अश्रू आले. त्या पिंपळाचे एक पान त्याची आठवण म्हणून मी घरीं आणले.



दुपारी बाणेश्वराचे दर्शन घेण्याकरतां तळपत्या उन्हांत बाहेर पडलो. इथें समुद्राच्या पोटांत तीन शिवलिंगे आहेत. भरतीच्या वेळी ती बुडतात नि ओहोटीच्या वेळी ती उघडी पडतात. ह्या जागेवरूनच जरा नांवाच्या भिल्लाने कृष्ण ध्यानस्थ बसले असतां नजरचुकीनें बाण मारला. इथून बाण सुटला म्हणून ह्या स्थानास बाणेश्वर म्हणतात.

समोर जेथे कृष्ण ध्यानस्थ बसले होते तेथे "भालुका तीर्थ" आहे. तेथे देवळाचे नव बांधकाम चालू असून त्यांत कृष्णाची सुंदर नवी मूर्ति बसविण्यांत येणार आहे.

दुसऱ्या दिवशी प्राचीस गेलो. सोमनाथापासून साधारण तेरा मैलावर हें क्षत्र आहे. येथें पांच पांडवांनी बांधलेली पांच शिवमंदिरे आहेत. पूर्ववाहिनी सरस्वती वहात आहे. धर्मराजाने लावलेला "मोक्षपिंपळ" आहे. मूळमाधवाची मूर्ति गुडघाभर पाण्यांत उभी आहे. दहा वर्षांपूर्वी इथें आलो होतो, त्यावेळी ही जागा मला फार आवडली होती. म्हणून मोठ्या ओढीने तेथें धांवत गेलो नि जें पाहिले ते पाहून घोर निराशा झाली. त्यावेळीं मूळमाधव खरोखरच नदींत उभा होता. आतां नदीचा तो भाग बांधून काढला आहे. मूळमाधवाभोवतीहि सुबक बांधकाम केले आहे. असेल सुबक बांधकाम पण म्हणून काय मुळच्या नैसर्गिक जागेइतके ते सुंदर आहे? नांव नको. पार शान निघून गेली आहे त्या जागेची. ह्या मानवाला नको त्या जागी शिष्टपणा दाखवायची फार वाईट खोड आहे नाही तरी!

संध्याकाळी आरतीला देवळांत गेलो. जयपूरच्या राणीनें पार्वतीदेवीला दिलेले मौल्यवान अलंकार पाहिले. आरती झाल्यावर माघारा वळत होतो तोंच एका कोपऱ्यातून संगीताचे सूर कानावर आले. तोच तो अंध गायक! दहा वर्षांपूर्वी ह्या अंधगायकाची देवापुढे चाललेली सेवा ह्या इथेंच देवळांत ऐकली होती. त्यावेळीं "बन भ्रमन

शिवयोगी " ही विलंबित एकतालांतली गोरख कल्याणांतील चीज त्याने म्हटली होती. ह्यावेळी तो अंधगायक तोडी रागांतली एक चीज गात होता. त्याची चीज संपल्यावर त्याला दहा वर्षांपूर्वीची आठवण दिली. तो अंध कलावंत त्या आठवणीने नितांत खूष झाला. सद्गदीत स्वरांत तो म्हणाला, 'ऐकतोय्, देव माझे गाणें ऐकतोय्' त्याचा निरोप घेऊन देवळाच्या बाहेर पडलो.

सूर्यास्त होऊन बराच वेळ झाला होता. सागराची गर्जना कानावर पडत होती. भर दुपारी त्यांचे जसें खिदळणे चालू होते तसेच आताहि काळोखांत चालू होते. शिव आणि सागर या दोहोंचीहि भव्यता इथे दृष्टीस पडते. सागरामुळे शिवालय खुलून दिसते कीं शिवालयामुळें सागरास शोभा आली असा संभ्रम इथे पदोपदी होतो.



दुसऱ्या दिवशी सोमनाथाचा निरोप घेऊन रस्ता धरला.

सोन्याची द्वारका

द्वारका आली तर सकाळचे नऊ वाजलें होते. विश्वकर्मा धर्मशाळेंत सामान टाकून गोमती नदीवर स्नानाला गेलो. स्नान करून द्वारकाधीशाच्या मंदिरांत गेलो तर दरवाजा बंद होता. बाहेर भाविकांची अपार दाटी झाली होती. थोड्याच वेळांत मखमलीचा पडदा दूर झाला

रणछोडजी द्वारकाधीशांचे दर्शन झाले. निश्चित उभी असलेली मरगळलेली मनें उल्हसीत झाली. सगळ्यांच्या तोंडावर खुदकन् हसूं उमटले. द्वारकाधीशाने पितांबर परिधान केला होता नि त्याच्या अंगात पिवळ्याच रंगाचा अंगरखा होता. त्यावर केशरी रंगाच्या झेंडूच्या पुष्पमाळा शोभत होत्या. एखादे प्रिय माणूस त्याच्या घरगुती साध्या कपड्यांत पाहिल्यावर जसा आनंद वाटावा तसा भक्तांना आनंद झाला. आरती झाली. "राधे गोविंद हरे राधे गोविंद" भजन झाले. पडदा पडला. रणछोडदास पडद्याआड गेले नि भक्त माघारे वळले.

दुसऱ्या दिवशीं "सोन्याची द्वारका" पाहिली. कृष्ण चरित्रांतले मंगल प्रसंग मातीच्या चित्रांच्या मदतीने इथे उभे केले आहेत. संध्याकाळीं समुद्रकांठच्या महादेवाच्या देवळांत गेलो. एखादे लहान मूल रुसून दूर जाऊन उभे राहावे तसें हे देऊळ समुद्रांत दूर जाऊन उभे राहिले आहे. भोवताली अक्राळविक्राळ खडक आहेत. समुद्राचे फेसाळते पाणी देवळाला धडक देत आहे. त्या पाण्यावर मावळतीचे सुरेख रंग पसरले आहेत. गाभाऱ्यांतली घंटा वाजत आहे नि त्या नादावर सुनील सागराचे पाणी पुढे मागे होत आहे. वास्तविक सोरटी सोमनाथाचे प्रचंड मंदिर पाहिल्यावर ह्या देवळाची काय मातब्बरी वाटावी ? पण नाही, त्या रमणीय पण टुमदार देवळाने हृदयाचा अगदी ठाव घेतला.

त्या देवळांतून रुक्मिणीच्या मंदिरांत गेलो तर तिनसांजा झाल्या होत्या. आमची आरती थोडक्यांत चुकली होती. आरती झाल्यावर रुक्मिणीमाई पडद्याआड झोपल्या होत्या आणि अधिरतेने आलेल्या आमच्यासारख्या भक्तांना आतां दर्शन दुर्लभ होते. पुजाऱ्याकडे गयावया केली तेव्हां त्याला पाझर फुटला. आमच्याकरतां रुक्मिणीमाईची झोपमोड करण्याचे त्याने ठरविले. पडदा दूर झाला. रुक्मीणीमाई

आम्हाला सामोऱ्या आल्या. झोपल्या होत्या त्या नि डोळे आम्ही चोळू लागलो. साक्षात एक सुंदर स्त्रीच आमच्या समोर उभी आहे असा भास झाला. हिला मूर्ति कसे म्हणावे? ही तर मूर्तिमंत रुक्मिणीच होती!

समुद्रकांठच्या ह्या देवळांत रुक्मिणीच्या जीवनांतली एक सुंदर कथा तैलरंगाने भिंतीवर चित्रित केली आहे. रुक्मिणी नि श्रीकृष्ण दुर्वास ऋषींना जेवायला बोलवायला म्हणून त्यांच्या घरीं गेले. त्यांनी येण्याचे कबूल केले. पण एक शर्थ घातली "आपण प्राण्याच्या वहानांतून येणार नाहीं. माझा रथ तुम्ही ओढत नेला पाहिजे" ही ती शर्थ. श्रीकृष्ण रुक्मिणींनी ती मान्य केली. दुर्वासांना रथांत बसवून त्यांचा रथ ते स्वतः ओढू लागले. उन्हांत रुक्मिणी देवीला तहान लागली. कृष्णानें आत्मसामर्थ्यानें जमिनींतून पाण्याचे कारंजे उडविले व रुक्मिणीची तहान शमविली. दुर्वासाना त्याचा राग आला. मी अतिथी. मला जेवायला बोलाविले नि मी जेवण्याअगोदर ही पाणी प्यायली? चिडून तिला शाप दिला "तूं वनवासी होऊन निर्जन अरण्यांत रहाशील" म्हणून द्वारका रखरखीत आहे. वैराण आहे.

नंतर देवीने बारा वर्षे भगवंताची आराधना करून दुर्वासांना नि देवाला प्रसन्न करून घेतले. दुर्वास प्रसन्न होऊन शांत चित्ताने तेथे जेवले व त्यांनी उःशाप दिला. म्हणून आज गोड पाणी तरी मिळत आहे

ही सर्वकथा तैलरंगात त्या मंदिरांत चित्रीत झाली आहे.

दुसऱ्या दिवशी नीलमण्यासारख्या सागरांतून बेट द्वारकेला गेलो. जे डाकोरला, नाथद्वारला, द्वारकेला तेच बेट द्वारकेला दर्शन आहे. समुद्रामध्यें एक सुंदर बेट. त्यामध्यें भव्य मंदिर. वरती बांधलेल्या घंटा वाऱ्यावर डोलत मधुर संगीत निर्माण करीत आहेत. हे सारे पाहिले नि

गाडी होती म्हणून त्वरित माघारा वळलो. पुजारी म्हणाला, "साहेब ह्या बेट द्वारकेंत पूर्वी लोक येत तेव्हां इथें एक दिवस दोन दिवस मुक्काम करीत. पुरणपोळीचे जेवण आम्ही त्यांना घालत असू. त्यांचे पोट भरत असे नि आमचेहि. पण आतां मचवा, मोटारी, गाड्या ह्यांच्या अशा सोयी झाल्या कीं प्रवासी दर्शन घेतो नि माघारी वळतो. अशाने आमची पोटें कशी भरणार? म्हणून मुलाला सांगतो कीं "आता हा धंदा करू नकोस. ह्या धंद्यातली शान पार निघून गेली आहे." त्याचे म्हणणे खरे होते. गाड्यांच्या सोईमुळें आतां वस्तीला कोणी राहात नाही. आम्हालाहि गाडीची घाई होती म्हणून त्याच्या सत्य कथनाने वाईट वाटले तरी आम्हीहि तेथून काढता पाय घेतला. कालाय तस्मैनमः।

## जय जलाराम

राजकोटला उतरलो. राजकोटहि रेखीव आहे. दुपारी तळपत्या उन्हांत लक्ष्मीनारायणाचे मंदिर पाहिले नि संध्याकाळी चारच्या गाडीने वीरपूरला गेलो. राजकोट वैराळ रस्त्यावर राजकोट सातवं कां आठवं स्टेशन आहे. तेथून टांग्यानें किंवा मोटारने जलाराम महाराजांच्या समाधिपर्यंत जाता येते.

वीरपूर गांव जलाराम महाराजांच्या समाधिकरताच केवळ प्रसिद्ध आहे. जलाराम महाराजांचे एका शद्बांत वर्णन 'गुजरातचे तुकाराम' असें करतां येईल. सर्व आयुष्य परोपकारांत गेलेले. जन्मभर दानधर्म नि अन्नदान केले. जिवंतपणी तर त्यांनी हे व्रत काटेकोरपणें पार पाडलेच पण मजा अशी कीं महाराज जाऊन आज शंभर वर्षे झाली तरी त्यांचा कार्यकीर्तीचा सुगंध अजून दरवळत राहिला आहे.

समाधीजवळ आम्ही गेलो तर संध्याकाळची पांचची वेळ होती. अनेक दिशेने भक्तगण आले होते. पण जलाराम मंदिर बंद होते. सगळेजणच ताटकळत होते. ह्याचे मात्र मला सखेद आश्चर्य वाटले.

आमच्या देहूला तुकोबांची नि आळंदिला ज्ञानोबांची समाधी चोवीस तास उघडी आहे. संत द्वार बंद असून कसे चालेल ? एकवेळ देवद्वार बंद चालेल पण संतरजकण कधीहि दुर्मिळ होता कामा नयेत. मी खूप



वादविवाद केला पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाही. "संध्याकाळी सहाच्या आरतीशिवाय दर्शन होणार नाही" असें निक्षून सांगण्यात आले. वेळ काढायचा म्हणून मंदिरा-भोवतालचा परिसर बघूं लागलो.

देवळाच्या डाव्या बाजूला एक वडाचा पार आहे. तेथें जलाराम महाराम बसत. संतांची पदधूलि आपल्या अंगाला लागावी म्हणून आम्ही त्याच्यावर अंमळ टेकलो. तेवढ्यांत एक इसम आला. आम्हाला "चहा-कॉफी हवी का ?" म्हणून त्याने चौकशी केली. प्रवासांत सारखीच चहा-कॉफी चालली होती. त्यामुळें आम्हाला त्याचा कंटाळा आला होता. म्हणून आम्ही "नको" म्हटले, तर त्याने दुधाचे कप आणून पुढें ठेवले. आम्ही सहाजण होतो. इतके दूध घेतले म्हणून मी पैसे देऊ लागलो तर "इथे कसलेच पैसे घेत नाहीत," असें सांगण्यांत आले.

शेजारच्या भटारखान्यांतून अन्नाचा परिमळ सुटला होता. आम्ही स्वयंपाकघर बघायला गेलो. पांचशे माणसांना पुरेल इतकी खिचडी, कढी नि भाजी शिजत होती. बाहेर पिण्याच्या पाण्याची सोय होती. त्याच्यासमोर पोळ्या करण्याचे यंत्र होते. "हे यंत्र तासाला बाराशे पोळ्या करते" असें सांगण्यांत आले.

देवळाच्या उजव्या बाजूला धान्याचे भले मोठे कोठार आहे. त्यांत हजारो पोत्यांच्या थप्प्या लावल्या होत्या. एवढे धान्य कोण पाठविते नि कुठून येते कोण जाणे. कारण पाठवणारा "जलाराम" या नांवाने पाठवितो नि घेणाराहि "जलाराम" नांवाने घेतो.

अन्नधान्याच्या आजच्या कठीण अवस्थेंतहि हजारो लोकांना सकाळ संध्याकाळ मोफत अन्नदान होत असते. भातावर लोणकढे तूप भांड्याने ओतले जाते. हे साहित्यिक वर्णन नाही. त्याची प्रचीती आजहि तुम्ही तेथे गेलांत तर मिळू शकले.

संध्याकाळच्या पहिल्या पंगतीत आम्ही प्रसाद घेतला नि हात धुवून बाहेर आलो तर आरतीची वेळ झाली होती. मंदिर उघडले होते. इथे जेवून संतदर्शन केले तरी चालते. उगाच उपाशी पोटी विठोबा नको. उपाशी पोटी आरतींत लक्ष लागत नाही नि कांही नाही. मला ही कल्पना आवडली. संत हे समाजाची नाडी ओळखून सांगोपांग विचार करणारे आहेत. भक्त भुकेला असलेला त्यांना मंजूर नाही.

भरल्यापोटी आरतीला उभा राहिलो. संपूर्ण लक्ष आरतींतच होते. आज प्रथमच भरल्यापोटी आरतीला उभा राहिलो होतो. एक नवीन अनुभव होता. ह्यावरून एक गंमत आठवली. आमची आजी नैवेद्याचे पदार्थ चाखून बघायची. तिचे म्हणणें "माणसाला कमी जास्त तिखट खारट चालत नाही. मग देवाला नैवेद्य दाखवितांना नको कां तशी काळजी घ्यायला? तो मुका बिचारा, दाखवाल तसा नैवेद्य खातो. त्याची काळजी आपणच घेतली पाहिजे." बिचारी शबरीच्या वंशांतील असावी!

आरती झाल्यावर त्यांच्या वंशजांचे दर्शन घेतले नि बाजाराकडे वळलो. वीरपूरचे कुंकु प्रसिद्ध आहे. कुंकवाच्या दोन तीन बाटल्या खरेदी केल्या नि झपाट्याने स्टेशनकडे पावले वळविली. कीर्ति एक्सप्रेसची वेळ झाली होती.

मातृगया

सिद्धपूरलाच मातृगया म्हणतात. मातृगयेला आलो तर सकाळचे नऊ वाजले होते. श्री. रंगनाथराव ऐनापुरे यांच्याकडे चहापाणी झाल्यावर स्नानाकरतां नि आईच्या श्राद्धकर्माकरतां बाहेर पडलो.

वाटेने जातांना गुरुजी सांगत होते. "तप आणि तेज ह्यांची ज्वलंत मूर्ति असलेल्या कर्दमाला ब्रह्मदेवाने प्रजोत्पत्ति करण्याची आज्ञा केली. ती शक्ति उत्पन्न होण्यासाठीं तो सरस्वतीच्या शांत किनारी येऊन राहिला. त्याने दहा हजार वर्षे उग्र तपश्चर्या केली व योगसाधना करून हरीला प्रसन्न करून घेतले. देवाच्या आज्ञेने त्याने मनूची मुलगी देवहूती हिचे पाणिग्रहण केले.

देवहूतीच्या वाट्याला लक्ष्मीची प्रभा, सौंदर्य, व वसुंधरेची गंभीरता आली असून ती अतिशय सुंदर दिसत होती. नारदाच्या तोंडून कर्दमाचे तप, तेज, विद्या ही सर्व ऐकून पित्याच्या संमतीने ती त्याला वरती झाली.

राजकुमारी असूनसुद्धां तिने पतीची खूप वर्षे सेवा केली. कष्टाकडे लक्ष न देता देहदमन करून तिने पतीची मर्जी संपादन केली. त्यामुळे प्रसन्न होऊन तिची इच्छा पूर्ण करण्यासाठीं महर्षि कर्दमानी तिला बिंदू सरोवरांत स्नान करण्यास सांगितले."

त्यावेळीं नेमके आम्ही बिंदू सरोवरासमोर आलो होतो. कर्दमाच्या उग्र तपाने हर्ष होऊन देवांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू इथे पडले म्हणून याला "हर्ष-बिंदू सरोवर" असेहि म्हणतात. गुरुजींनी गतकालाच्या गोष्टी सागता सांगता आम्हाला भूतकाळात नेले होते. महर्षि कर्दम आणि देवहूती यांचे स्मरण करीत आम्ही बिंदू सरोवरांत स्नान केले. यांत स्नान केल्याने कुष्टरोगासारखा रोगहि नाहीसा होतो.

स्नान करतांना गुरुजी सांगत होते. "देवहूती सरोवरांत उतरल्यावर तिच्या तपामुळें त्या पाण्यातून एक हजार नारी वर आल्या व निरनिराळ्या सुगंधी तेलाने तिचे अंग चोळू लागल्या." मनांत मी म्हटले, "आमचे कांहीं तेवढे तप नाही." गुरुजी पुढें सांगत होते, त्यांनी तिला स्नान घातले. सुंदर वस्त्रे लेवविली. अंगावर उत्तम अलंकार घातले. दिव्य देह धारण केलेली तो देवहूती दासीसह बाहेर आली. कर्दमांनी आपल्या तपाच्या बळावर सर्व गोष्टींनी समृद्ध व विलासकरण्याकरतां सर्व साधन असलेले एक विमान तयार केले. पतिसह देवहूती त्या विमानांत बसून देव, गंधर्व, यक्ष, किन्नर ह्या सर्व लोकात जाऊन ती उपभोग घेऊन आली. सती शिरोमणी अनुसुया, अरुंधती आदि नऊ कन्यांना तिने जन्म दिला.

ब्रह्मदेवाच्या आज्ञेने आपल्या ह्या मुली तिने मारीची, वशिष्ट, अत्री वगैरे ऋषींना देऊन वंशवृद्धी केली. त्यामुळे तिला जगन्माता म्हणतात. व सिद्धपुराला मातृगया किंवा देव आणि ऋषींचे आजोळ म्हणतात.

कर्दम आणि देवहूती यांच्या तपोबळावर प्रसन्न होऊन स्वतः देवाने कपीलमुनींच्या रूपाने त्यांच्या पोटी जन्म घेतला. तेव्हां कर्दममुनी कृतकृत्य झाले. पुढे त्यांनी संन्यास घेतला व ते हिमालयांत गेले. तेथे ब्रह्माची उपासना करून ते ब्रह्मरूप झाले.

इकडे कपील मुनीने आपल्या आईला म्हणजे देवहूतीला ज्ञानाचा उपदेश केला. संसाराच्या असारपणाचा बोध झाल्यावर आसक्तीहीन देवहूती परमात्म्याच्या ठिकाणी तन-मन-धन अर्पण करून जीवनमुक्त झाली.

कर्दमाच्या भक्तीने व तपाने ईश्वराने देवहूतीच्या पोटी जन्म घेतला नि त्यांची इच्छा पूर्ण केली म्हणून ह्या ठिकाणीं पिंडदान

केल्यानें आईला मोक्ष मिळतो. महापराक्रमी परशुरामाने इथेच आईला पिंडदान करून मातृहत्येपासून स्वतःला मुक्त केले.

बिंदू सरोवराच्या चारी बाजू दगडाने पक्क्या बांधलेल्या आहेत. हे सरोवर लहान असून रमणीय आहे. ह्याच्या काठीं धर्मशाळा बांधलेली असून तेथे बसून महाश्राद्ध करतात. आम्ही तेथे श्राद्धाकरतां आलो.

नारायणाला ब्रह्मकपाली श्राद्ध केल्यावर आतां खरे श्राद्ध करण्याची जरुरी नाहीं. पण मातृगयेचे महत्व आईच्या श्राद्धाकरतां फार आहे. म्हणून मी तेथे मातृश्राद्ध केले. त्यावेळीं मला पिंडदान मात्र करावे लागले नाही.

जगांत मला कांहीं कमी नाही. पण मला आई नाही. मी पोरका आहे. भिकारी आहे. हीनदीन आहे. " स्वामी तिन्ही जगाचा। आईविना भिकारी " अशी अक्षरशः माझी स्थिती आहे. आईचे सुख माझ्या नशिबी अजिबात नाही. मी सहा महिन्याचा असतानाच ती गेली. कां गेली अशी ती ? सहा महिन्याच्या मुलाला मागे टाकून देवाघरी जाण्याइतकीं कां आई कठोर असते ? का देवालाच माझी आई आवडली नि म्हणून त्याने तिला लौकर बोलावून घेतले ? कां मीच पापी आहे म्हणून आईचा मुखडाहि पहाण्याचे भाग्य मला लाभू नये ? पैसा, संपत्ति, मानसन्मान, ऐहिक ऐश्वर्य कशाची म्हणून मला कमतरतां नाही. पण मला आई नाही. मी पोरका आहे. दिनवाणा बापुडा आहे. श्राद्ध कर्म करत असतांना हेच विचार माझ्या मनांत येत होते. लहानपणीच आई गेल्यामुळें तिला मी पाहिले नाही. तिचा फोटो माझ्या घरांत नाही. तिच्या माहेरचे कोणी नाही. कोणी येत नाही, जात नाही. आईची सावली सुद्धां मी कधी पाहिली नाही. तिचे स्मरण तरी कसे करूं ? ध्यानांत मूर्ति तरी कोणती आणू ! जगन्मातेची मूर्ति ! गुरुजी मंत्र म्हणत होते,

"तूं मला जन्म दिलास त्या ऋणांतून मुक्त होण्याकरतां मी तुला पिंडदान करतो. माझ्याकरतां तूं जे कष्ट केलेस, अपमान सोसलेस, लहानपणी मी रडत असतांना तुला जा जाग्रणें झाली, माझ्याकरतां तुला उपवास-तापास करावे लागले, पथ्यपाणी सांभाळावे लागले त्या कष्टाकरतां मी तुला पिंडदान करतो. मला तूं चांगले बोलायला, वागायला, चालायला, लिहायला शिकविलेस म्हणून हे मंगल माते मी तुला पाणी पाजून पिंडदान करतो. मला लहानाचा मोठा केलास, माझी काळजी वाहिलीस, मला आजारापासून, संकटापासून, मृत्युपासून, अमंगलापासून, उन्हातान्हापासून, थंडीवाऱ्यापासून जपलेस, माझ्या पायांना काटे बोचू दिले नाहीस, दुःखाची झळ लागू दिली नाहीस, म्हणून हे माते मी तुझा सदैव ऋणी आहे." पिंडदान करूनहि तुझा मी ऋणीच आहे. तुझ्या ऋणांतून माझी सुटका होणार नाही. सुटका झालेली मला आवडणारहि नाही.

हे मंत्र ऐकत असतांना माझ्या मनांत आले, माणूस हे मंत्र ऐकायला इथे येतो तेव्हां त्याची आई गेलेली असते. आई जीवंत असतांना तो जर इथे आला नि त्याने हे वात्सल्यपूर्ण मंत्र ऐकले तर त्याला आईचे महत्व कळेल व तो आईशी प्रेमाने वागेल. आईशी वाईट वागणाऱ्यांची उदाहरणे कांही ठिकाणी आढळतात ती मग आढळणार नाहीत.

श्राद्धकर्म आटपून आम्ही घरी आलो तेव्हां सूर्य माथ्यावर आला होता.

सिद्धपूर क्षेत्र सरस्वतीच्या काठावर वसलेले आहे. कर्दमाचे तपोवन, जगन्माता देवहूतीचे मुक्तिस्थान, सांख्याचार्य कपिल मुनींची जन्मभूमि, विश्वोत्पत्तीचे प्रारंभस्थळ, आर्यसंस्कृतिचे आदिस्थान, ऋषीमुनींची व सिद्धगणांची कर्मभूमि असे हे क्षेत्र आहे. येथें पूर्वी दाटजंगल

होते. येथें पशु नि पक्षी निर्भयपणानें क्रिडा करीत. पृथ्वीवर अशुभता नव्हती. असें हे सिद्धपूर प्राचीनकाळा सुंदर होते. फार रमणीय होते.

आज तेथे खोजा वस्ती आहे. खोजे लोकांचेहि म्हणे हे पवित्र स्थळ आहे. दाट चाळींची वस्ती आहे. उघडी गटारे आहेत नि धूर ओकणाऱ्या गिरण्या आहेत.

आजहि दुसरीकडे केलेले पाप येथे नाहीसे होते. पण ह्या ठिकाणी केलेले पाप मात्र वज्रलेप होते.

इथें श्री. माधवरायजी व श्री. गोविंदजी यांची मंदिरें आहेत.

संध्याकाळच्यावेळीं आम्ही ह्या देवळांवरुन रुद्रमहालय पहाण्यास आलो. सिद्धपूरचे रुद्र अतिमहान नी प्रेक्षणीय आहे. ते जितके सनातन आहे तितकेच ते सतेज आहे. हजारो वर्षांपूर्वीची ती वास्तू आतां म्हाताऱ्या माणसाप्रमाणें कंबरेत वाकली होती. त्याला लोखंडी पट्ट्यांचे आधार देऊन उभे केले होते. एकंदरीत पुरातन गोष्टींची ह्या भागाला चांगली कदर आहे.

श्री. ऐनापुरे सांगत होते, "चावडा वंशाचा शेवटचा राजा चामुंड याने स्वतःची मुलगी लिलादेवी हिचे लग्न बाण नांवाच्या अश्व-परिक्षेंत विख्यात असलेल्या एका तेजस्वी राजकुमाराशी केले. तो लढाईंत मारला गेला व ती साध्वी सती गेली. त्यांचा मुलगा आईबाप नसल्यामुळें आजोळी मोठ्या लाडांत वाढला. लहानपणापासून विलक्षण वृत्तीचा हा राजपुत्र प्रजेचा मोठा आवडता होता. मोठा झाल्यावर तो राजा झाला. त्याच्या कारकिर्दीत संस्कृत व गिर्वाण वाणी यांचा उद्धार झाला. याने विद्वानांना आश्रय दिला. वृद्ध झाल्यावर त्याला वैराग्य प्राप्त झाले. आपल्या हातून कांहीं तरी पुण्यकर्म घडावे म्हणून त्याने अद्वि-तीय असा हा महालय बांधण्यास घेतला !"

गुर्जर नरेश राजांचे चिरस्मारक, सोळंकी वंशाचा कीर्तीस्तंभ, गुर्जर राजांच्या समृद्धीचे अनमोल उदाहरण, विश्वाच्या चमत्कृतीचा अद्‌भुत नमुना, पुरातन कलेचा एक रम्य अविष्कार, शिल्पकारांच्या शिल्पकलेचे हस्तलाघव, परदेशियांना पहाण्यासारखा नमुना, कवींच्या काव्याचे रसमंदिर, कलाकारांच्या ललितकलेचे धाम, भारताचे भूषण, गुजराथचा गौरव असा हा रुद्रमहालय मोठा चित्ताकर्षक आहे. रुद्र म्हणजे अकरा. सध्या मात्र अवशेष अवस्थेंत एकच आहे. तो भाग एक धरून असे दहा भाग कल्पनेने एकमेकावर चढविले तर त्याच्या भव्यपणाची चांगलीच कल्पना येते. तो नुसताच भव्य नाहीं तर अंग-अंग सौंदर्यजडीत असा आहे.

त्याची उंची इतकी होती कीं शेवटच्या मजल्यावरून पाहिले तर पाटगनर शहरांत पाणी भरण्यासाठी तलावावर येणाऱ्या स्त्रिया तेथून दिसत. रुद्रमहालय म्हणजे शंकराची अकरा मंदिरे. अगणित पैसा खर्च करुन ती बांधली गेली. ह्या रुद्रमहालयांत १ सहस्त्र शिवलिंगांची स्थापना केली होती. सकाळ संध्याळाळीं आरतीच्यावेळीं सर्वांच्या मध्यभागी असलेली मोठी घंटा वाजवली कीं देवळांतल्या सर्व लहान घंटा वाजत असत.

रुद्रमहालयाचे देऊळ साधारण ऊंचीचे, तीन मजली होते. त्याचा बाहेरून आकार चौरस, पण आंतील खांबाची रचना अशी होती की तें अष्टकोनी वाटावे. प्रत्येक बाजूला कीर्तिस्तंभ, दरवाजावर दगडी तोरणे. देवळांतल्या घंटा वाजू लागल्या कीं अंतःकरणांतली श्रद्धा व भक्ति त्या घंटानादाने उफाळून येत.

पूर्वी येत! पण आज मात्र सारे छिन्नविच्छिन्न आहे. आठवण नुसती अवशेषाने उभी आहे. सारे वैभव गेले. जे आहे ते पाहून डोळयांत पाणी येते आणि हृदय व्यथीत होते.

त्यावर मुसलमानांनी आक्रमण केले आणि शिवालयाला जोडून मशिद बांधली. अपमानावर आणखी डागण्या. गुजराथ, सौराष्ट्र, राजस्थान फिरतांना आणि पहातांना सारखे वाटत होते, इथे वैभव होते, कला होती, आमचे बांधव कशांत कमी नव्हते. पण आपले वैभव त्यांना राखता आले नाही.

पण एका गोष्टीचा आनंद वाटला. भोवताली भोरी लोकांची वस्ती असून आपला एक मारुती तेथे ठामपणे उभा आहे. ते पाहून दुःखावर कुणी फुंकर घातल्यासारखे झाले.

संध्याकाळी सरस्वतीच्या काठावर आलो. दोन्ही काठांवर हिरवीगार जमीन. वृक्षांची दाट सावली. त्याखाली गाई चरत आहेत. निळ्या आकाशांत पांढरे बगळे उडत आहेत. गुराखी पावा वाजवीत आहे. महादेवळांतल्या घंटा वाजत आहेत. हळूहळू काळोख होत आहे नि घराघरांतून दिवे लागत आहेत. मातृगयेंतील ही रमणीय संध्याकाळ कधीच विसरणे शक्य नाही.

अंधारांतच आम्ही एका खडकावर बसून गार वारा अंगावर घेत होतो. श्री. ऐनापुरे सांगत होते, "आर्यावर्तांत ज्या कांहीं पुण्यपावन नद्या आहेत त्यांत सरस्वती ही आग्रस्थानी असून तिचे स्थानमहात्म्य प्रख्यात आहे. पुराणानें तिचे भरपूर वर्णन केले आहे. सरस्वतीचे एकूण पांच प्रवाह आहेत. त्यापैकी एक प्रवाह इंद्रावर्तात, दुसरा कुरुक्षेत्रांत, तिसरा पुष्कर क्षेत्रांत, चौथा इथे म्हणजे मातृगयेंत नि पांचवा प्रभास क्षेत्री आहे. सरस्वती तपस्विनी असून प्रत्येकाच्या मनांतील भावना ओळखून पापी लोकांची पापे जाळून ती भस्मसात करते."

काळोख बराच झाला होता. त्या पुण्यमय सरस्वतीला आम्ही नमस्कार करुन माघारे वळलो.

येतांना वाटेंतील रणछोडरायच्या मंदिरांत गेलो. ह्या मंदिराची बांधणी दाक्षिणात्य पद्धतीची आहे. हे मंदिर शंभर वर्षांपूर्वी बडोद्याच्या करकरे नांवाच्या अंमलदारानें बांधले. ते पाटण्याला वहिवाटदार होते. सरस्वतीकाठीं घोडे अडले, ते पुढे जाईनात, म्हणून त्यानी जमीन खणली. तेथे त्यांना ही मूर्ति सापडली. पुनः ती मूर्ति स्वप्नांत आली, तेव्हां त्यांनी रणछोडरायचे मंदिर बांधले. हे मंदिर त्यांनी तीन दिवसांत बांधून काढले असें म्हणतात. तेथे दक्षिणी ब्राह्मण श्री. कोरान्ने आजमितीसहि पुजेला आहेत. इथे श्रावण महिन्यांत पौर्णिमेपासून गोकुळाष्टमीपर्यंत “ नामसप्ताह ” चालतो. त्यावेळी गुजराथच्या पुष्कळ भागांतून दक्षिणी भाविक लोक येतात. कांहींना येथे गाणी म्हणण्याचा खास अधिकार दिलेला आहे. त्यामुळें कांहीं वेळेला तिथे गंधर्वसभा भरल्याचाच भास होतो. रात्री गाणें ऐकण्याकरतां लोक येतात. त्यांना भजनानंतर भोजनाचाहि लाभ होतो. हा सर्व खर्च गावांतील धनिक लोक करतात.

“ आम्ही सुद्धां एखाद्या वर्षी उत्सवाला येऊ ” असे श्री. ऐनापुऱ्यांना सांगून आम्ही त्यांचा निरोप घेतला.

नाथद्वार !

प्रेमी मंडळींचा निरोप घेऊन रात्री सिद्धपूर सोडले. गांवात दिवे नव्हते नि स्टेशनहि अंधारांत बुडाले होते. मिणमिणत्या प्रकाशांत पाहुण्यांचा निरोप घेतला नि गाडी हालली.

रात्र झोपेंत सरली. सकाळ झाली तसें डोळे उघडले. पहाटेची वेळ मोठी रम्य होती. पण प्रदेश कांहीं तितकासा रमणीय वाटला नाही. मार्गांत अनेक दगड धोंडेच डोळ्यांना दिसत होते. मधेच एखादा उंट रानटी झुडूप ओरबाडून खातांना दिसे तर मध्येच हिरवळ दृष्टीस पडे. माणसाच्या कष्टांतून रेताड प्रदेशांत उगवलेली ती शेती !

कंकरोली गेले नि नाथद्वार आले. सकाळचे नऊ वाजले होते. लहानसे स्टेशन. समोर एक खाजगी कंपनीची गाडी प्रवाशांना घेऊन जाण्यासाठी उभी होती. घाईघाईने आम्ही त्या मोटारींत जाऊन बसलो. आमच्या पुढे माणसें धावत होतीच. पहातां पहातां मोटार भरली नि चालूं लागली. लहान मोठ्या टेकड्या मागे टाकीत, वळण घेत, चढ उतार करीत रेखीव नि बांधीव रस्त्यावरून ती धावत होती मागच्या वर्षी हरिद्वार पाहिले आतां नाथद्वार पहाण्यासाठी मन उतावीळ झाले होते. ७।। मैल अंतर कापून मोटार गांवाबाहेर स्टँडवर थांबली. तेथून पुनः टांगा. सर्वांच्या सहकार्याने नाथद्वार पाहिले.

भारत वर्षांत मेवाड हे ऐतिहासिकदृष्ट्या प्रसिद्ध आहेच पण वीरभूमि म्हणूनहि त्याचे महत्व आहे. नाथद्वारासारखं ठिकाण पहातांना भाविकतेने मस्तक नम्र व्हावे तर चितोडगड पहातांना छाती अभिमानानें फुलून जावी. ह्या रणभूमीवर एकापेक्षा एक अशी अनेक पवित्र स्थळे आहेत कीं ज्यांच्यामुळें ही भूमि यात्रिकांचे माहेरघर बनावी. ह्या तिर्थक्षेत्रांत नाथद्वार, कंकरोळी, कैलासपुरी, पुष्कर, अजमीर, चारभुजा सेंवत्री, केसरीनाथ इत्यादि तीर्थक्षेत्रे आहेत. त्यांत नाथद्वारं हे मुगुटांतल्या मण्याप्रमाणें अग्रगण्य किंवा माळेंतील मध्यभागी असणाऱ्या पदकाप्रमाणे शोभिवंत आहे.

नाथद्वारा हे वल्लभ संप्रदाराचे प्रमुख पीठ. भारतामध्ये बालाजी-सारखी जी कांहीं वैभवसंपन्न मंदिरें आहत त्यापैकीच नाथद्वार हेहि एक. गजगामिनी नि वक्रवाहिनी श्यामरूलिला बनास नदीच्या कांठावर हे गांव तिष्ठत उभे आहे. ज्याच्या नांवावरुन ह्या गावाला नाथद्वार हे नांव मिळाले त्या श्रीनाथजीना भेटण्याकरता तुम्ही अहमदाबाद–दिल्ली लाईनच्या मारवाड जंक्शनवरून जा किंवा अजमीर-खांडवा लाईनच्या चितोड स्टेशनवरुन जा.

अरवली पर्वताच्या कडेवर हे मंदिर बसले आहे. नैसर्गिक दृष्ट्या नाथद्वार अति देखणे गांव आहे. चारी बाजूला ऊंच पर्वतांनी फेर धरला आहे. त्या पर्वतांनी हिरवेगार डगले घातले आहेत. छातीवर बक्षीस मिळालेली पदके लटकवावीत त्याप्रमाणे मधून मधून स्वच्छ पाण्याची सरोवरे विलसत आहेत.

थकलेल्या प्रवाशांच्या मनावर नाथद्वार हळूवारपणानें फुंकर घालते नि आपल्या शालीन सौंदर्यांने त्याला मोहून नि दिपवून टाकते. सौंदर्यसुशोभित नाथद्वार डोळाभरी पहात आम्ही धर्मशाळेंत आलो आमचे सामान खोलींत टाकले नि थोडे विसावलो. शेजारच्या खोलींतली मंडळी उदयपूरहून आली होती. नाथद्वार उदयपूरपासून उत्तरेला ३० मैल आहे. गावांत मोटारींचीहि गर्दी दिसली. चौकशी-अंती असें कळले कीं मुंबई-दिल्लीच्या मोटार रस्त्यावर हे टुमदार नि अतिरमणीय तीर्थक्षेत्र असल्यामुळें मुंबई-दिल्लीचा मोटारने प्रवास करणारा प्रत्येकजण "देवाचिये द्वारी उभा क्षणभरी" झाल्याशिवाय पुढें जात नाही.

श्रीनाथजींचे नाथद्वारांत पदार्पण कसें झाले त्याची मौजेची ऐतिहासिक हकिगत अशी. सं०-१७१५ मध्यें औरंगजेब सम्राट बनला. हिंदूचा नि हिंदू संस्कृतीचा नाश करण्याचा त्यानें चंग बांधला. त्याकरता त्याने हरेक प्रकार केले. हिंदूंची मंदिरे पाडून नि त्यांतील मूर्ती फोडून तेथे मशिदी स्थापन केल्या. लोकांवर जिझियासारखा अपमानकारक कर बसविला. त्याची वक्र दृष्टी मथुरेवर गेली. तेथील वज्रमंदिरे त्याने उध्वस्त केली. मथुरेनंतर त्याने आपला मोहरा नाथ-द्वारकडे वळविला. महाराणा राजसिंह यानें औरंगजेबाच्या ह्या घोर नीतीला प्राणपणानें विरोध केला. औरंगजेबाला हे सहन झाले नाही. त्यानें मोठ्या सैन्यानिशी मेवाडवर स्वारी केली. महाराणानेहि आपल्या

सैन्याच्या मदतीनें औरंगजेबाचा पराभव केला. श्रीनाथजींच्या मूर्तिला कुठल्याहि प्रकारचा धक्का लागू दिला नाही. गोस्वामी गोविंदजीने सिंहाडला श्रीनाथजींची मूर्ति स्थापन केली होती. पण औरंगजेबाच्य पराभवानंतर श्रीनाथजींची मूर्ति सध्याच्या नाथद्वारी आणली आणि तिथें तिची स्थापना केली. त्यावेळी नाथद्वार इतके दुर्गम होते कीं सेवकांना दाट अरण्यांतून वहाणाऱ्या श्यामसलिला बनास नदीचा सहा महिनेपर्यंत पत्तासुद्धा लागला नाही. त्यानंतर ती अरण्ये काटलीं छाटली गेली आणि तेथें श्रीनाथजीचे भव्य मंदिर उभारले गेले.

श्रीनाथजीचे मंदिर खूप मोठे आहे. त्याच्या भोवती एक मोठा कोट आहे. मंदिराला एकूण तीन मार्ग आहेत. पहिला चौपाटीपासून लाल दरवाजाकडे जातो. हा मुख्य रस्ता. दुसरा मार्ग नगारखान्यापासून सुरू होतो नि संपतो गोवर्धनपूजेच्या चौकांत. त्याला सुरजपोल असें नामाभिधान आहे. इथून केवळ स्त्रियाच दर्शनाकरतां जाऊ-येऊ शकतात. गोवर्धन पूजेच्या चौकावरून एक मार्ग सिंहपोळला पोहोचतो. येथून पुरुषवर्ग दर्शनाकरतां कमल चौकांत प्रवेश करतो. श्रीनाथजीचे दर्शन मात्र दुरूनच होते. पंढरीसारखी इथे उराउरी भेट होत नाही म्हणून खंत वाटते.

श्रीनाथजीचे मंदीर हिंदूच्या इतर देवळांप्रमाणे नाही. मुख्य म्हजजे मंदिराला कळस नाही. तर ज्या ठिकाणी श्रीनाथजी विराजमान् झालेले आहेत. त्याच्याबरोबर वर खापरी कौलाने मढविलेले छत आहे. छपराच्या मधोमध शोभिवंत सुदर्शन चक्रराज आहे. ह्या चक्रावर सप्तरंगी सात ध्वज वाऱ्यावर डौलाने फडफडत असतात. ह्या मंदिराखेरीज इतर वल्लभसांप्रदायी मंदिरावर मात्र असें ध्वज नसतात.

मंदिरांतील सेवक सुदर्शन चक्रराजाला रोज स्नान घालतात.

ह्या चक्राला शिवण्यास दुसऱ्या कुणालाहि परवानगी नाही. इथे संपूर्ण पवित्रता असते.

दर्शन क्षेत्रांत महाप्रभू वल्लभाचार्यांचे सिद्धांत "शुद्धाद्वैत" म्हणून प्रसिद्ध आहेत. भक्ति क्षेत्रांत त्यांची साधना "पुष्टि-मार्ग" या नांवाने प्रसिद्ध आहे. पुष्टि-मार्गाच्या सेवापद्धति दोन प्रकारच्या आहेत. एक सकाळपासून संध्याकाळपर्यंत केली जाणारी सेवा आणि दुसरा प्रकार म्हणजे दरवर्षीच्या उत्सवानुसार केली जाणारी सेवा. रोज होणाऱ्या सेवेत मंगल भोग, शृंगार, राजभोग, सांज-आरती शेजारती आणि शयन इत्यादि प्रकार असतात. प्रत्येक प्रसंगी श्रीनाथजींना निरनिराळ्या शृंगारानें नटवितात. निरनिराळ्या वेळीं निरनिराळी वाद्ये वाजविली जातात. सूरदास, नंददास, कृष्णदास आदि कवींनी रचलेली पदें गाईली जातात. प्रतिदिनी केलेल्या सेवेमध्यें वात्सल्यभक्ति प्रामुख्यानें दिसते.

श्रीनाथजीचीं सेवा करतानां स्वच्छता, टापटीप, पवित्रता, शुद्धता कमालीची ठेवली जाते. फूलघर, पानघर, शाकघर, मिश्रीघरमध्यें सेवा करणारे सेवेकरी तोंडानाकाची घाण सामानावर चुकून सुद्धा पडू नये म्हणून तोंडावर फडकी बांधून काम करताना दिसतात. जशी स्वच्छतेच्या बाबतींत काळजी घेतली जाते तशीच ती सेवा तनमनधन केली जाते. त्या सेवेंत जीव ओतला जातो. ती सेवा कलापूर्ण असते. मंदीरांतल्या फुलमाळा बनवितांना, देवाचा नैवेद्य तयार करतांना, गोविंद-विडे बांधतांना आपल्या हाती असलेल्या हस्तकौशल्याची इतकी पराकाष्ठा केली जाते कीं संसारी माणूस त्याच्या नित्याच्या संसारांत सुद्धा इतकी तत्परता दाखवित असलेला दिसत नाही.

नाथद्वाराच्या देवळांत रोज इतका प्रसाद बनविला जातो तितका अन्यत्र क्वचितच बनवला जात असेल. रोज कमितकमी ४ ते ५

हजार रुपये प्रसादाकरतां खर्च केले जातात. ह्या प्रसादांत केशर, कस्तुरी, वेलदोडे इत्यादि मौल्यवान पदार्थ असतात. केशर नि कस्तुरी दळण्याकरतां अनुक्रमे सोन्या चांदीची जाती आहेत.

पंधरा हजार वस्तीचे हे गांव मोठे सुंदर नि टुमदार आहे. जवळ जवळ निम्या लोकांचा उदरनिर्वाह कोणत्याना कोणत्या प्रकारे देवालयावर अवलंबून आहे. देव आहे म्हणून ही देवमाणसे आहेत. काही चित्रकार मीनाकार आहेत. काही लाकडी खेळणी बनवितात, काही पाककलेंत निष्णात आहेत. काही गुलाबपाणी बनवतात. इथले चित्रकार प्रसिद्ध आहेत. त्यांनी हातांनी काढलेले निसर्ग मनोहर देखावे यात्रेकरूंसमोर विक्रिसाठी आणतात. घासीराम, खुबीलाल, नरोत्तम नारायण आदि चित्रकार प्रसिद्ध आहेत. ह्यांच्या प्रभावाने म्हणा, पण इथल्या स्त्रियाहि उत्तम चित्र काढतांना दिसल्या. सोन्याचांदीवर मीनाचे काम करणारे मीनाकार दिसले. त्यांची कलाकुसर देवळांत जातांना दोन्हीबाजूंच्या दुकानांत पहावयास मिळते. मंदिरांत नित्य होणाऱ्या गाण्या-बजावण्यामुळें इथले लोक गाण्याबजावण्यांतहि उस्ताद वाटले. आकाशवाणीवर ज्यांचे कार्यक्रम होतात ते पुरुषोत्तमजी पखावजी व मुलचंदजी कलाकार इथलेच. बाजारांत खडी-छपाईची पातळे पाहिली. पातळांवर छपाईचे काम इथे होते. गुर्जर व मारवाडी ललना एकदम हुरळून जातात इतके मनपसंत काम इथे होते. आपल्या चोखंदळ दाक्षिणी बायकांच्या मात्र ही रंगछपाई पसंतीस येत नाही. बायकांकरतां बाजारांत रंगबिरंगी पातळे दिसतात तर मुलांकरतां लाकडाची खेळणी दिसतात. खेळणी असतात स्वस्त पण त्यांत सुबकता कमी. रोज चार हजारांचा नैवेद्य देवळांत तयार होतो. हो, रोज ! त्यामुळें इथले लोक पाक कलेत निपुण नसले तरच नवल. देवाच्या भोगाच्या

निमित्ताने रोज छप्पन्न प्रकार बनविले जातात. देवाचे सेवेकरी म्हणून दोनशे पुजारी किंवा सेवेकरी देवळांत सेवा करीत असतात. पुजेपासून देवाचे विडे बनविण्यापर्यंत आणि गाणे गाऊन देवाला रिझविण्यापासून देवाचे पाय चेपण्यापर्यंत हरेक प्रकारची देवसेवा करतांना इथे ते दृष्टीस पडतात. त्याकरतां त्यांना धन मोबदला मिळत नसतो. तर देवाच्या प्रसादांतून अन्न मोबदला मिळत असतो. रोज चार हजाराचा नैवेद्य होतो. तोच ह्या दोनशे पूजाऱ्यांत वाटला जातो. घरच्या लोकांची पोटे भरल्यावर हा प्रसाद हे पुजारी यात्रेकरुंना विकतात व त्यापासून पैसा उभा करतात. खाणावळींत जेवण्यापेक्षां यात्रेकरुहि मोठ्या आनंदाने हा प्रसाद विकत घेतो. दोन रुपयांच्या प्रसादांतून सहा लोकांचीं पोटे भरु शकतात इतका तो विपुल असतो. स्वादिष्ट तर असा कीं प्रत्यक्ष नाथद्वारला जाऊनच त्याचा अनुभव घ्यावा.

नाथद्वारपासून ७ मैल दूर खमनोर नांवाचे एक गांव आहे. तेथे गुलाबांची जणू शेती होते. रोज एक लाख गुलाबाचे फूल देवाच्या सेवेकरतां येते. तो निर्माल्य गोळा करुन इथले लोक गुलाबपाणी नि अत्तर तयार करतात.

मंदिराचे अनेक उत्सव आहेत. कुठल्या दिवशी कोणता उत्सव व्हावयाचा, त्यावेळी कोणता शृंगार करायचा, देवाला कोणता पोषाख घालायचा, कोणता नैवेद्य करायचा, कोणते गाणे म्हणायचे नि कोणते वाद्य कोणी वाजवायचे ह्याचे पद्धतशीर नियम आहेत. ऋतूचक्राप्रमाणेंच इथे चक्रपूजा असते.

चैत्रांत वर सांगितलेल्या खमनोर गांवी गुलाबांना बहर येतो. लाखलाख फुलांचीं नेत्रदिपक अशी सजावट देवळांत होते. त्यावेळी डोळ्यांना तर मनोहर शोभा दिसतेच पण सुगंधाने मनहि वेडावून नि भारावून जाते. चैत्र महिन्यांत ही गणगौर गुलाबशोभा देवाच्या अंगावर

ज्याला करायला नि पाहायला मिळते तो मोठा भाग्यवानच ! ह्या दिवशी गावांतल्या स्त्रिया गुलाबी रंगाची वस्त्रे परिधान करतात नि देवळांतले सेवेकरीहि गुलाबी रंगाच्या टोप्या डोक्यावर घालून मिरवतांना दिसतात. प्रेमाचा रंग गुलाबी असतो म्हणतात ! गुलाबी रंगाने देव नि भक्त एक होतो.

वैशाखांत वल्लभाचार्य जयंती साजरी होते. ज्येष्ठांत देवापुढे आंब्यांचा ढीग जमतो. आषाढांत रथयात्रा असते. श्रावणांत हिंदोळ्याचा उत्सव असतो. त्यावेळी १५ फूट उंचीच्या चांदीच्या झोपाळ्यावर देव विराजमान होतात. संध्याकाळी बागेमध्ये फुलांच्या झोक्यावर प्रभू झोके घेतो. श्रावणांत देवाला चांदीच्या झोपाळ्यावर बसवूनहि भक्तांचे समाधान होत नाही म्हणून भाद्रपदांत त्याला सोन्याच्या झोपाळ्यावर बसवून झोके देतात. अश्विन महिन्यांत श्रीनाथजीच्या हातांत ढाल तरवार देऊन त्याला नटवितात. साहजिकच आहे. राणा प्रतापाच्या भूमींत तो उभा आहे ! कार्तिकांत दिपोत्सव, अन्नकोट. ह्या अन्नकोटांत देवासमोर स्त्री-पुरुष एकत्र येऊन हातांत हात धरून नाचतात. त्यावेळीं भागवतकारांनी वर्णन केलेली रासक्रीडा साक्षात उभी राहाते. अन्नकोटांत १२५ मण धान्याची रास देवासमोर उभी केली जाते. नंतर ती भक्तांकडून लुटविली जाते. त्यावेळी तांदुळाचा एक दाणा तरी पदरी पडावा म्हणून भक्तगण जिवाचा आटापिटा करतात. ज्यांना एकहि दाणा मिळालेला नसतो त्यांची हिरमुसली तोंडे दुसऱ्यांकडून देवदाणे मिळाल्यावर हर्षाने उजाळून जातात. अशाप्रकारे अन्नकोट समाप्त होतो त्यावेळी आपल्या इकडल्या पैठणच्या काल्याची आठवण होते. त्यावेळीही लोक एका लाहीसाठी असाच जीव टाकतात. प्रकार निराळा पण भाव एकच !

शेवटी फाल्गुनांत, "ना मारो पिचकारी"—चा उत्सव. रंग-होरीचा खेळ. गुलाल उधळण. टिपऱ्या घेऊन केलेला नाच. वातावरणांत गुलालाचे ढग जमतात नि जसा भक्तांचा भाव तसा देव टिपऱ्यावर नाचत असतो, डोलत असतो. सात्विक संगीतानें मंदिराचे वातावरण प्रसन्न झालेले असते.

पोटभर मिष्टान्नाचा प्रसाद खाऊन नाथद्वार सोडतांना अगदी जिवावर आले होते. असं सुंदर, रमणीय नि पवित्र स्थळ! पण शक्ति संचयाचे असें हे पवित्र ठिकाण आज मात्र तेथील कारभाऱ्यांच्या अंतर्गत मतभेदामुळें मारामारीचा आखाडा झाला आहे हे कळले तेव्हां चित्त व्यथीत झाले. ही पवित्र भूमि अशी वंचित नि शापित कां?

## राणा प्रतापाचें एकलींगजी

दुपारचे उन्ह कमी झाले नि आम्हीं मोटारींत बसलो. मोटार वेगाने उदयपूरच्या दिशेने धावू लागली. मोटार पुढे जात होती तरी नाथद्वार कांहीं डोळ्यासमोरून हालायला तयार नव्हते. सोन्या चांदीची जाती नि झुले, मिष्टान्नाचे प्रसाद नि रेशमीगर्भ जरीची प्रभूची वस्त्रे सारखी नजरेसमोर येत होती. मनाला केशर कस्तुरी चढली होती. मोटार थांबली. सर्व उतारू उतरले तरी आम्ही उभयता जागेवर बसूनच होतो. तेवढ्यांत तिकीट कंडक्टर आला नि "साहेब, तुम्हाला एकलींगजीचे मंदिर पहावयाचे नाही कां?" म्हणून विचारूं लागला तेव्हां कुठे आम्ही नाथद्वार समाधींतून जागे झालो.

मोटारींतून उतरलो. संध्याकाळचे पांच वाजले होते. उन्हाची प्रखरता कमी झाली होती. मागे वळलो तर मागच्या बाजूस एकलींग-जीचे मंदिर होते. प्रवेश द्वारावर सोनेरी उन्हे पडली होती. त्यांच्याकडे पहाताना एकदम मनांत आले, असेच केव्हांतरी संध्याकाळी राणा प्रताप

नि त्याचे सहकारी यांचे घोडे इथे थांबले असतील. नरवीर राणाप्रताप एकलींगजीच्या दर्शनाला इथे आला असेल. ह्या प्रवेशद्वाराने त्याला पाहिले असेल नि शंभूदेवाने त्याच्या कार्यांत त्याला आशीर्वाद दिला असेल.

वा ! राणा प्रतापसिंहाच्या शरीरसंपदेप्रमाणेच हे मंदिर भव्य आहे. त्याच्या कार्यनिष्ठेप्रमाणेच तें पवित्र आहे. एकलींगजी हे एक लहानसं गांव. एकलींगजी हे राणा प्रतापाचं कुलदैवत. राणा प्रताप हे राजस्थानचे कुलदैवत. म्हणजे हे त्याच्या कुलदैवताचे कुलदैवत. वरती देवळाच्या सोबतीने राहीलेले. नाथद्वारा ते उदयपूर ह्या रस्त्यावर वसलेले हे सुंदर सोनेरी गांव संध्याकाळच्या उन्हांत न्हाऊन निघत होते. प्रवेशद्वारांतून आंत गेलो.तर पहारेकऱ्याने आदबीने मुजरा केला. देवळाचे आवार स्वच्छ होते. शांत होते. भोवतालीं १०८ शिवमंदीराचा फेरा होता नि मुख्य महादेव एकलींगजीचे मंदिर मध्यभागी होते. बेल-फुले घेऊन मंदिरांत प्रवेश केला. आंतमध्यें सभामंडपांत कसल्यातरी धार्मिक ग्रंथाचे वाचन चालले होते नि देवासमोर दिवा जळत होता. काळेभोर तुळतुळीत संगमरवरी शिवलींग चतुर्मुखी होते. काळोखांतहि ते शिवलींग चमकत होते. अर्धी प्रदक्षणा घातली तेव्हां तेथें एक दार होते. तेथून जवळून दर्शन घेता आले. बाहेर आलो तर एक युरोपीयन जोडपे मोठ्या कुतुहलाने ते दुमजली पुरातन शिवमंदिर पहात होते.

आठव्या शतकांत बाप्पा रावळनें ह्या शिवमंदिराची स्थापना केली नि त्याच्या कृपाप्रसादाने चितोड सर केले. पुढें लांडग्याप्रमाणें मुसलमान ह्या देवस्थानावरहि तुटून पडले. नंतर इ. स. १४८८ मध्यें राणा रायमलने ते पुनः बांधले.

इथेहि शिवविष्णु एकत्र आले आहेत. राणा प्रतापाचे शिवमंदिर नि मीराबाईचे कृष्ण मंदिर जवळजवळ वसलेलीं आहेत. इथे राणा-प्रताप आला तशी मीराबाई पण आली. इथें शौर्य नांदले तशी भक्तीही नांदली. एकलींगजी, माझे तुला शतशः प्रणाम!

चहा–पाणी घेऊन ड्रायव्हर ताजा तवाना झाला होता. त्याने मोटार अशी बेफाम हाकली की सूर्य मावळाच्या आंतच आम्ही उदय-पुराला, सरोवरांच्या शहरांत आलो.

जुनी दिल्ली नवी दिल्ली किंवा जुने अहमदाबाद नवे अहमदाबाद तसें उदयपूरला पण नवे उदयपूर नि जुने उदयपूर अशी दोन स्टेशने आहेत. नव्या भागास उदयपूर सिटी म्हणतात. आम्ही उतरलो त्या स्थानापासून श्री. हर्षे यांचे घर लांब होते. टांगा करुन आम्ही त्यांच्या घरीं निघालो. पंजाबी स्त्रीच्या टोकदार नाकासारखे उदयपूर देखणे आहे. रुंद रस्ते, सुंदर बागा, शोभिवंत दुकाने, निरोगी माणसे, उत्साही तरुण वेगाने पळणाऱ्या मोटारी, सिनेमागृहे अलीशान हॉटेलस् बघत असतां नवे उदयपूर स्टेशन मागे टाकून टांगा श्री. हर्षे याच्या दारांत थांबला.

दारावर पाटी होती 'हेमंत हर्षे'. घरांत दिवे लागले होते. बाहेर काळोख झाला होता. गृहिणी गृहकृत्यांत दंग होती. चाहूल लागावी म्हणून मी दारावर टिकटिक केली. आवाजाबरोबर शुद्ध पंजाबी पेह-राव केलेली एक तरुणी बाहेर आला. आम्हाला पाहून ती गोंधळली नि तिला पाहून आम्हीहि. पाहुणे म्हणून आम्ही इथे प्रथम आलेलो. तेव्हां आम्हाला पाहून ती गोंधळणें साहजिकच होते. पण तिच्या वडि-लांची चिठ्ठी घेऊन आम्ही सिद्धपूराहून हर्षे नामक महाराष्ट्रीय माणसाच्या घरी उतरण्यास आलो तर ही पंजाबी गृहस्वामिनी कोण? म्हणून आम्ही गोंधळलो. आमचे घर तर चुकले नव्हते? हे घर हर्षे यांचेच ना?

आमच्या प्रश्नावर जेव्हां ती अस्खलीत मराठीत बोलूं लागली तेव्हां जिवात जीव आला. घर बरोबर होते. आम्ही आमचा परिचय करून दिल्यावर माहेरचे माणूस आले म्हणून तीहि हरखून गेली. थोड्या-वेळाने श्री. हर्षे बाहेरून आले. एकमेकांचा परिचय झाला. पंजाबी ढंगाचे जेवण झाले नि मग आम्ही सर्वच एकमेकांचे झालो. अनोळखी-पणा अगदीं दूर पळून गेला. इतक्या लांब पाहुणे म्हणून आलो, कुणी येत नाहीत नि आम्ही आलो. म्हणून त्यांना मोठा आनंद झाला, अपूर्वाई वाटली. गप्पाटप्पा झाल्या. जेवण झाल्यावर गुलाबी थंडी झोंबू लागली. गरमगरम दुलया अंगावर घेतल्यावर डोळे केव्हां मिटले तें कळलेच नाही.

## मूर्तिमंत शौर्य उभे

दुसऱ्या दिवशीं सकाळीं नवाच्या गाडीने राणा प्रतापाच्या चितोड गडावर स्वारी करायला निघालो. सकाळचा प्रवास मजेंत झाला. मावली जंक्शनला अशी रबडी खाल्ली कीं ती जन्मांत विसरणे शक्य नाही. पोटांत सायीचो गोधडी गेल्यामुळें भुकेचे कावळे अजीबात ओरडले नाहीत. चितोडगड आले तेव्हां एक वाजला होता. गाडींतूनच चितोडचे दर्शन झाले. चितोडगड म्हणजे मूर्तिमंत शौर्य आहे. टांग्यां-तूनच आम्ही जेव्हां गडाचा रस्ता कापू लागलो तेव्हां घोड्याच्या टपटप टापा वाजत होत्या. त्या आवाजांतून मला राणा प्रतापाचे घोडे धावतांना दिसूं लागले. जसजसे आम्ही किल्ल्याच्या जवळ जात होतो तसतसें आम्ही वर्तमान काळांतून भूतकाळांत जात होतो इथे, इथेच वीर शौर्याने लढले नी मानी सतींनी जोहार केला. मगती स्त्री असो किंवा पुरूष असो. शौर्याने लढतांना, मृत्यूशी चुंबाचुंबी करतांना ते कधी कचरले नाहीत. राज्यस्थान ही खरोखरच वीरप्रसवा भूमि आहे.

चितोडचा इतिहास हा मूर्तिमंत शौर्याचा इतिहास आहे. इथल्या दगडा धोंड्यांनी राणा संगाचा प्रताप पाहिला. चितोड स्वतंत्र करतांना रानावनांतून भटकत असलेला प्रताप इथल्या वृक्ष–वेलींनी पाहिला नि जोहार करणाऱ्या रजपूत रमणींची भडकती चिताज्वाला इथल्या वाऱ्याने पाहिली. पद्मिनीचे सौंदर्य, राणा प्रतापसिंहाचे शौर्य नि मीराबाईची भक्ति यांचा त्रिवेणीसंगम इथे झाला. मला तर चितोड हे एक राष्ट्रीय तीर्थच वाटते.

नाथद्वाराला जातांना जसे भाविक भेटले तशाच प्रकारच्या एका ऐतिहासिक भाविकतेने इथेहि लोक आले होते. पारमार घराण्यांतील मोरी राजाने हे गांव वसविले. त्याचे नांव चित्रांग मोरी म्हणून त्याला चितोड असें नांव पडले. इ. स ७३४ मध्यें बाप्पा रावळनें चितोड सर केले. इ. स. १३०३ मध्यें पद्मिनीच्या लोभाने अल्लाउद्दीन खिलजीने चितोडवर हल्ला केला. त्याला चितोड मिळाला पण मानिनी कांहीं त्याच्या हाती लागली नाही. धगधगत्या अग्नींत उडी घेऊन आपल्या सखींबरोबर तिने जोहार केला व अल्लाउद्दीन खिलजीचा पराभव केला. संपत्ती इतकी सती स्वस्त नसते हे त्या काफराला तिने दाखवून दिले. जोहाराच्या आठवणीनें तिथल्या राखेत माझे दोन अश्रू पडले. मस्तक नम्र झाले नि मोठ्या भक्तिभावाने एक चिमुटभर राख मी पुडींत बांधून घेतली व तिचे अवशेष नम्र भावाने कपाळाला लावले.

इ. स. १५३४ मध्यें गुजराथचा बहाद्दूर शहा इथे धूळ उडवीत घोड्यांच्या टापा वाजवीत आला आणि शेवटी १५६० मध्यें अकबराने पुनः एकदा चितोडला बोचकारले. त्या लढाईत अकबराने तीस हजार रजपुतांची कत्तल केली. एकाहून एक असे सवाई वीर

जिवावर उदार होऊन धारातीर्थी पतन पावले. त्यांत स्वामिनिष्ठ पट्टा व जयमल्ल पडले. त्यांच्या सन्मानार्थ अकबरानें किल्याच्या दरवाज्यावर त्यांचे दोन पुतळे उभे केले. त्या किल्यांतला प्रत्येक दगड आम्हाला रजपुतांच्या शौर्याच्या कथा कंठरवाने सांगत होता. किल्याचे दगडहि जेथें शत्रुला थोपवण्यास असमर्थ ठरले तेव्हा पोलादी छातीचे हे रजपूत वीर पुढें सरसावले.

चितोडभूमि खडकाळ नि रेताड आहे. सुपीक नाही. पण दुसरे कांहीं पिकले नाही तरी इथें शौर्य पिकले. चितोड काबीज करेपर्यंत गादीवर निजायचे नाही, दिवा लावायचा नाही, आणि विहिरीतून पाणी काढण्याकरतां दोर वापरायचा नाही अशी राणा प्रतापानें प्रतिज्ञा केली होती. मरेपर्यंत एकसारखा त्याच उद्योगांत होता. राणा प्रताप गेला तरी त्याचे हे व्रत त्याच्या वंशजांनी चालविले. आताआतापर्यंत ते उघड्या आकाशाखाली झोपत होते. मग जेव्हां भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हां नेहरूंनी १९५५ साली त्यांच्यासह मोठ्या मानाने चितोडगडमध्यें प्रवेश केला नि त्यांच्या कष्टमय भटक्या जीवनाला स्थैर्यता आणली.

समुद्रसपाटीपासून साधारणतः ५०० फूट उंचावर हा किल्ला दक्षिणोत्तर पसरलेला आहे. एखाद्या बंदरांत मोठे जहाज उभे राहावे तसा तो स्टेशनवरून दिसत होता. त्यांची लांबी ३॥ मैल व रूंदी अदमासे ।। मैल आहे. आतला परिसर आठ मैलाचा असून देवमाशासारखा त्यांचा आकार आहे. गंभीरी नदी ओलांडून त्याच्याकडे जावे लागते. जातांना एकूण सात दरवाजे लागतात. पहिला पदनपोळ. दुसरा बहीरानपोळ. चितोडच्या दुसऱ्या वेढ्यांत जो शौर्याने लढला त्या सोळंकी भैरान दासाचे ह्या दरवाजाला

नांव दिले आहे. तिसरा हनुमान पोल दरवाजा तर चौथा गणेश दरवाजा. किल्ला सुबक आहे नि सर्व दरवाजेहि शाबूत आहेत. जिथे जिथे पडझड झाली तिथे तिथे राजस्थान सरकारचा हात लागून दुरुस्ती झाली आहे. जोरला दरवाजा पांचव्या क्रमांकाचा नि सहावा दरवाजा लक्ष्मण पोळ. आणि शेवटचा सातवा दरवाजा राम पोळ.


आंतमध्यें नवलाख भांडार आहे. तेथे त्याकाळचे नऊ लाखाचे मेवाडच्या राजांचे जडजवाहर ठेवीत असत. दुसरा कुंभ पॅलेस आहे. फत्तेप्रकाश महाल आहे. जोहाराची जागा आहे. पद्मिनीचे देऊळ आहे. एका दगडावर पद्मिनीचे चित्र कोरले आहे. तिचे सुंदर नाक पहातांना माझ्या मनांत आले ही पाषाण प्रतिमाहि कुणाला भुलवायला समर्थ आहे, मग प्रत्यक्ष पद्मिनीवर अल्लाउद्दीन खिलजी भुलला तर मुळीच नवल नव्हते.

तेथें एक समाधीश्वर महादेवाचे मंदिर आहे. आंतमध्यें अति भव्य आणि प्रचंड अशी पाषाणाचीं त्रिमूर्ति आहे. पुढे एका गोमुखां-तून सतत पाण्याची धार पडते. त्या धारेखाली महादेवाची पींड आहे नि त्यावर रात्रंदिवस बारा महिने पाण्याची धार सतत पडत असते. महादेवावर पडलेले पाणी खाली वहात जाते व एका कुंडात सांठते. त्या कुंडात खूप मासे आहेत.

## चितोडगडचा विजय स्तंभ

पहिल्यांदा आल्याबरोबर नि जातांना पुनः पाहिला तो म्हणजे विजय स्तंभ. रजपुतांच्या पराक्रमाची गीता गाणारा कीर्ति स्तंभ. तो एक शिल्पकलेचा जसा अजब नमुना आहे तसाच तो रजपूत इतिहा-साची पराक्रमी दिशा दाखविणारा दीपस्तंभ आहे. त्याचा पाया ४७

चौरस फूट असून त्या पायाची उंची १० चौरस फूट आहे. नऊ मजली ऊंच अशा त्या मनोऱ्याची ऊंची १२२ फूट असून रुंदी ३० फूट आहे. त्याला १५७ पायऱ्या आहेत. भिंतीवर पुराणांतल्या देवदेव-



तांची चित्रे आहेत. तेथें ब्रह्मा-विष्णु-महेष अवतीर्ण झाले आहेत. उमा महेश्वर प्रगटले आहेत. लक्ष्मी-नारायणाचा तेथें वास आहे. अर्धनारी नटेश्वर नृत्य करुन राहीला आहे आणि शंकर आपल्या भक्तगणांसकट भटकत आहे. असे म्हणतात कीं १४४० साली ह्याचे बांधकाम सुरु झाले नि १४४८ मध्यें ते पुरे झाले. इतकी अव्वाढव्य कलाकृति नऊ महिन्यांत कशी तयार होणार ? त्याला नऊ वर्षे लागली हेच योग्य !

त्यांची बांधणी नि कलाकुसर दिल्लीच्या कुतुबमिनारापेक्षां किती

तरी पटीनें अधिक सुबक, सुंदर नि निर्दोष आहे. आकाशांतल्या बिजलीला सुद्धां तो इतका आवडला कीं एक दिवस ती त्याचे पुसट चुंबन घेऊन गेली. जहरी नागिणच ती. चुंबन घेतांना त्याचा वरचा मुगुट तिने उडविला. महाराणा सरूपसिंगनें त्याच्यावर पुनः घुमट चढविला.

फारफार आवडला चितोडगड मला. मागे पहात पहात मीं पुढे पुढे जात होतो. गाडीत बसलो तेव्हां पंचवीस वर्षांपूर्वी ऐकलेल्या एका किर्तनकाराच्या पद्यपंक्ती आठविल्या. राणा प्रतापाचे आख्यान त्यांनीं आठ दिवस चालविले होते नि डोळे गाळीत आम्ही ते एकत होतो.

हा चितोड नगरी रडे । तुजकडे पाहुनी गडे
शत्रुला चारशिल खडे । सख्या रे उदास मन होऊन
त्यजु नको आपुला पण...........

चितोडगड ! आज सोडून जात आहे. पण पुनः येण्याची भेटण्याची नि पहाण्याची ओढ आहे. जमेल तेव्हां खरं. गाडी उदयपूरला आली तेव्हां रात्रीचे आठ वाजले होते. हर्षे दांपत्य आमची वाट पहात होते. थकल्या शरीराला गरमगरम जेवण हांका मारीत होते. चितोडगडची स्वप्नं रंगवीतच त्या दिवशी डोळा लागला.

### सरोवरांचे शहर

दुसऱ्या दिवशी सकाळी सौ. हर्षे वहिनी, मी नि सौभाग्यवती असे तिघेजण उदयपूर बघायला टांग्यांतून निघालो. उदयपूर सुंदर आहे. नितांत सुंदर आहे. डोळयाचे पारणे फिटले तें सौंदर्य पाहून. अशी देखणी नगरी काश्मीर नि केदार सोडले तर दृष्टीस पडलीच नव्हती. बडोदे इतके सुंदर पण उदयपूर पाहिले नि बडोद्याचा नक्षाच

उतरला असें वाटले. फत्तेसागर तलाव म्हणजे गोड्या पाण्याचा एक लहानसा सागरच आहे. जवळजवळ दोन चौरस मैल इतका त्याचा परिसर नि खोली २५ फूट आहे. महाराजा फत्तेसींगावरून त्याला नांव पडले फत्तेसागर तलाव. आहे खराच सागरासारखा नि महासागरासारखा !

त्याच्या एका बाजूला डोंगरांनी फेर धरला आहे नि दुसऱ्या बाजूने सरपटत जाणाऱ्या नागिणीप्रमाणे रस्ता सळसळत गेला आहे. भोवताली राणा प्रतापचा जुना वाडा, नीमच देवी, सज्जनगड, शनि-मंदिर, स्वरुपासागर लेक नि थिऑसफिस्ट सोसायटी आहे. तलावांत नेहरू पार्क नि चट्टान बाग आहे. १६७८ साली जगतसींगनें हा बांधला नि नतंर महाराणा फत्तेसींगने त्यात सुधारणा नि वाढदुरूस्ती केली. त्याचे आजचे स्वरूप फारच गोड आहे. चांदण्या रात्री तर प्रत्यक्ष स्वर्गच खाली उतरल्याचा भास व्हावा अशी ही मायानगरी आहे.

दुसरा पिचोला तलाव. पिचोला म्हणजे मागची बाजू. हा राजवाड्याच्या मागच्या बाजूस आहे म्हणून ह्याला पिचोला तलाव म्हणतात. ह्याचा घेरहि ३ ते ३। मैल असून हा पंधराव्या शतकांत बांधला गेला असावा. जगमंदिर नि जगनिवास असे दोन वाडे ह्या सरोवरांत असून बोटीने आंतमध्यें जातां येते. आरशांत प्रतिबींब पडावे तशा वाड्याच्या छाया पाण्यावर पडलेल्या असतात. त्यांचे सौंदर्य त्याना बघता यावे म्हणून तर ह्या सरोवराने पाण्याचा आरसा त्यांच्यापुढे धरला नाही ना ? आतां त्या दोघांची अशी गट्टी जमली आहे कीं वाड्याच्या छाया पार तळापर्यंत पडतात. इतके पाणी स्वच्छ आहे. पिचोला तलावाचे अंतःकरण इतके शुद्ध आहे

तलावाच्या पलीकडे टेकड्या आहेत. संध्याकाळचा मावळता सूर्य विश्रांतीकरतां त्यांच्या कुशींत डोके खुपसतो व सारा संध्यारंग पिचोली तलावांत सांडत असतो.

९५०४४

पिचोला सरोवरावर मुख्य राजवाडी आहे. इथे देखणेपणाचा कळस झाला आहे. कलेची पराकाष्ठा झाली आहे. काच-महालमध्यें काडी पेटविली तर हजारो ज्योती दिसतात. त्यावेळी काय राजवैभव असेल नाही ? बाहेर भितींवर निरनिराळ्या अवस्थांतले मोर आहेत. मोरांच्या निरनिराळ्या कथा नि व्यथा. पंख झडलेला मोर, आकाशांतील बादल बघून केकारव करणारा मोर नि जलधारा बरसू लागल्या कीं पिसारा पसरून थयथय नाचणारा मोर. खरे मोर खोटे वाटावेत इतके ते मोर जिवंत आहेत इतकेच सांगणे.

पंधरा लाख रुपये खर्च करुन महाराणा जगतसींगानें बांधलेले जगदीश मंदिर असेच प्रेक्षणीय आहे.

नंतर गुलाब बाग. फुलापानांनी ही बाग नुसती नटून राहिली आहे. ह्या बागेत सरस्वतीभवन नांवाचे एक ग्रंथालय आहे. बागेंत ग्रंथालय असें मी प्रथम इथेच पाहिले. कल्पनाहि मोठी रम्य वाटली. मोरावर बसून सरस्वती इथे प्रत्यक्ष वावरत आहे असा मला गोड भास झाला.

दुसरी बाग "सहलन कीं बारी" सहलन कीं बारी म्हणजे मुलींचा मित्र. ह्या नांवाचे रहस्य मात्र बाग पाहून देखील माझ्या लक्षांत आले नाही. बाग सुंदर आहे. विविध रंगाची फुलझाडे, विविध रंगाची आकाराची नि अनेक ढंगाची पण. हिरव्या गवताच्या पार्श्वभूमीवर तर

फुलांचे रंग अगदी खोल डोळयांत भरतात इथे. कमळाच्या आकाराची गुलाबाची फुले पाहून तृप्तीचा ढेकर आली. कित्येक वेळा फुलपाखरु म्हणून हळूच पावले न वाजतां पकडायला जावे तर ती फुले निघायची. अगदी फुलपाखराच्या पंखासारखी फुले आमची फसवणूक करून वाऱ्यावर डोलायची नि हसायची. एक रुपया दिला कीं इथें बागेंत कारंजाच्या फवाऱ्याची गंमत बघावयास मिळते. चारी बाजूंनी कारंजी उडू लागतात; हत्तीच्या सोंडेतून, पितळी चिमण्यांच्या चोचीतून आणि त्याचवेळी सूर्य किरणाने सप्तरंगी धनुष्ये पण दोरी ताणून सज्ज होतात.

सौराग पाहून आलो तेव्हां गाण्याच्या बैठकींतून आल्यासारखें वाटत होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ...63625.... वि: ...प्रवास
क्रमांक ...825.... नों: दि: 21.3.61
ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 95085

REFBK-0015044

REFBK-0015044